१५ इतिहास

# एतद्देशीय संस्थानांचा

# इतिहास.

( भाग पहिला. )

मोठमोठ्या संस्थानांचा इतिहास, लढाया, तहनामे, पूर्वींची व हल्लींची राज्यरीति, इंग्रजसरकारा बरोबर झालेले करार वगैरे.

**इंग्रजी ग्रंथ जुने कागद आणि बखरी यांच्या आधारें.**

ग्रंथकार.

स्त्रीशिक्षण, इतिहास, शाळाखात्या करितां गणीत भूगोल वगैरे पुस्तकांचे कर्ते.

**यानीं तयार करून.**

मुंबई येथें.
" जगमित्र छापखान्यांत " छापविलें.
सन १८८७ इ०

(या पुस्तका संबंधी सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.)

णानें वेळा

हें पुस्तक सन १८६७च्या २५व्या आक्टा प्रमाणें
रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क आम्हीं राखिले
आहेत. यांतील कोणताही भाग स्वतंत्र किंवा
परभार्षेत भाषांतर करणें किंवा पुनरावृ-
त्ति छापविणें वगैरे सर्व प्रकारचे हक्क
" लिमये " यांचे आहेत.

# .story of the Native sta

## CHAPTER 1.

THE HISTORY OF LARGE NATIVE STATES, WA
EATIES, THE FORMER AND PRESENT REGAL
SPRUDENCE AND TREATIES WITH THE I
LISH GOVERNMENT.

*With the aid of m y English au
old manuscripts nd memoirs.*

*AUTHOR*

*f the several books on female e
ation, Arithmetic and Geograp
for the use of schools, and
other works.*

Registered under act xxv of 18

All rights reser

BOM

# प्रस्तावना.

पुष्कळ लोकांचा समज असा आहे कीं, 'हिंदुस्थानांतील [illegible] राहिलेलीं जीं कांहीं एतद्देशीय संस्थानें आहेत, तीं [illegible] केवळ [illegible]ज सरकारानें दयेनें ठेविलीं आहेत; परंतु जो कोणी सावधान अंतःकरणानें एतद्देशीय राजांच्या इतिहासाचें अंमळ लक्ष्य पूर्वक अवलोकन करील, त्यास असें दिसून येईल कीं हल्लीं जो " एतद्देशीय संस्थानिकांचा "व इंग्रज सरकारचा संबंध हजारों लोक समजतात; तो संबंध इंग्रजसरकारचा व एतद्देशीय संस्थानिकांचा प्राचीन काळा पासून नव्हे. मुसलमानांच्या अगर दिल्लीच्या बादशाहांच्या पडत्या काळाचे वेळीं हिंदुस्थानांत निरनिराळीं किंबहुना शेंकडो स्वतंत्र राज्यें होतीं; त्यां पैकींच साधारण त्या वेळीं एक इंग्रज लोकांचें राज्य होतें.

भरतखंडांत पूर्वी पासून कोणत्याही काळीं, निदान बऱ्याच आलीकडच्या काळीं तरी एक सार्वत्रिक राज्य नव्हतें; या मुळेंच इंग्लिश, फ्रेंच, आणि पोर्तुगीज लोकांनीं भरतखंडांत प्रवेश केला असतां या परकीय परद्विपस्थ लोकांबद्दल कोणीच बंदोबस्त केला नाहीं. पोर्तुगिज लोकांनीं एकदां जें राज्य संपादन केलें तें त्यांनीं कोंकणांत व पुढें बरेच वाढविले होते; परंतु बाजीरावानें व चिमणाजी अप्पानें त्यांचा जागोजाग पराभव करून त्यांच्या कडून बहुतेक कोंकणचा मुलुख जिंकून आपले अमला खालीं आणला. नंतर राहिले परकीय दोघे-फ्रेंच आणि इंग्रज,त्यांची एकमेकांची झटापट होऊन फ्रेंचाचें वर्चस्व नाहीसें झाले व ते पोर्तुगीज लोकांसारखा एक लहानसा मुलुख घेऊन स्वस्थ बसले. आतां राहिले फक्त इंग्रज. त्यांच्या बादशाहाच्या शेवटच्या कारकीर्दीत बंगाला, मद्रास, व मुंबई येथें मिळून फारच थोडें लहानसें राज्य होतें, तें त्यांनीं सुराजउद्दवला याचें राज्य वगैरे खालसा करून हळूहळू बरेंच वाढविलें.

आमचे आलीकडील इंग्रजी ३।४ बुकें शिकून पंडितमन्य झालेले कांहीं विद्वान् लोक एवढ्याशा इंग्रजलोकांनीं २५ कोटी हिंदु लोकांस कसें शौर्यानें जिंकलें? असा प्रश्न करितात आणि हल्लीं भरतखंड इंग्रजांच्या ताब्यात असल्या कारणानें वेळो वेळीं सभामध्यें हिंदू लो-

कांत किंबहुना सर्व भरतखंडांतील लोकांत शौर्य म्हणून बिलकूल नाहीं वगैरे प्रतिपादन करतात. परंतु जो कोणी एतद्देशीय संस्थानांचा इतिहास वाचून पाहिल त्यास सहज आढळून येईल कीं, सर्व हिंदुस्थानाचा कींबहुना भरतखंडांतील मोठ मोठ्या राजांचा व इंग्रजांचा कधींच सामना झाला नाहीं. ज्या ज्या वेळ हिंदुस्थानांत काहीं राज्यें प्रबळ होतीं त्या त्या वेळीं इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या परस्परांच्या सत्ते बद्दल समंत्सर राजांशीभेदी करून फार हुशारीनें त्यांनीं त्यां प्रबळ राजांशीं संग्राम टाळले आहेत. उदाहरण मराठे, रणजितसिंग, वगैरेंशीं इंग्रज सरकारानें आपलें वर्तन फार बेतानें ठेविलें होतें. तरीं पण एकदां मराठ्यांची व इंग्रजांची 'वडगांवानजीक' चकमक उडालीच.

आजकाल हिंदुस्थानांत जो इंग्रज लोकांच्या राज्याचा एवढा विस्तार झाला आहे. तो होण्यास इंग्रज लोकांस सर्वस्वी एतद्देशीय राजांची मदत होती. टिपुचा पराभव करण्यास मराठे, हैदराबादकर, त्रावणकोर, कुर्ग व आणखीं पुष्कळ राजे लोकांची चांगली मदत होती; हें सर्वांस माहित असेलच.

"पेंढाऱ्यांचा नाश, १८५७ सालचें भयंकर प्रचंड बंड, शीख लोकांचा पराभव वगैरे करून इंग्लिशांचे राज्य हिंदुस्थानांत वाढविण्यास एतद्देशीय राजांचें इंग्रजांस अत्यंत साहाय्य झालें आहे. पुष्कळ लोक हल्लींच्या मोठमोठ्या रजपूत, हैदराबाद, इत्यादि संस्थानिकांस इंग्रज सरकारानें जिंकलेले चाकर समजतात. परंतु तसा प्रकार नसून ऐतिहासिक प्रकार पाहिला तर त्या संस्थानिकांनीं इंग्लिशांस शत्रु असें कधींच गणिलें नव्हतें. तात्पर्य जें इंग्रज लोकांचें सांप्रतचें भरत खंडांत राज्य आहे तें त्यांस मिळण्यास "एतद्देशीय राजांनीं" पूर्वी पासून फार मदत केली आहे.

एकंदरींत आमच्या अत्यंत सुधारलेल्या इंग्लिश सरकारानें "एतद्देशीय राजांशीं" पूर्वीच्या त्यांच्या साहाय्याचें स्मरण ठेवून त्यांच्याशीं प्रेमानें वागावें; तसेंच "एतद्देशीय" राजांनींही इंग्लिश सरकारांशीं प्रेमानें वागून त्यांचा संबंध दृढ राखावा हे अत्यंत योग्य आहे.

आम्हीं जो "एतद्देशीय राजांचा इतिहास" दिला आहे; त्यावरून हल्लीं आमच्या राजांची इतकी नीचतम स्थिति येऊन पोंचण्यास मुख्य कारणें काय झालीं हें सविस्तृत कळेल. " वैद्य शास्त्रांत हेतु विपरीत चिकित्सेचा एक रोग शमनार्थ उपाय आहे. " त्याचा अर्थ असा कीं ज्या कारणानें रोग उत्पन्न होऊन रोग वाढला असतो, तें कारण शोधून काढून त्याचाच नाश करण्या विषयीं यत्न करावा; नाहीं तर रोग एक आणि औषध भलतेंच, असें मात्र होऊं नये. हीच गोष्ट या " एतद्देशीय राज्यांची " आहे. कोणत्याही एका देशांत एक सार्वत्रिक राज्य नसतां त्यांत जर निरनिराळीं लहान लहान पुष्कळ राज्यें असलीं तर परकीयांचा शिरकाव तेव्हांच होतो व त्यांचें प्राबल्य वाढतें. मग तो किती ही नीतिमान् असो, त्याजपासून त्या लहान लहान संस्थानांचें पुष्कळ नुकसान होण्याचा संभव असतो.

ज्या वेळेस एका देशांत निरनिराळीं पुष्कळ राज्यें असतात, त्या वेळीं सर्वांचें स्वातंत्र्य कायम राहण्या साठीं त्या परस्पर एतद्देशीय राजांनी राजकीय संबंधानें सर्वांचे सुखार्थ कांहीं करार पाळणें अवश्य आहेत. ते कोणते म्हणाल, तर एका लहानशा संस्थानाचें जरी परकीय कोणी नुकसान करील तरी तें आपलें नुकसान झालें असें सर्वांनीं समजणें. याचें उदाहरण. ग्रीस देशांत लहान लहान अशी बरींच राज्यें होतीं; जर तीं राष्ट्र नियमास न अनुसरतीं तर 'परशियन' लोकांनीं त्यांना केव्हांच नष्ट केलें असतें. आतां त्याचे उलट हिंदुस्थानांत जीं निरनिराळीं राज्ये होतीं, त्या सर्वांनीं परकीय संबंधानें परस्परांमध्यें जे राष्ट्र नियम पाळावयाचे ते पाळिले नाहींत, म्हणूनच मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकलें. जर राजपुतान्यांतील व त्या वेळच्या भारतीय इतर राजांनीं मुसलमानांच्या संबंधानें आपल्या राष्ट्र नियमांस जागृत राहून सर्वांनीं मिळून मुसलमानांविरुद्ध कमर बांधली असती तर मुसलमानांची भरत खंडांकडे ढुंकून तरी पाहण्याची काय प्राज्ञा होती? तात्पर्य, परकीय संबंधानें निरनिराळ्या राजांनी अगर संस्थानिकांनीं परस्पर संबंधानें कांहीं करार पाळणें व सर्व इतर संस्थानांनें किंवा एखाद्या संस्थानाचें यत्किंचित् नुकसान तें आपलें नुकसान हें समजणें योग्य होतें. या वांचून प्रत्येक संस्थानाचें रक्षण होणें दुरापस्त होतें.

आमच्या भरत खंडांतील निरनिराळ्या संस्थानांतील राजे असें समजतात कीं; आपल्याला दुसऱ्या संस्थानांशीं काय करावयाचें आहे ? दुसरें संस्थान खालसा होवो.कींवा जावो; आपलें संस्थान राहिलें म्हणजे झालें. ही त्यांची समजूत अगदीं चुकीची आहे. याच समजुतीमुळें भरत खंडांतील पेशवे, शीख, वगैरेचीं राज्यें लयास गेलीं.

मराठ्यांस वाटलें टिपूचा नाश होईना! आपलें त्यात काय नुकसान आहे? म्हणून त्यांनीं टिपुचा नाश करण्यास इंग्रजांस मदत केली. तों थोड्याच दिवसांत त्यांच्यावरही तोच प्रसंग आला !

आमच्या " एतद्देशीय राजांची " निचतम स्थिति होण्यास आपआपसांतील तंटे व राष्ट्र नियमाचा अभाव हीं मुख्य कारणें होत. आमचे " एतद्देशीय राजे " जे एकाचें रक्षण ते सर्वांचें व जें एकाचें नुकसान तें सर्वांचें , असें ज्या दिवशीं समजतील तोच भरत खंडाचा सुदिन होय!

कित्येक लोकांस असें वाटेल कीं; " एतद्देशीय राजांनीं " परस्परांमध्यें ऐक्य करावें वगैरे गप्पा सांगतां; परंतु ही गोष्ट व्हावी कशी? कारण—अशा प्रकारच्या ऐक्या पासून कदाचित् इंग्रज लोकांना भीति वाटेल, म्हणून ते असें स्वराज्य विघातक " एतद्देशीय राजांचें " ऐक्य कधींही होऊं देणार नाहींत; परंतु ही त्यांची निव्वळ चूक आहे. हल्लीं असलेल्या संस्थानांपासून तर काय ? परंतु जरी पेशवे, टिपू, नागपूर अयोध्या, रणजीतसिंग वगैरेचीं राज्यें असतीं तरी देखील इंग्रजांस त्यां पासून भय नव्हतें. कारण—प्रत्येकाला आपआपलें राज्य सुरक्षित रहावें असें वाटे व अर्थातच त्यांस परकीयांचा उत्कर्ष म्हणजे आपला नाश असें वाटत होतें. म्हणूनच इंग्लिश लोकांच्या राज्याचें जर मराठे अपहरण करतील तर इंग्रज कदाचित् उद्यां आपलें ही राज्य घेतील. अशी त्यांस भिती होती.

जसजसे " एतद्देशीय राजे " सुधारणेच्या मार्गास लागून स्वातंत्र्यास योग्य होतील तसतसें त्यांत इंग्रजांचें कल्याणच आहे. आमच्या एतद्देशीय राजां विषयीं इंग्रज सरकारानें आपल्या मनांतील सर्व कुतर्क काढून टाकून प्रत्येक मोठमोठ्या राजास निदान शिंदे, होळकर, गायकवाड,निजाम, जोधपूर,उदेपूर, वगैरे संस्थानिकांस खुशाल सैन्य ठेवण्याची परवानगी द्यावी. फ्रेंच,जर्मन, इंग्रज किंवा अमेरिकन्, पाहिजे

हे युरोपियन चाकरीस ठेवूच पाहिजे तितकें सैन्य किंवहुना जर्मनी प्रमाणें राज्यांतील प्रत्येक मनुष्य जरी लष्करी नोकरींत त्यांनी तयार केला तरी खुशाल त्यांस करूं द्यावा. यांत इंग्रज सरकारचा बिलकूल तोटा नाहीं.

अकबर बादशाहाचें राज्य केवळ रजपूतांच्या जोरावर होतें. शेंकडों रजपूतराजांनीं तसेंच हिंदूरजवाड्यांनीं मुसलमान बादशाहासाठीं आपल्या अमूल्य प्राणांचे बळीदिले आहेत. जोधपूर, बुंदी, तसेच रजपुतान्यांतील शेंकडों ठाकूर लोक आप आपलीं शिरकमलें बादशाहासाठीं अर्पण- करण्यास तयार होते. हें ऐवढें थोरलें ऐतिहासिक उदाहरण पुढें असतां अजून पर्यंत इंग्रज सरकार "एतद्देशीय राजांच्या" सैन्याबद्दल किंतु कां बाळगतें हें समजत नाहीं.

हिंदुस्थानांतील सर्व राजेलोक पक्के समजून आहेत कीं, इंग्रज लोक असल्यामुळें आपल्या राज्यास कोणताही धोका नाहीं. जर इंग्रज लोकांचें राज्य नाहींसें झालें, तर उद्यां आपआपसांत लढाया सुरू होऊन राज्यस्वस्थता नाहींशी होईल, या मुळें सर्व एतद्देशीयराजे इंग्रज लोकांचे राज्यास अतिशय चाहतात. शिवाय रशिया, अफगाणिस्थानापलीकडे आपसरून बसलाच आहे, त्या भावी अरिष्टाचें निवारण करण्यास "एतद्देशीय संस्थानिकांस" त्यांचें त्यांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्या कडून यथेच्छ फौज तयार करवून त्यांच्याशीं प्रेम राखणें या सेरीज दुसरा उपाय आह्मांस इष्ट वाटत नाहीं. जे रजपूत मराठे सरदार बादशाहा साठीं रणांगणांत शिरकमल हातांत घेऊन गेले, त्यांचे वंशज इंग्रज सरकासाठीं रशियाशीं लढणार नाहींत काय? अवश्य लढतील. तात्पर्य "एतद्देशीय राजांस" रशियन फ्रेंच इत्यादिकां पासून आपलें रक्षण करण्यासाठीं इंग्लिशांची पूर्ण जरूर आहे. सबब इंग्रज सरकार "एतद्देशीय राजांचें" ऐक्य झाल्या पासून आपलें नुकसान आहे वगैरे क्षुद्र विचार कधींही मनांत अणणार नाहीं हें उघडच आहे.

"एतद्देशीय संस्थानिक" इंग्रज सरकाराच्या सुधारलेल्या राष्ट्राची मदत असतां आपल्या राज्यामध्यें सुधारणेचें कांहींच करीत नाहींत, हें पाहून फार आश्चर्य वाटतें. जे दुर्गुण आपणा मध्यें असतील व त्या पासून रयतेचें नुकसान होत असेल किंवा होईल, असे जे कांहीं दुर्गुण असतील ते टाकून आपणामध्यें व आपल्या रयते मध्यें त्याचा

शिरकाव न होईल अशी तजविज करावी. यापासुन पुष्कळ प्रकारचे फायदे होणार आहेत.

राजे लोकांनीं सर्व रज्यकारभार आपल्या दिवाणावर किंवा कारभाऱ्यावर कधीं ही सोंपवूं नये. त्याजपासून पुष्कळ प्रकारें नुकसान होतें व असें झालें म्हणजे प्रजेचीं मनें असंतुष्ट होतात. कित्येक संस्थानांत अशी कांहीं घाणेरडी चाल आहे कीं, प्रत्येक वर्षास ब्रिटिश सरकारच्या अंमलातिल लोक आणून त्यांच्या कडून आपल्या राज्याची व्यवस्था करवितात व आपण निराळे राहतात. तर "करणें फार वाईट आहे.

आमच्या इकडील संस्थानांत विद्येची जशी गोडी लागावी तशी अद्यापी लागलेली नाहीं व या संस्थानांचे आधिकारी तिकडे मुळींच लक्ष्य देत नाहींत व यांच्या कडे अशा इतिहासा सारख्या ग्रंथास मदत मागितली तर पत्र द्वारें दाद लागत नाहीं. वरें कदाचित् १० । २० रुपये खर्च करून स्वतः भेट घेतली तर तो योग लवकर घडत नाही व कदाचित २ । ४ महिनें खटपट करून तों योग घडला तर असा जबाब मिळतो कीं, " पुस्तक तयार झाल्यावर पाहण्यास पाठवा, म्हणजे कांहीं मदत देऊं " या आशेवर सर्व खटपट करून यांच्या सांगण्या प्रमाणें पुस्तक व पत्र पाठविलें तरीं त्याचें उत्तर येत नाहीं व २ । ४ रुपये खर्च करून तार पाटविले तरी उत्तर मिळत नाहीं व कदाचित उत्तर आल्यास पुस्तकें पोंचलीं नाहींत, हें उत्तर येतें.

खरोखर ब्रिटिश इलाख्या प्रमाणे आमच्या एतद्देशीय संस्थानीकांनीं कामाची व्यवस्था ठेवावी म्हणजे कोणासही नड पडणार नाहीं,

हा ग्रंथ आम्हीं एकत्र छापणार होतों परंतु पुष्कळ लोकानि आम्हांस असें सांगितलें कीं, याचे लहान लहान भाग प्रसिद्ध केल्यास त्यांचा उपयोग सर्वत्रांस होईल व या पासुन गोरगरीबांस ही वाचण्याचा लाभ मिळेल अशा प्रकारच्या पुष्कळांच्या सूचना आल्यावरून आम्हीं या ग्रंथाचे एकंदर च्यार भाग वेगवेगळे करून ते छापविले आहेत. यापासुन पुष्कळांस चांगला उपयोग होईल.

यास चांगला आश्रय मिळल्यास आम्हां जवळ " बंडाच्या कालचा खराइतिहास " "बंडामुळें खालसा केलेलीं संस्थानें, " " पटव

धैन यांचीं संस्थानें व त्यांचे नौकर," अशीं पुस्तकें आहेत तीं लौकरच प्रसिद्ध करणार आहों.

या ग्रंथास ज्या ज्या ग्रंथांचें सहाय्य मिळलें त्याज बदल आह्मी त्या ग्रंथकर्त्यांचे फार अभारी आहों.

ग्रंथ संग्रहालय
नं. २१५५

३. ८४

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण पहिलें.

## बासवाडा.

याचें क्षेत्रफळ १४४१ चौरस मैल लोकसंख्या १४८००० उत्पन्न ३,००,००,० रुपये आहे. बासवाड्याचे उत्तरेस डोंगरपूर व उदेपूर. पूर्वेस प्रतापगड. दक्षिणेस होळकराचें राज्य आणि पश्चिमेस गुजराथ.

बासवाड्याचे रावळ हे उदेपूरचे राण्याचेच घराण्यांतील होत. बासवाडा हा कांहीं दिवस उदेपूरचे राज्याचा एक भाग होता. वास्तविक पाहतां बासवाड्याचे रावळ हे डोंगर पूरचे राज्य स्थापकाच्या कनिष्ट बंधुचे वंशज होत. राज्यांतील प्रजाही डोंगरपूरा प्रमाणें भिल्ल व ठाकुरांची आहे. त्यांत भिल्ल लोक फार आहेत. डोंगर पुरा प्रमाणें बासवाड्यासही मराठे व मोंगल यांपासून फार त्रास भोगावा लागला. या पैकीं मराठ्यांनीं तर बासवाडा संस्थानांत फारच जुलूम, धामधूम व बंडाळी चालविली होती. परंतु ब्रिटिश लोकांचा उदय झाल्यामुळें तेथील राजास ' मराठ्यांच्या ' कचाट्यांतून सुटण्याची संधि चांगली मिळाली.

स० १८१२ त बासवाडा येथील रावळ यानें इंग्रज सरकारास असें सांगितलें कीं, जर तुह्मी मराठ्यांना आमचे राज्यांतून काढून लावाल तर आह्मीं त्याबद्दल तुह्मास उत्पन्नाची ? खंडणी देऊं. व तुमच्या तहा प्रमाणें

वर्तन करूं असें कबूल केलें. या राजानीं असें सांगितलें कीं सिंदे, होळकर आणि धार यांचें सर्व सैन्य माझे प्रांतांतून तुह्मीं काढून लावावें, ह्मणजे आह्मीं तुमचे बोलण्या प्रमाणें रक्कम चुकवून देऊं. हें सर्व बोलणें बडोद्याच्या रेसिडेन्टा मार्फत होतें; ब्रिटीश सरकारानें याचें संरक्षण करण्याचें कबूल केलें व राजाच्या मर्जी प्रमाणें सर्व व्यवस्था लावून दिली.

रावळउमेदसिंग यानें जिकडे तिकडे स्वस्थता पाहून आलेलें अरिष्ट निघून गेलें असें समजून तो इंग्रजां बरोबर झालेल्या तहास नाकबूल झाला. इंग्रज सरकारानें तुह्मी कबुल केल्या प्रमाणें तहास मान्य असलें पाहिजे अशी ओढ लाविली, इतक्यांत इंग्रज सरकारचा व धार सरकाराचा तह झाला. त्यांत डोंगरपूर व बासवाडा यांजकडून धार संस्थानास जी खंडणी येत होती ती खंडणी धारचे राजानें इंग्रजांस द्यावी, असें ठरलें. व लगेच नवा तह झाला. या तहा अन्वयें इंग्रज सरकारांनीं रावळ व त्यांचेवंशज यांस लागेल तेव्हां मदत करावी, व त्यांचे खर्चा बद्दल रावळ यानें इंग्रज सरकारास धार संस्थानास रावळ यास जी खंडणी द्यावी लागत असे ती खंडणी इंग्रजांस द्यावी असें ठरलें.

स० १८२४ पर्यंत बासवाड्यांत भिल्ल वगैरे लोकांनीं जवळच्या आसपासच्या जंगलांतून येऊन नेहमीं लुटालुट करावी. असें होतें परंतु पुढें स० १८२४ सांत या चोऱ्या बंद करण्याविषयीं पुष्कळ लक्ष्य देऊन यत्न करण्यांत आले. त्यामुळें त्या चोऱ्या बंद झाल्या त्या दिवसा पासून बासवाडा येथें पुष्कळ शांतता होऊन, तेथील प्रजा सुखानें नांदुंलागली.

भिल्ल वगैरेच्या धाडा बंद पडल्यामुळें स० १८२४ सांत वसूल वाढला. 'पोलिटीकल' एजंटाच्या मताप्रमाणें प्रजेस याही पेक्षां सौख्य मिळून राज्यांत आबादानी झाली असती. परंतु रावळ आणि त्याचा प्रधान हे दोघेही दुर्गुणपुंज असल्या कारणानें व्हावें तसें प्रजेस सौख्य झालें नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

राजा आणि प्रधान यांचे दुर्गुण व दुर्व्यसन फारच वाढत चालले स० १८३९ सांत ब्रिटीश सरकारची खंडणी चुकवून दिली नाहीं, कारण त्या सर्व पैशाचा विनीयोग उमेदसिंगाचा मुलगा जो भवानसिंग तो व त्याचा प्रधान या उभयतांनीं वेश्या व तमाशे वगैरेच्या वाईट दुर्व्यसनांत केला.

ब्रिटिश सरकारानें असा मूर्ख पणा न करण्याविषयीं रावळ यांस पुष्कळ प्रकारच्या सुचना केल्या तथापि त्या पासून व्हावा तसा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. परंतु जेव्हां कडक उपायाची योजना ब्रिटिश सरकारानें केली, तेव्हां मात्र रावळ यांनीं प्रधानास काढण्याचें कबूल केलें. नंतर बाकी तुंबून राहिली होती, ती चुकवून देण्याविषयीं रावळ यांनी विचार केला. प्रधानास काढून दिल्या नंतर भवानसिंग हा फार दिवस जगला नाहीं. त्याला मूल बाळ कांहीं एक नव्हतें तो मेल्यावर त्याचे सरदार व संस्थानीक यांनीं पोलिटीकल एजंटाच्या संमतानें राजाच्या जवळचा "दायाद बाहादर सिंग" यास दत्तक घेतलें. तो ही मुलां बाळां वांचून मेला. यार्णे कोणतेंही महत्वाचेंकाम केलें नाहीं. याचे मागून लचमनसिंग हे गादीवर बसले या विरुद्ध खांडू येथील ठाकूर मानसिंग याच्या मुलाचे हक्क जवळचे असल्या कारणानें त्यानें लचमनसिं-

माबद्दल बरीच तक्रार केली, ही त्याची तक्रार शाबित झाल्या मुळें त्यास दर वर्षास बासवाड्यास जी खंडणी द्यावी लागत होती त्यांत त्यास १३००रुपये कमी केले, तेव्हां तो गप्प बसला. बासवाड्याच्या रावळास दत्तकाचा अधिकार आहे. त्यांना १६ तोफांची सलामी आहे. हल्ली राज्य कारभार चांगला चालला आहे.

भाग पहिला प्रकरण पहिलें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण दुसरें.

## प्रताप गड.

• याचें क्षेत्रफळ १४९७ चौरस मैल आहे. लोक संख्या १४५७०० उत्पन्न. २६२४०० रुपये आहे. प्रतापगडचे उत्तरेस उदेपूर पूर्वेस मंदीसूर, जोरा रतलाम आणि आग्नेईस बासवाडा अशी हद्द आहे.

उदेपूरच्या कनिष्ट शाखे पासून प्रतापगडचे राजाची उत्पत्ति आहे. प्रतापगडचे हल्लींचे राजाचे पूर्वज हे दिल्लीच्या बादशाहाचे अधिकारी होते. या राजां पैकीं सलीमसिंगावर महंमदशाहाची इतकी मर्जी बसली होती कीं त्या सलीमसिंगास आपले नांवाचें नाणें पाडण्यास सुद्धां त्यानें परवानगी दिली. त्यानें प्रताप गडास टांकसाळ घालून आपले नांवाचा शिक्कापाडला व नवीन रुपये काढले त्यासच सलीमशाही रुपये ह्मणतात, ते अजून पाडतात. हे कंपनी रुपया पेक्षां कमी आहेत. सलीम शाही ५ रुपयां बरोबर कंपनी रुपये ४ असें प्रमाण आहे.

हितेच्छु 
१०८

मोंगल बादशाही बुडाल्यावर सलीमसिंगाचा मुलगा सवंतसिंग हा होळकराचा मांडलीक झाला. त्यानें मराठ्यांच्या बंधापासून मुक्त होण्यासाठीं स० १८०४ रांत बराच यत्न केला. त्यानें ब्रिटिश सरकाराशीं तह केला. त्यांत त्यानें होळकराची खंडणी इंग्रज सरकारास देऊं केली. " लार्ड कार्न वालीस " याच्या राज्य व्यवस्थेंत फेरफार झाल्या कारणानें हा तह ब्रिटिश सरकारानें मोडला. तेव्हां पुनः १४ वर्षें प्रतापगडास मराठ्यांचा जाच सोसावा लागला.

स० १८१८ रांत इंग्रज सरकारची राज्य व्यवस्था पुनः बदलली. तेव्हां राजपुतान्यांतील इतर संस्थाना प्रमाणें प्रतापगडही इंग्रज सरकारानें आपल्या आश्रया खालीं घेतलें. त्याच वेळे पासून प्रतापगडचे राजास ब्रिटिश सरकारास खंडणी देण्याचें कबूल करावें लागलें.

स० १८२३ पासून १८२६ पर्यंत राजा सवंतसिंग आणि त्याचा मुलगा कुंवरदिपसिंग या मध्यें बेबनाव झाल्या कारणानें प्रतापगडास फार घोंटाळा व अस्वस्थता झाली.

या पूर्वींच कांहीं वर्षें राजानें आपला राज्यकारभार मुलाचे स्वाधीन करून टाकिला होता. राजपुत्र कुंवरदिपसिंग यानें त्याच्या विरुद्ध वागणारे कांहीं लोकांस अन्यायानें ठार मारलें. या वरून ब्रिटिश सरकारानें राज पुत्रास राज्यावरून काढून हद्दी पार करण्याचें मनांत आणलें त्या प्रमाणें त्याला राज्या वरून काढून 'देवुला' येथें ठेविलें. कुवरदीपसिंगानें मोठ्या नाखुषीनें तेथं रहाण्याचें कबूल केलें. परंतु तेथें ती जागा त्यास पूर्वीं कल्पील्यापेक्षां जास्ती उद्वेगजनक वाटल्यावरून तेथें कांहीं महिने राहून तो पुनः आपले राजधानीस आला. तेथें आल्यावर

त्यानें इतका जुलूम व प्रळय मांडला कीं शेवटीं त्याचे राज्यांत चोंहोंकडे अस्वस्थता झाली ती मोडण्या करितां त्याला कनारा किल्ल्यांत ठेवून ब्रिटिश सरकारच्या सेनेची मदत मागण भाग पडलें. तेथें तो स० १८२६ साच्या मे महिन्यांत मरण पावला त्या मुळें त्याचा बाप जुना राजा सवंतसिंग जो आपले मुलास राज्यकारभार देऊन आपण स्वस्थ बसला होता त्यास पुनः राज्यकारभारांत शिरणें भाग पडलें. त्यानें आपला मुलगा मरण्याचे पूर्वी त्याच्या अपराधाची क्षमा करून त्याला बंध मुक्त करण्यासाठीं ब्रिटिश सरकारास अर्ज केला होता, त्या अर्जा प्रमाणें ब्रिटिश सरकारानें त्यास बंध मुक्त केलें असतें, परंतु परमेश्वरानेंच त्यास सर्व बंधनापासून मुक्त केलें.

राजाचे वृद्धपणामुळें त्याच्या हातून राज्यकारभार व्हावा तसा होईना, या मुळें भिल्ल, ठक वगैरे लुटारू लोकांना पुनःआपला हात साधला म्हणून त्याचे राज्यांत फार अव्यवस्था झाली परंतु इंग्रज सरकार मध्यें पडून त्यांनीं हा सर्व घोंटाळा मोडून टाकण्या विषयीं पुष्कळ यत्न केल्या कारणानें थोड्याच वेळांत भिल्ल, ठक वगैरे लोकांचें लुटणें अगदीं बंद झालें.

राजा सवंतसिंग यास दलपतसिंग नांवाचा एकच नातु होता. त्यास डोंगरपूरच्या राजास दत्तक दिलें होतें. स० १८४४सांत सवंतसिंग मेला तेव्हां हिंदु धर्म, शास्त्रा प्रमाणें बारीक विचार करतां त्याला कोणी वारस नव्हते. म्हणून, असें ठरविण्यांत आलें कीं; डोंगरपूरचे गादीवरचे दलपतसिंगानें प्रतापगडच्या आपल्या आजाच्या गादीवर बसावें आणि डोंगरपुरास आपले गादीवर एक मुलगा दत्तक घेऊन गादीवर बसवावा. व

आपण प्रतापगडास राहून डोंगरपूरचा दत्तक वयांत येई पावेतों डोंगरपूरचे प्रतिनिधीचें काम करावें. त्या ठरावान्वयें त्यानें ८ वर्षे काम केलें.

प्रताप गडास राहून डोंगरपूरचे प्रतीनिधीचें काम केलें परंतु त्यापुढें प्रतापगडास राहून दोन्ही राज्याचा कारभार त्याचे कडून होईना व डोंगरपुरास फारच बंडाळी झाली तेव्हां इंग्रज सरकारानें डोंगर पुरास एक नेटिव प्रतिनिधी नेमिला तेव्हां दलपतसिंग तेथून निघून प्रतापगडास गेला. "प्रतापगडचे" राजास दत्तकाची परवानगी आहे. त्याला १६ तोफांची सलामी आहे.

भाग पहिला प्रकरण दुसरें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण तिसरें.

## डोंगरपूर.

याचें क्षेत्र फळ१००० चौरस मैल आहे. लोक संख्या १००००० आहे उत्पन्न १०,९००० रुपये आहे. याच्या उत्तरेस आणि पूर्वेस उदेपूर आहे.

डोंगरपूरचे रावळ हे उदेपूरच्या कनिष्ट शाखेचे वंशज होत. त्यांचे पूर्वज अकबरा पासून मोंगलांचे ताब्यांत होते. औरंगजेबाचें राज्य गेल्यावर ते मराठे लोकांच्या ताब्यांत आले. मराठे लोकांनीं त्यांस अगदीं पिळून काढून त्यांच्यावर फार जुलूम केले. या दास्यत्वा पासून स० १८१८ त इंग्रज सरकारानें त्यास मदत देऊन मुक्त केलें. त्या बद्दल डोंगरपुरचे रावळ आपले संस्थानांतू-

न प्रतिवर्षी धारेस जी ३९००० रुपये खंडणी देत ती इंग्रजांस देऊं लागले.

स०१८१९ सांत राजानें एकंदर कागद वगैरे हिशोब पाहतां अलिकडे पूर्वी पेक्षां वसूलाचें उत्पन्न फार कमी होतें असें त्यास दिसून आलें त्यावरून जास्ती उत्पन्न होण्याविषयीं त्यानें पुष्कळ प्रयत्न केले परंतु त्यांत त्याला यावें तसें यश आलें नाहीं.

स०१८२४ सांत कांहीं राज्य संबधीं हक्काच्या तंट्या-वरून लोकांनीं भिल्ल लोकांस रावळाचे विरूद्ध आपले हक्क संरक्षण करण्यासाठीं मदत मागितली. तेव्हां रावळ यानें ही आपलें रक्षण करण्यासाठीं इंग्रज सरकारची मदत मागितली. इंग्रज सरकारानें त्यास मदती साठीं घोडेस्वार देऊं केले. हें ठाकूर लोकांस कळतांच त्या लोकांनीं लढा-ईचा बेत रहित करून पुन्हा राजाचे आज्ञेंत वागूं लागले.

हीं बंडें उद्भविण्याचें वास्तविक कारण रावळ जसवंत सिंग हा मोठा दुर्गुणी मनुष्य असून राज्य कारभारास अगदीं अयोग्य असा होता. तेव्हां अर्थातच त्याच्या रा-ज्यांत फारच जुलूम व अव्यवस्था झाल्या मुळें त्याला स० १८२९ सांत पदच्युत करून त्याच्या जागीं प्रतापगडचा राजा सवंतसिंग याचा नातु दलपतसिंग यास इंग्रज सरकारानें दत्तक देऊन प्रातिनिधी नेमिलें.

याचे कारकीर्दींत राज्याचें उत्पन्न फारच कमी होऊं लागलें. शिवाय त्याचे आंगीं ठाकूर लोक वगैरे ताब्यांत ठेवण्या पुरती ताकत नव्हती. त्यानें ठाकूर लोकांनीं निमुट पणें आपले ताब्यांत राहून आपल्या आज्ञा शिरसामान्य कराव्या ह्मणून बंदोबस्त करण्यासाठीं इंग्रज सरकारची मदत मागितली. 'इंग्रज सरकारानें उत्तर दिलें कीं' मत्ये

स्वतंत्र "एतद्देशीय संस्थानांतील" राजानें अशारीतीनें वर्तन ठेविलें पाहिजे कीं, त्याचा अधिकार कायम राहून राज्यांत स्वस्थता असली पाहिजे. राजाचा अधिकार अयोग्य रीतीनें ठेवण्यासाठीं राज्यांत अस्वस्थता करणें हे योग्य नाहीं भिल्ल व लुटारू लोक यांचा पाडाव करण्यासाठीं इंग्रज सरकारानें आपले स्वार प्रतिनिधी दलपतसिंग यास मदत दिले.

स० १८४४ सालं दलपतसिंगाचा आजा जो प्रतापगडास राजा होता तो मेला. तेव्हां दलपतसिंग प्रतापगडाचा वारस झाला. नंतर दोन्हीं संस्थानें एक करावीं या विषयीं विचार चालला होता परंतु डोंगर पूरच्या ठाकुर लोकांनीं हें अगदीं अमान्य केलें. नंतर असें ठरलें कीं दलपतसिंगानें डोंगर पूरच्या संस्थानावर बसविण्यासाठीं एक दत्तक घ्यावा. आणि त्यास डोंगरपूरचा राजा करून आपण प्रतापगडचे वारस व्हावें. त्यानें साबलीच्या ठाकुराचा मुलगा दत्तक घेतला. तो लहान असल्या कारणानें दलपतसिंगानें प्रतापगडचें राज्य चालवून शिवाय डोंगर पूरचे प्रतिनिधीत्वाचें काम करावें असें ठरलें. अशा प्रकारची व्यवस्था पूर्वीचा रावळ जसवंतसिंग यास मान्य नव्हती त्यानें दुसऱ्या घराण्यांतील मुलगा दत्तक घेण्यासाठीं पुष्कळ धामधुम केली. त्यांत त्यास पाहिजे तसें यश न येऊन त्या बद्दल त्यास मथुरेस नेऊन ठेविलें, त्याला दर महिना नेमणूक १२०० रुपयांची होती.

दोन राज्याचे कारभार एका पुरुषाच्या हातून नीट रीतीनें चालतील असें दिसेना. ज्यावेळेस दलपतसिंग प्रतापगडास राही त्या वेळेस डोंगरपुरास फारच अव्यवस्था व गडबड माजली होती. जेव्हां अव्यवस्था फारच

बाढली आणि आतां या वेळां बंडाळीची पायरी राहिली नाहीं व जुलूम वगैरे फार असह्य झाले तेव्हां सर्व राज्य कारभार दलपतसिंग याच्या हातांतून काढून घेऊन ब्रिटिश सरकारानें एक नेटिव प्रतिनिधीनेमला. आणि त्याचे हातांत दिला. रावळ उदयसिंग हे वयांत आल्यावर त्यांनीं स्वतः राज्य कारभार आपले हातांत घेतला. डोंगरपूरचे संस्थानास दत्तकाचा हुकूम आहे. त्यांस ११ तोफांची सलामी आहे.

भाग पहिला प्रकरण तिसरें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण चवथें.

## किसनगड.

याचें क्षेत्रफळ ७२० चौरस मैल आहे. लोक संख्या ७०,००० उत्पन्न ८९००० रु० आहे.

जोधपूरचा राजा उदेसिंग याचा नवधा किशन यानें स० १६१३ रांत किशनगडच्या संस्थानाची स्थापना केली ज्या वेळेस जहानगीर बादशहाचा मुलगा खुर्रम यानें आपण गादी वर बसण्या विषयीं यत्न चालविला त्या वेळेस त्यानें जोधपूरचा राजा गज यास मदत मागितली ती त्यानें नाकारली तेव्हां खुर्रम यानें गोविंददास ह्मणून एक भटी जातीचा रजपूत होता त्याचेवर राजाचें प्रेम फार असे व तो राजाचा मोठा विश्वासू होता. त्याचे द्वारें राजास सांगून कार्य साधावें असा खुर्रम

यानें निश्चय केला परंतु गोविंददासानें तो आपल्या धन्याचे नाशास कारण आहे असें समजून राजास सांगण्याचें कबूल केलें नाहीं या इमानपणा बद्दल खुर्म यास ठार मारण्याचा बेत केला राजा गज याचा चुलता किशन यानें हें काम पतकरलें या कामगीरी बद्दल त्याला एक स्वतंत्र संस्थान स्थापण्याची परवानगी दिली. किशन यानें मारवाडच्या बाहेर एक प्रदेश पाहून राज्य स्थापलें येथील रहिवासी लोकांस जाट असें ह्मणतात. हा प्रदेश फार लहान या मुळें तेथें १८ व्या शतकांत पुष्कळ घोंटाळे उद्भवले त्याचें शमन करण्यास पाहिजे तशीं त्याचे जवळ साधनें नव्हतीं हा प्रदेश फार लहान व येथील जमीन अत्यंत माळ ह्मणून या राज्यास पुष्कळ दिवस मराठे व मोंगल या दोघांस ही खंडणी न देण्याचा हक्क होता.

स० १७८७ त जोधपूरच्या राठोरांनीं जयपूरच्या कच्छ वाहशी ऐक्य करून मराठे लोकांस आपले राज्यांत हात घालूं देऊं नये ह्मणून यत्न केला तों टोंक येथील लढाईत रजपूतांनी मराठ्यांचा पराभव केला.

स० १७९० आणि १७९१ यांत पाटण मैर्त येथें त्यांनीं पुनः रजपूतांचा पराभव केला या वेळेस किशनगडचा मुख्य बाहदरसिंग यानें मराठे लोकांस आपले राज्यांतून रस्ता देऊन स्वदेशीं यांचा घात केला याचें कारण बाहदरसिंगास त्याचे भावाचे प्रदेशाचा दाय भाग मिळण्याचा होता तेव्हां जोधपूरच्या राजानें त्यास अडथळा केला या मुळें जोधपूरच्या राजाचा सूड उगवावा ह्मणून यानें असा विश्वास घात केला मैर्त येथील लढाईत रजपूतांचा नाश झाल्या कारणानें

मराठे लोकांनीं राजपुतान्यावर पुष्कळ शह बसविले या सर्व शहां पासून फक्त तो विश्वास घातकी संस्थानिक मात्र वेगळा गेला. बाहादरसिंगा नंतर कल्याण सिंग हा गादीवर बसला त्याचे कारकिर्दीत किशनगड ब्रिटीश सरकाराच्या आश्रया खालीं आले या वेळेस जो तह झाला त्या तहा अन्वयें राज्यास इंग्रज सरकारचें सार्वभौमत्व कबूल करावें लागलें. त्यानें इंग्रज सरकाराशीं सेवक भावानें असावें, इंग्रज सरकारच्या संम्मती वांचून इतर संस्थानांशीं दळण वळण ठेवूं नये, इंग्रज सरकारच्या कोणत्याही नाश कारक कृत्या पासून दूर असावें, तंटे वगैरे सर्व ब्रिटिश सरकारचे मध्यस्थीनें तोडावे, आणि ब्रिटिश सरकारास गरज लागेल तेव्हां आपल्या शक्ती प्रमाणें स्वारांची वारंवार मदत द्यावी असें ठरलें. इकडे इंग्रज सरकारानें त्याचे संस्थानाचें संरक्षण करण्याचें कबूल केलें इंग्रजांनीं किशनगडचे संस्थानांस पूर्ण स्वातंत्र्य आहे हें कबूल केलें पुढें कल्याण सिंगाची वर्तणूक बदलली. तो मूर्खा सारखे चाळे करूं लागला त्याच्या राज्यांतील ठाकूर व संस्थानीक यांस त्यानें वाजवी पेक्षां फाजील सेवक भाव कबूल करा म्हणून सांगितलें, हें ठाकूर वगैरेनीं अमान्य केलें. एका ठाकुरानें तर आह्मीं स्वतंत्र आहों आमच्यावर तुमचा ताबा कांहीं एक नाहीं असें स्पष्ट बोलून दाखविलें राजाचे मनांत या लोकांचा नाश करून फडशा उडवावा असा होता पुढें या खटपटी बद्दल तो दिल्लीस बादशाहा जवळ याचा निकाल लावावा म्हणून गेला त्यानें दिल्लीस जाऊन बादशाहास पैसा देऊन पुष्कळ पदव्या मिळविल्या. इकडे किशनगड येथें बरींच खलबतें

चालली होती त्यांनीं घोडे स्वारांची संख्या वाढविली; बुंदीचे रावाची मदत घेतली; व त्या प्रमाणें सर्व ठाकूर लोक साह्य झाले. एक मेकांचे विरुद्ध जे तट होते त्यां मध्यें वैरें सुरू झालीं. त्यांत इंग्रज सरकारचा मुलुख जवळ असल्या कारणानें त्यास त्या वैरा पासून पुष्कळ नुकसान सोसावें लागलें. या मुळें राजास ब्रिटिश सरकारानें सांगून पाठविलें कीं, तुमच्या राज्यांत तुमचे ठाकूर; सरदार; मानकरी किंवा प्रजा यांनीं जरी कांहीं अपराध केले तरी त्यांची जबाबदारी तुमचे शिरावर आहे. हा निरोप ऐकून राजास भीती वाटली व त्यानें दिल्ली सोडली आणि कांहीं घोडे स्वार व संस्थानीक बरोबर घेऊन बंडवाल्या सरदारांवर स्वारी केली. या वेळीं त्याच्या हाता खालच्या सरदारांनीं आपले बंधु तुल्य जे बंडांतील सरदार त्यांचा आह्मीं नाश करणार नाहीं असें सांगितलें. त्याच्या सर्व सरदारांनीं एकामागून एक राजाचा पक्ष सोडून ते सर्व लोक आपल्या सरदाराकडे मिळाले.

कल्याणसिंग यास पदच्युत करून त्याच्या लहान मुलास गादीवर बसवावें अशी इच्छा त्याच्या प्रजेनें धरली. असें झालें तेव्हां राजा अजमीरास पळून गेला आणि तेथें इंग्रज सरकारची मदत मागूं लागला; बंडवाल्या सरदारांनीं इंग्रज सरकारास मध्यस्तींत न पडण्या विषयीं सांगितलें. ब्रिटिश सरकारानें या राजाची देणगी वगैरे सर्व नाकबूल करून सांगितलें कीं, राजानें दिल्लीस रहावें व राज्याचा कारभार रीजन्सी अन्वयें चालवावा. सरदार संस्थानीक वगैरेशीं ठराव झाले. पण पुढें त्या ठरावांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. शेवटीं सरदारांनीं असें ठरविलें कीं,

जोधपूरच्या राजानें याचा निकाल करावा व **इंग्रज** सरकारानें तो निकाल अमलांत आणण्याची हमी घ्यावी. **इंग्रज** सरकार हमी घेईना; तेव्हां संस्थानच्या प्रजेनें राजाचे मुलास राजा करून **किसनगडाला** वेढा घालावयाचें ठरविलें होतें; परंतु राजानें **ब्रिटिश** पोलिटीकलएजंटाचे मध्यस्थीस रुकार देण्याचें मान्य केलें. पोलीटिकलएजंट मध्यें पडल्याकारणानें ठराव वगैरे होऊन **कल्याणसिंग किसनगडास** माघारा आल्या नंतर थोड्याच काळांत पुनः अस्वस्थता झाली. राजाच्या मनांत ठरावा प्रमाणें वागण्याचें नव्हतें; त्या मुळें पुनः सर्व सरदार एक झाले; तेव्हां राजानें राज्य आपल्या मुलाच्या स्वाधीन करून **किसनगडचे** राज्यापासून निवृत्त झाला. तो स० १८३९ त मेला. त्याच्यामागून **पृथुसिंग** हा गादीवर बसला. **किसनगडचे** राजास दत्तकाचा अधिकार आहे. त्यास १९ तोफांची सलामी आहे. त्याचा प्रांत अजमीर व जयपूर यांचे मध्यें आहे.

भागपहिला प्रकरण चवथें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भागपहिला प्रकरण पाचवें.

## धोलपूर.

हें **संस्थान** चंबळा नदीच्या उत्तर तीरास आग्र्याच्या दक्षिणेस व नैर्ऋत्येस आहे. ह्याची लांबी ईशान्य नैर्ऋत्य सुमारें ५४ मैल, व रुंदी २३ मैल आहे. ह्याचें

क्षेत्रफळ ११२१ चौरस मैल आहे. लोकसं० ९१०००० आणि वसूल ७००००० आहे.

**धोलपूरच्या** राण्याचे पूर्वज हे सुमारें १०० वर्षां पूर्वीं **गोहदचे** जमीदार होते. हे **जाट** जातीचे असून मोठे उद्योगी व महाशूर होते. स० १७२९ पासून स० १७४० पर्यंतच्या अवकाशांत. या घराण्यांतील हे शूरत्वाचे गुण **बाजीराव पेशवे** यांच्या नजरेस पडल्या वरून व शिवाय त्या वेळीं जिकडे तिकडे दंगे धोपे आणि अस्वस्थता असल्या कारणाने त्या घराण्यांतील पुरुषांनी मराठ्यांच्या आश्रयाखालील **गोहदचे** स्वतंत्र संस्थानिक, असें आपणास ह्मणून घेतलें. ज्या पुरुषानें हें महत् पराक्रमाचें कृत्य केलें तो लवकरच मेला.

नंतर त्याचा पुतण्या गादीवर बसला. त्याची बुद्धि मोठी चलाख व उपद्व्यापी असल्या कारणानें त्याला आपलें राज्य वाढवावें अशी इच्छा झाली. हा मोठा दूरदृष्टी होता. हा पानिपतच्या लढाईत '**कोणालाही मदत** न करितां वेगळा राहिला होता. त्या वेळीं मराठ्यांचा फार नाश झाला. या आणीबाणीच्या प्रसंगीं मराठ्यांच्या शक्तीचें क्षैण्य पाहून लागलेंच आपणास **गोहदचा राणा** असें त्यानें ह्मणविलें, आणि **ग्वाल्हेर**चा किल्ला ताब्यांत घेतला. त्यानें ६ वर्षें पर्यंत यथास्थित स्वातंत्र्य भोगिलें. नंतर स० १७६१ पासून तें १७६७ पर्यंत मराठे लोकांचे क्षैण्य हळू हळू नाहींसें होऊन पुनः ते बरेच सुधारले व बलाढ्य झाले. त्यांचा सेनापती **रघुनाथराव** हा हिंदुस्थानांतच होता; त्याच्या मनाला **गोहदच्या** राण्याची एकदा चांगलीशी खबर घ्यावी असें वाटलें. त्या प्रमाणें त्यानें सैन्य तयार करून तो **गोहदवर** हल्ला कर-

ण्यास गेला. राणा स्वरक्षणास तयार होता; त्यानें आपली शिकविलेली फौज जमा केली; आणि तो स्वतः मोठा साहसी असल्या कारणानें त्याच्यावर हल्ला करणारे लोकांस त्यानें फार जर्जर करून सोडिलें. तो इतक्या उत्तम रितीनें लढला कीं, रघुनाथराव यास तह करणें भाग पडलें. राण्यानें ३ तीन लाख रुपये देण्याचें कबूल केलें; पण ग्वाल्हेर गोहदच्या राण्याच्या ताब्यांतून निघून शिंद्याचे हातांत कधीं पडली? हें पक्कें कळत नाहीं.

स० १७७९ गोहदच्या राण्याशीं इंग्रजांचे कांहीं ठराव झाले होते. याठरावान्वयें राण्यास मराठ्यां पासून दूर करून त्याच्या राज्यांतील तंटे बखेडे मोडण्याला मदत करण्यासाठीं पाहिजे तेव्हां सैन्य देण्याचें इंग्रजानीं कबूल केलें. त्या ठरावा प्रमाणें कप्तान विलीयम पोफमच्या हाताखालीं २४०० लोक देऊन त्याला गोहद येथून मराठ्यांस हांकून देऊन राण्याशीं सख्य करण्यासाठीं पाठविलें. पोफमनें मराठ्यांस हाकून लाविलें आणि ग्वाल्हेरच्या किल्ल्यास वेढा घालून तो हस्तगत करून घेतला. अगस्त ४ ला अजिंक्य समजलेला ग्वाल्हेर किल्ला शिड्या लाऊन ताब्यांत घेतला व तो किल्ला गोहदच्या राण्यास दिला.

स० १७८१ आक्टोबरच्या १३ तारखेस जो ब्रिटिश सरकारचा माहादजी शिंद्याशीं तह झाला; त्या तहा प्रमाणें ग्वाल्हेर आणि दुसरे मुलुख जों पर्यंत गोहदचा राणा इंग्रजांशी तहा प्रमाणें वागेल तों पर्यंत त्याचे कडे ठेवण्याचें कबूल केलें; परंतु राणा तहा प्रमाणें वागला नाहीं, इतकेंच नाहीं; परंतु स० १७८१ इंग्रज सरकारा विरुद्ध जे कांहीं बेत चालले होते; त्यांत

राण्याचें पूर्ण अंग होतें; असें त्याच्या कित्येक कृत्यावरून दिसून आलें. यावरून इंग्रज सरकाराची व त्याची दोस्ती नाहींशी झाली. नंतर महादजी शिंद्यानें जेव्हां ग्वाल्हेर आणि गोहद यांवर हल्ला केला त्या वेळेस इंग्रजानीं राण्यास मदत नकारितां त्यास त्याच्या नशीबाच्या स्वाधीन केलें. या लढाईत महादजी फार प्रबळ असल्या कारणानें राण्यास ग्वाल्हेर त्याच्या स्वाधीन करणें भाग पडलें. नंतर शिंद्यानें गोहद घेतलें आणि राण्याला कैद केलें. पण पुनः चक्र फिरलें, स० १८०२ मध्यें इंग्रज सरकार आणि दौलतराव शिंद्या यांच्या मध्यें लढाई सुरु झाली.

गोहद येथील शिंद्याचा अंमलदार आबाजी इंगळ्या इंग्रज लोकांचें बळ पाहून इंग्रजांस मिळाला. त्यानें इंग्रजांशीं तह केला. त्या तहा प्रमाणें त्यानें इंग्रज लोकांस ग्वाल्हेरचा किल्ला दिला. पुढें इंग्रजांचा शिंद्याशीं तह झाला. त्यांत शिंद्यांनीं, त्याच्या संस्थानीकाशीं इंग्रज सरकारानें तह केले होते, त्या संस्थानिकांवरचे सर्व हक्क सोडावे. ( त्यांत जोधपूर, व जयपुर, गोहद यांच्या दक्षिणे कडील मुलुख ज्याचा वसूल शिंद्याचे अमलदार करतात त्याचा समावेश करावयाचा नाहीं. ) त्याच प्रमाणें गोहदच्या राण्याच्या राज्याचें स्वामित्व ३० वर्षे शिंद्यांकडे आहे तर त्याचा समावेश त्यांत होत नाहीं. ह्मणून ग्वाल्हेर व गोहद इंग्रजानें शिंद्यांस दिले. परंतु या तहांत राण्याचा संबंध नसल्या कारणानें त्यास त्यांनीं धोलपूर वगैरे हे मुलुख देण्याचें कबूल केलें. या प्रमाणें गोहदचा राणा धोलपूरचा राणा झाला.

स० १८३१ त जेव्हां **बायजाबाई** आणि तिचा भाऊ हे **ग्वाल्हेरीहून** बाहेर निघाले, तेव्हां राण्यानें त्यांचा आदर सत्कार फार चांगला केला. यावरून त्यानें **शिंद्याच्या** आधिपत्य स्वामित्वा विषयीं खुषी दाखविली. तो सं० १८३६ त मेला. स०१८३७ त राणा **भगवंतासिंग** हा गादीवर बसला. त्याला **इंग्रज** सरकारांनीं राजाचीं वस्त्रें दिलीं. पुढें स० १८४१ त राण्यानें आपल्या अयोग्य वर्तनानें आपला **शिंद्यावरचा** राग प्रगट केला. त्यानें एक जैन देवळांतील जैन लोकांची मुर्ती काढून त्याचे जागीं **महादेवाचे लिंगाची** स्थापना केली. **शिंद्यानें** हा आपला अपमान झाला. असें **इंग्रज** सरकाराच्या कानावर घातलें. **इंग्रज** सरकारानें या कामांत मन घालणें हें अयोग्य ह्मणून सांगितलें.

स० १८६७ त राणा **भगवंतसिंग** यानें **ग्वॉल्हेरीहून** जे साहेब पळून आले, त्यांस आश्रय दिला. परंतु **देवहणा** नामक त्याच्या प्रधानानें **आग्रा** प्रांतांतील पुष्कळ गांवें लुटलीं. स० १८६२ त त्यानें पुष्कळ राजकारणें केलीं. आपल्या राजाला काढून दुसरा बसवावा या खटपटींत तो सांपडला; अशा अनेक कारणांवरून त्याला तेथून काढून **बनारसयेथें** नजर कैदेंत ठेवणें भाग पडलें. राणा **भगवंतसिंग** यास दत्तकाचा अधिकार आहे. यास १७ तोफांची सलामी आहे. हल्लीं राज्य व्यवस्था बरी आहे. सर्व अधिकार कारभाऱ्यांजवर सोंपवून आपण वेगळे असे राहिले नाहींत. हे राजे साहेब स्वतः काम पाहतात; तर यांचा कित्ता आमच्या इकडील संस्थानिकांनीं घेण्यासारखा आहे.

**भागपहिला प्रकरण पांचवें समाप्त.**

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण सहावें.

## अलवार.

याचें क्षेत्रफळ ३५७३ चौरसमैल आहे. लोकसंख्या २८००००; उत्पन्न १८००००० आहे. **अलवारचे** उत्तरेस **गुरगेवन;** पूर्वेस **मथुरा** आणि **भरतपुर;** दक्षिणेस व पश्चिमेस जयपूर.

अलवार हें संस्थान **मेवातीचा** भाग होय. हा **मेवाती-लोकांचा** देश आहे. ही जात एक वेगळ्याच प्रकारची आहे. **मेवाती** लोक हे स्वभावतः मोठे **शूर, धाडशी,** अविचारी आणि लुटारू असे आहेत. यांनीं हे गुण **महंमद** हिंदुस्थानावर येण्या पुर्वींच लोकांस दाखविले होते. हे नेहमी ह्या मुलखांतून त्या मुलखांत **लुटालूट** करून स्वाऱ्या करीत फिरत असत. ह्या लोकांनीं थेट **दिल्ली** पर्यंत धुमाळी करून सोडिली होती. या मुळें **दिल्लीचा बादशाहा** रागावून त्यांचा सूड घेण्या विषयीं नेहमी विचार करूं लागला. स० १२०६ त **गाजी उद्दीन बुलबन** यानें या मेवाती लोकांवर स्वारी करून जिकडे तिकडे कडेकोट बंदोबस्त ठेऊन हजारों **मेवाती** लोक ठार मारिले. पुढें १५० वर्षें लोटल्यावर **तघलख** घराणें अगदीं मोडकळीस आलें. ही संधी पाहून त्यांनीं पुनः गडबड सुरू केली. परंतु **मुबारिक** यानें त्यांचा अगदीं पराभव केला; तरी स० १४२९ पर्यंत त्यांचा बेताबातानें लुटण्याचा क्रम चालला होता. मराठे लोकांनीं जसें लुटालूट करून राज्य संपादिलें; तसें राज्य त्यांना हवें तेवढें बल नसल्या कारणानें संपादन करितां येईना. त्यांना कोणी

तरी नायक व व्यवस्थापक पाहिजे होता. त्यांच्या उदयाची वेळ जवळ येऊन ठेपली होती. औरंगजेब मेल्यावर जो घोंटाळा उडाला त्या घोंटाळ्यांत जयपूरच्या राजानें स० १७२० त औरंगजेबाचे राज्यांतील कित्येक मुलुख उपटले; त्यांत मेवाती लोकांचा ही मुलूख उपटला. हा प्रदेश जयपूरच्या ताब्यांत ५०वर्षे होता.

स० १७६४ पासून १७७४ पर्यंत जयपुरास फारच बंडाळी माजली. रजपुतांचा अधिपति जो प्रतापसिंग याला मेवाडांतील मचेरी प्रांताची जाहागीर दिली होती. त्यानें जयपूरच्या राज्यांत घोंटाळा व बंडाळी माजली ही सवड साधून आपण स्वतंत्र होण्या विषयीं उद्योग आरंभिला. मिर्झान जाफरखान आणि जाट या दोघांच्या लढाया सुरू झाल्या. त्यांत प्रतापसिंगानें मिर्झा यास मदत करून जाटांचा बर्सांणा आणि दीग येथें पराभव केला. या बद्दल त्यास रावराजा हा किताब व माचेरीच्या राज्याची सनद बादशाहा कडून मिळाली आहे. अशा रितीनें माचेरी आणि जयपूर हीं दोन निर निराळीं संस्थानें झालीं. प्रतापसिंग एवढ्यानें तृप्त न होतां भरतपूर क्षीणावस्थेंत आहे ही संधी साधून त्यानें भरतपूरचे राज्यांतील मोठा बळकट आणि तटबंदी केलेला असा अलवारचा किल्ला आणि शहर व त्याच्या भोंवतालचा मुलूख बळकावला. प्रतापसिंग अशा तऱ्हेनें निराळ्या राज्याची स्थापना करून तें राज्य चिरकाळ आपलेकडे ठेवण्याच्या उपायास लागला. त्यानें आपला प्रदेश लढाई करून जिंकून आपल्या ताब्यांत घ्यावा; अशी परकीय राजास इच्छाच होऊं नये ह्मणून शेतकीचा अगदीं मोड केला. त्यानें श-

त्रूच्या पराभवास योग्य योग्य अशा ठिकाणीं तटबंदी केली. आणि तेथें लष्कर चांगल्या बंदोबस्तानें ठेविलें.

**अलवार** मिळविल्यावर तो **प्रतापसिंग** १० वर्षें होता. तो मेला तेव्हां त्याला मुलबाळ कांहीं एक नव्हतें ह्मणून त्यानें **बखतसिंग** नांवाचा एक मुलगा दत्तक घेतला. तोच त्याचे मागून गादीवर बसला.

आपल्याराज्यांत शत्रूचे हल्ले होऊं नयेत ह्मणून त्यानें चांगली योजना करून ठेविली होती. तरी मराठे लोकांनीं त्याच्या राज्यावर स्वारी करून त्यांतून कांहीं मुलूख हिरावून घेतला.

स० १८०३ ते ६ पर्यंत जेव्हां मराठे लोकांची लढाई सुरु झाली. तेव्हां **बखतसिंगानें** इंग्रज सरकाराचा आश्रय करून त्याच्याशीं आपल्या बचावाचा तह करून घेतला. याचें कारण मराठ्यांनीं त्याचा प्रांत जिंकून घेतला होता हें होय. मराठे लोकांचे लढाईंत त्यानें इंग्रजास पुष्कळ प्रकारची मदत दिली. या लढायींत मेवाती लोक हे जात्या लुटारू असल्या कारणानें ते इंग्रजाचे सुद्धां गठे वगैरे चोरण्यास चुकले नाहींत.

इंग्रज सरकारानें त्यांला त्यांच्या कामगिरी बद्दल पूर्वी **भरतपूरच्या** राजाला दिलेला मुलूख त्यांचे स्वाधीन केला. एकमेकांचें समाधान व्हावें ह्मणून **अलवारचा** राजा आणि **ब्रिटिश** सरकार यांनीं एकमेकांच्या संतोषाप्रमाणें मुलखाची अदला बदल केली. **बखतसिंगानें इंग्रज** सरकारास आपली कृतज्ञता कधींच प्रदर्शीत केली नाहीं. तो नेहमी शहाणपणानेंही वागतनसे.

स० १८०८ यांत भरतपूरच्या प्रांतांतून वाहाणाऱ्या नदीला त्यानें धक्का बांधला व चांगल्या रितीनें काळव्याचें साधन निर्माण केलें; परंतु लोकांच्या शेतास अवश्य जो नदीचा प्रवाह तो बंद केला, तेव्हां ब्रिटिश सरकार मध्यें पडलें; परंतु पुष्कळ दिवस निकाल लागेना. स० १८११ मध्यें राजा अगदीं धर्म वेडा होऊन गेला. हजारों मुसलमान प्रजेच्या जाचास सुरवात झाली. त्यानें मुसलमान लोकांच्या मशीदी पाडुन जमीनदोस्त केल्या. मुसलमान फकिरांस धरून त्यांचे पाय तोडून व नाकें कापून जवळच्या मुसलमान राजांकडे पाठवावीं. अशा प्रकारचें धर्मवेड त्याच्या डोक्यांत भरलें कीं, त्यानें मुसलमानांचीं प्रेतें उकरून काढून त्यांचीं हाडें आपल्या प्रांताच्या सीमे बाहेर फेंकून दिलीं.

याचवर्षी त्यानें जयपूरच्या गृहकलहांत हात घातला; तें इंग्रजसरकारास रुचलें नाहीं. अलवारच्या राजाशीं स० १८०३ मध्यें तह झाला होता. त्या तहाप्रमाणें या राजाचें वर्तन झालें नाहीं ह्मणून पुःन सन १८११-मध्यें नवा तह केला, त्यांत कोणत्या ही दुसऱ्या नेटिव्ह राजाशीं अगर संस्थानिकाशीं पत्र व्यवहार करणें तो इंग्रज सरकाराचे हुकुमाशिवाय करूं नये असें ठरलें. परंतु पुढें लवकरच ह्मणजे स० १८१२ त राजानें नेडभई आणि शिकरावा हे दोन किल्ले आणि त्याचे समीपचा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. त्या बद्दल दिल्ली हून ब्रिटिश रेसीडेंतानें पुष्कळ सांगितलें; परंतु त्यानें कांहीं मात्र ऐकिलें नाहीं. नंतर फौजेची तयारी करून स्वार वगैरे पाठविले, ते शहरा जवळ एक मुक्कामा पर्यंत

येतात तोंच बखतसिंग शरण आला आणि मुलूख परत देऊन ३ लाख रुपये स्वारीच्या खर्चा बद्दल दिले.

राजा बखतसिंग स० १८१५ त मेला त्या वेळेस त्यास एक पुतण्या व एक दत्तकपुत्र होता. त्याचें नांव बिनायसिंग आणि दुसरा अविवाहित स्त्रीजन्य बळवंतसिंग; हे दोघे लहान होते. गादीवर कोणीं बसावें या बद्दल तंटे सुरू झाले, पुतण्याच्या पक्षास रजपूत सरदार होते, आणि बळवंतसिंगाच्या पक्षाचेही कांहीं होते. त्यांत मुख्य नवाब महमदबक्षखान, शेवटीं पुतण्याला गादीवर बसवावे व राज्य कारभार बळवंतसिंगानें करावा; अशी तोड जोड काढिली. ब्रिटिश सरकारानें हें कबूल केलें. दोघे कांहीं दिवस पर्यंत तसे चालले होते. परंतु बनायसिंगानें आपलें पारतंत्र्य कमी व्हावें ह्मणून बळवंतसिंगास कैद केलें आणि नवाबमहंमद बक्षखान हा दिल्लीस रेसीडेंन्टास भेटण्यासाठीं गेला होता तेव्हां त्याला ठार मारावें ह्मणून बेत केला होता तो अगदीं व्यर्थ होऊन शेवटीं चौकशी करितां अलवारच्या कांहीं कामगारांचा हात त्यांत दिसून आला. ब्रिटिश सरकारानें ते खून करणारे मनुष्य धरून दिल्लीस खटला चालविण्यासाठीं स्वाधीन करण्यास सांगितलें. राजा बनायसिंगानें हें काम साफ आह्मी करित नाहीं ह्मणून सांगितलें. त्याला ब्रिटिश सरकारानें पुनः ते लोक मागितले; परंतु स० १८२६ त भरतपूरचा पाडाव झाल्यावर लार्ड कांबर अलवारावर चाल करून येत आहे असें ऐकेतों पर्यंत त्यानें आपला हट्ट सोडला नाहीं; नंतर राजानें त्याचें ह्मणणें सर्व कबूल केलें.

**राजाबनायसिंग** हा विनय सोडून दिवसें दिवस फार उद्धट होऊं लागला. चौकशी अंतीं **नबाबास** मारण्याचा यत्न करणारे लोक सुटले. तरी त्यांच्यावर एवढा वहिम होता कीं, **ब्रिटिश** सरकारानीं राजाला हे लोक हलक्या कामावर सुद्धां चढवूं नको ह्मणून सांगितलें. राजानें इकडे काडीमात्रही लक्ष नदेतां उलटें त्यांस राज्यांतील मोठमोठीं कामें व अधिकार दिले. या कृत्याबद्दल **ब्रिटिश रेसीदेंत** राजपुतान्यातील सर्व संस्थानिकांस भेटतांना मुद्दाम याला भेटला नाहीं. त्याच प्रमाणें पुढें गव्हर्नर जनरल यानें **अलवारच्या संस्थानच्या** वकिलाची भेट घेण्याचें नाकारिलें. नंतर अलवारच्या राजाचा जयपूरच्या दरबारांत पत्रव्यवहार चालला होता तो बाहेर पडला. यांत **अलवारच्या** राजानें **जयपूरचें** स्वामित्व कबूल करून त्या पासून वस्त्रें व पोशाख घ्यावेत आणि त्या बद्दल त्यास **जयपूरकरानें** बरीच मदत द्यावी असें होतें. **ब्रिटिश एजंन्टानें** राजास असें सांगितलें कीं, अशा तुमच्या पत्रव्यवहारानें तहांतील कलमें मोडतात. असें सुचविलें तरी राजानें एक दोन तऱ्हेनें आपला हट्ट न सोडण्याची इच्छा दर्शविली, त्यावेळेस **ब्रिटिश** सरकारानें त्यांस बरीच धास्ती घालून ताळ्यावर आणलें.

स० १८६४ त राजा **बनायसिंग** मेला. तो मेल्यावर मुसलमान प्रधानानीं त्याचा मुलगा **सिवदिनसिंग** याजवर आपली छाप बसविली. हें **रजपूत** लोकांस न आवडून ते उठले आणि त्यांनीं बंड करून त्यांस हांकून लाविलें. याजबद्दल प्रधान मंडळास **बनारस** येथें नजर कैदेंत राहण्याचा हुकूम झाला आणि **अलवारास** एक

पोलिटिकलएजंट नेमून त्याच्या मदतीनें कौन्सिल रीजन्सीनें राजा मोठा होईपर्यंत काम करावें असें ठरलें.

स० १८६७ त तरूण महाराज, कलकत्यास गेले, तेव्हां व्हाईसराय गव्हरनर जनरल हे राजाची तीव्र बुद्धि व हुशारी पाहून फार खुष झाले आणि त्यांस असें सांगितलें कीं, अलवारास कांहीं गडबड वगैरे झाल्यास इंग्रज सरकाराची मदत वेळेवर मागा; ह्मणजे सर्व तजविज करून देऊं. परंतु त्याच वर्षी महाराजांवर त्यांचा एक मुसलमान गुरू मारल्याचा आरोप आला होता. जरी या खुनाबद्दल अनिरूपणें महाराजांवर आरोप आला नाहीं, तरी त्यांचा वहीम पूर्ण होता. पुढें लौकरच त्यानें आपल्या ठाकूर लोकांशीं बेबनाव केला आणि जयपूरच्या राजाशीं अयोग्य वर्तन आरंभिलें. या वेळीं ब्रिटिश एजंट येथें नसावा, असें या राजास वाटे व तो मनापासून एजंट साहेबाचा तिटकारा करी. महाराजास त्याच्या कृत्याचें पूर्ण प्रायश्चित भोगावें लागेल हें त्याला एजंटानें सांगितलें होतें; परंतु महाराजानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं, ह्मणून गव्हरनरजनरल यांनीं त्याला राज्याचें स्वामित्व व पोषाख दिला नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं एजंटाच्या शिफारसी वरून महाराजाची सुधारणा झाली, असा जेव्हां रीपोर्ट झाला त्या वेळीं त्यांस तो पोशाख कांहीं दिवसांनीं दिला. या महाराजास दत्तकाचा अधिकार आहे. यास १६ तोफांची सलामी आहे. स० १८७४ त महाराज शिवदिनसिंग मेला, त्याला मुलबाळ कांहींएक नव्हतें. त्याच्या मागून मंगळसिंग हा गादीवर बसला. राज्य कारभार हल्लीं बरा चालला आहे.

**भाग पहिला प्रकरण महावें समाप्त.**

4

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण सातवें.

## बुंदी.

याचें क्षेत्रफळ २२९९ चौरस मैल आहे लोकसंख्या २,२९,१०० आहे आणि वसुल ९,००,००० आहे.

स० १३४२ त **रावदेव** यांनीं **बुंदी** शहरची स्थापना केली. **रावदेव** हा हिंदूलोकांच्या दंतकथे प्रमाणें **अग्निपालचे कुलांतीलहोय. रावदेवाचे** आलीकडील पुर्वजांवर **मुसलमानांची** धाड बसली; तेव्हां ते संधी साधून **मेवाडांत** पळून गेले. स० १३४२ त **रावदेव** तेथन निघून **बुंदीच्या** खोऱ्यांत येऊन राहिला आणि तेथें त्यानें **बुंदी शहर** वसविलें. तेथील लोकांची बरीच सुधारणा करून त्यांनें त्या देशास **हारावती** ह्मणजे **हाराचा** प्रदेश असें नांव दिलें. **रावदेवा** पासून **रावसर्जुना** पर्यंत २०० वर्षें गेलीं. या मधल्या अवकाशांत **हारावतीचें** राज्य जरी स्वतंत्र होतें, तरी ते **उदेपूरचे** संस्थानिक ह्मणवीत व त्यांस लागेल त्या वेळेस मदत करीत.

स०१५३२ त **रावसर्जुन** हे गादीवर बसले. त्यादिवसापासूनची हकीकत विशेष लक्षांत ठेवण्या जोगी आहे. यानें त्याच्या कनिष्ट बंधूच्या शाखेंतील **जो सवंतसिंगा** च्या योगानें प्रसिद्ध झालेला **रणवरचा** किल्ला तो आपल्या ताब्यांत करून घेतला. **अकबरबादशाहाच्या मनांत** हा **किल्ला** आपलेकडे असावा असें होतें. त्यानें सर्व **राजपुतान्यांत** जय मिळविले व **चितोरची** नष्टावस्था करून

टाकली; परंतु या **रणथंबोर** किल्याच्या संबंधानें त्याचें कांहीं चाललें नाहीं. लढाईनें कांहीं चालत नाहींसें पाहून गोडीगुलाबीनें व सामोपचारानें तो किल्ला मिळविण्याचें त्यानें मनांत आणलें. **जयपूरचा** राजा **मान** यास "**रणथंबोर**" किल्यांत जाण्याचा हक्क होता. राजा **माना** बरोबर **अकबर** भालदाराचें सोंग घेऊन किल्या मध्यें गेला. नंतर हाच **अकबरबादशाह** असें **मान** यास कळल्यावर त्यानें त्याचा आदरसत्कार चांगला ठेविला. नंतर **अकबरानें** आपली इच्छा प्रदर्शीत केली. **अकबर** ह्मणाला- मला **रणथंबोरचा** किल्ला द्याल तर मी **बुंदीच्या** राजांस मोंगलाच्या घराण्यांत मुलगी देण्याचा जो नियम आहे तो माफ करीन आणि तुमच्या विरुद्ध किंवा तुह्मांला ज्या अनेक राज्याच्या गोष्टी मुसलमानांच्या प्रभुत्वामुळें कराव्या लागतात त्या सर्व मी बंद करीन. तुह्मांस माझ्या **दिवाणखान्यांत** हत्यारासह येण्याची परवानगी देईन. तुमच्या **देवांच्या देवळांचा** मी बहुमान करीन. तुमच्यावर कोणीही अधिकारी न ठेवितां तुह्मांस स्वतंत्र करीन. तुमच्या "**घोड्यांच्या कपाळावर बादशाहाचे नांवाचा जो डाग देतात तो मी देणार नाहीं**" तुमचीं **वाद्यें** शहरांतून वाजावण्याची परवानगी देईन आणि ज्या प्रमाणेंच **अकबराची दिल्ली** अशी तुमची **बुंदी** करीन. फार काय, पण हे **सर्जुनहारा** मी तुह्मांला १२ परगणें देतों. त्यांचा तुह्मीं खुशाल वसूल घ्यावा. मी त्याची चौकशी सुद्धां करणार नाहीं. हें सर्व **सर्जुनहारानें** कबुल केलें आणि तेथेंच सर्व ठराव झाले.

**सर्जूनला उदेपूरच्या** संस्थानांतून काढून बुंदीचे **रावराजे** असा किताब दिला. **सवंतसिंगास** किल्ला देणें

अयोग्य वाटल्यावरून त्यानें आपली मालकी **अकबरास** द्यावी त्यापेक्षां लढून मरावें हें बरें, असें समजून तो लढून मेला. **सर्जुनसिंगानें अकबराची** चांगली कामगिरी बजावली, ह्मणून त्याबद्दल त्याला **बनारस** आणि **चुनार** हे दोन परगणे दिले. **सर्जुनसिंग बनारसेस** रहात असे. त्यानें आपल्या कारकीर्दींत प्रजेस फार सौख्य दिलें. त्याचे राज्यांत शरीर व मालमत्ता यांचें चांगलें रक्षण झालें. त्यानें **बनारस** शहर फारच सुशोभित केलें. तेथें निरनिराळ्या सार्वजनीककामाकरितां ८०४ चांगल्या इमारती व वीस मजबुत पाठशाळा बांधिल्या. त्याच्या मागून **राजाभोज** हा गादीवर बसला. गुजराथच्या स्वारींत रावभोज आणि त्याचा बंधु हे दोघे **अकबराबरोबर** होते. **रावभोज** यानें तर **अकबरास** लढाईंत फारच चांगली मदत दिली. एके वेळेस तर शत्रूच्या सैन्यास यानें आपल्या हातानें मारलें. स० १६०५ त **अकबर** मरेतोंपर्यंत तो **अकबराचे** लष्करांत पडून राहिला होता. **अकबर** मेल्यानंतर तो आपल्या राज्यांत आला आणि पुढें लौकरच मेला. त्यास १ **रावरतन**, २ हृद**नारायण**, आणि ३ **केशवदास**, असे तिन मुलगे होते. **शाहाजहानानें** आपल्या बापाविरुद्ध बंड केलें होतें. तेव्हां **रावरतननें** आपल्या **बापा**प्रमाणें इमान स्मरून आपले दोन मुलगे **माधवसिंग** आणि **हरी**, यांसह **भरतपूर** येथें **बादशाहाचे** सैन्यास मदत केली. या लढाईंत **शहाजहानाचा** पराभव होऊन त्यास पळावें लागलें. त्या लढाईच्या प्रसंगांत **रावरतनच्या** दोन मुलांस मोठ्या भयंकर जखमा लागल्या. **बादशाहानें रावरतनास** त्याचे आणि त्याच्या मुलांचे इमानीपणाबद्दल **भरतपूरचें** राज्य

बक्षीस दिलें. दुसरा मुलगा माधवसिंग यास कोटा संस्थानासह वंशपरंपरेनें तेथील प्रदेशाचें राज्य उपभोगण्यास दिलें.

**कोटा** आणि त्याच्या ताब्यांतील **संस्थानें हीं** हारावतीच्या मुलखांपैकींच होत. **बादशाहाच्या** या कृत्यानें हारावतीचे दोन विभाग होऊन ते निरनिराळ्या दोन राजांच्या हातांत गेले. आतां, जरी हे प्रथमतः सख्खे बंधु होते, तरी कालांतरानें त्यांचा संबंध फार दुरावत चालला. **रावरतन** मोठा पाणीदार होता. त्याची सर्व लोक स्तुती करीत. तो जिवंत असतां जेथें हिंदू रहात होते, त्या जागेंत गोवध करण्याची मुसलमानांची आज्ञा नव्हती. त्याचे राज्यांत सर्वत्र शांतता असे. त्यानें **रतनपूरची** स्थापना केली; व आपल्या पराक्रमाचे योगानें आपला जुना **उदेपुरचा** स्वामी जो **राणा** त्यास संतुष्ट केलें. त्याचे मागून **चतरसाल** हा गादीवर बसला.

**रावचतरसाल** यास शाहाजहानानें **दिल्लीचा** मुख्य अंमलदार केला होता. दक्षिणेतील **औरंगजेबाच्या** स्वारीत तो **औरंगजेबाबरोबर** होता. जरी हा **औरंगजेबाचे** हाताखालीं होता, तरी शहाजहान आजारी पडला तेव्हां त्याच्या चार मुलांनीं राज्यकारभाराविषयीं जेव्हां गर्दी केली तेव्हां **औरंगजेबानें** पुष्कळ निषेध केला तरी त्यास न जुमानतां तो **शहाजहानाकडे** गेला. लगेच **बुंदीच्या** रावांनीं आपले हारा लोक बरोबर घेतले. त्या लोकांनीं रेशमाचे पोषाक केलेले होते. अशा लोकांनिशीं बुंदीचे राव धोलपूरचे लढाईंत **दाराशेखचे** सैन्याचे अघाडीस होते. लढाई मोठ्या निकरानें चालली असतां कपाळांत एक गोळी लागून **राव** पडले. त्याचा

मुलगा **भरतसिंग** यानें आपला प्रियकर बाप पडला तरी यत्किंचित्‌ही धैर्य न सोडतां तशाच जोरानें लढाई पुढें चालविली; परंतु दुर्दैवानें तो आणि त्याचे मोठमोठे पराक्रमी वीर त्या रणांत पडले. हीं लढाई स० १६५८ त झाली. या लढाईंत **औरंगजेबास** राज्य मिळालें.

**चतरसालानें** इमानानें **औरंगजेबास** न मीळतां **शाहाजहानाचे** तर्फे लढून प्राण सोडला, याचें प्रायश्चीत **औरंगजेबानें** त्याचा मुलगा **रावभाऊ** यास दिलें. **शिवपूरचा** राजा **आत्माराम** यास **औरंगजेबानें** आपल्या बापाच्या तर्फेनें लढणारी व चांगली शिकलेली व शूर अशी **हारा** लोकांची जात नाहींशी करून टाकून बुंदीचें राज्य **रणथंबोरच्या** राज्यास जोडण्यास सांगितलें. **आत्मारामानें** मी हें काम करितों असें सांगून त्या कामास आरंभ केला व प्रथम त्यास यशही आलें, परंतु शेवटीं शेवटीं हारा लोक संतापले. त्या सर्वांनीं एक मत करून, मोठ्या शौर्यानें आणि पराक्रमानें त्याच्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला. त्यांस हांकून लावलें आणि इतक्यानेंच तृप्त न होतां **आत्मारामाची** राजधानी जी **शीवपूर** त्यासवेढा घालण्यास गेले. **हारा** लोकांचा हा पराक्रम, शौर्य व पाणी पाहून **औरंगजेबानें** **रावभाऊस** त्याच्या सर्व अपराधाची क्षमा केली. त्यानें त्यास दरबारांत बोलावून **औरंगाबादेच्या** सुभेदाराची जागा दिली. **औरंगाबादेस** **रावभाऊनीं** पुष्कळ सार्वजनीक इमारती बांधल्या आणि आपल्या पराक्रमानें व दातृत्वानें भक्तिपुरःसर प्रजा रक्षणाविषयीं सप्रेम अंतःकरणाच्या योगानें तेथील लोकांमध्यें कीर्ति संपादन केली.

स० १८८२त हा राजा मेला. त्याला मूलबाळ कांहीं-एक नव्हतें.त्याच्या मागून त्याचा भाऊ भीम याचा मुलगा अनुरोधराव हा गादीवर बसला. औरंगजेबानें अनुरोधरावास राजाचा वारस कबूल केला आणि त्याच्या पूर्वीचा रावभाऊ वगैरे यांस आपण किती मानतों हें दाखविण्यासाठीं त्यानें गादीवर बसविण्याचा पोषाख आपल्या हातीं त्याकडे पाठविला. अनुरोधराव हा दक्षिणेच्या लढाइ मध्यें नेहमीं औरंगजेबाबरोबर असे. एके समयीं तर त्यानें औरंगजेबाच्या अंतःपुरांतील स्त्रिया शत्रूच्या हातीं लागल्या होत्या, त्यांस शत्रूच्या दाढेतून सोडून आणाविलें. बादशहानें या त्याच्या पराक्रमाबद्दल आपणास काय बक्षीस पाहीजे ह्मणून अनुरोधास प्रश्न केला. त्यानें आपल्या रजपूतांच्या जातीस जें शोभेल तेंच मागणें मागितलें. त्यानें असें सांगितलें कीं, महाराज, मी सैन्याच्या पिछाडीस असतों. तर तसें न करितां मला सैन्याचे अघाडी उभें करून नेहमीं युद्धाचें अग्रेसरत्व द्यावें, हेंच माझें मागणं आहे. त्यानें आपला पराक्रम व शौर्य विजापूरच्या वेढ्यांत आणि नंतर पंजाबच्या लढाईंत दाखविलें. उत्तरेकडील राज्याचें स्वामित्वाचा अंगिकार करण्यासाठीं पंजाबांत ज्या लढाया चालल्या होत्या; त्या लढायांत शेवटीं त्याचा प्राण गेला. त्याच्या मागून त्याचा मुलगा बुधसिंग हा गादीवर बसला.

औरंगजेब मेल्यानंतर गादीविषयीं त्याच्या मुलांत तंटे सुरू झाले, तेव्हां बुधसिंग यानें बाहादुरशाहाचा पक्ष घेतला होता. बादशाहास जाजाओ येथें जो जय मिळाला तो केवळ बुधसिंगाच्या पराक्रमानें व शौ-

यानें मिळाला. त्या लढाईंत **बुधसिंग** नें जें शौर्य, पराक्रम व दृढ निश्चय दाखविला त्याबद्दल **बादशाहानें बुधसिंगास राजा** हा **किताब** दिला आणि त्या दिवसापासून त्याचा आणि बादशाहाचा "**जिवश्चकंठश्च स्नेह**" जुळला.

**महंमदशाहा** मेल्यानंतर पुन्हा जे गृहकलह सुरू झाले. त्यांत हारा लोकांचे **राजांनीं** आपलें पूर्वजांचें इमान स्मरून बादशाहाचे वंशजांच्या पक्षानें **सय्यद बंधूंशीं** जिवावर उदार होऊन मोठमोठ्या लढाया मारल्या. त्या **सय्यद** लोकांचा पक्ष बलाढ्य झाल्याकारणानें **राव बुंदीस** परत येतो, तो त्याचा मेहुणा **जयपूरचा** राजा **जयसिंग** यानें आणि त्याचें युद्ध सुरू झालें. **जयपूरच्या** राजानें कांहीं घरगुती कलह मनांत आणून त्याचा सूड उगविण्यासाठीं आणि **राजपुतान्यांतील** लहान लहान संस्थानांवर आपलें स्वामित्व राखण्यासाठीं त्यानें बुंदीच्या राजाची **रावराजा** ही पदवी काढून **करवलीच्या** राजास दिली. त्यानें **जयसिंगास** व **बुधसिंगास** जाळ्यांत अडकविण्याचा बेत केला होता; परंतु राजा फार धूर्त व धैर्यशाली असल्यामुळें त्याचें कांही चाललें नाहीं.

**बुधसिंगानें** आपल्या वाडवडीलाचें उत्पन्न मिळावें ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले; पण ते सर्व व्यर्थ झाले. हा संकटांत पडला असें पाहून बुंदीच्या पुष्कळ जमिनी जप्त करून **कोटा** संस्थानांत दाखल केल्या. **बुधसिंगास** तेथून हांकून दिलें होतें. राजा **जयसिंग** यानें **बुधसिंगाचे** मुलांसही तेथून हांकून लाविलें; परंतु राजा मेल्यानंतर स० १७४४ त वडील मुलगा गादीवर बसला. त्याचें वय १३ वर्षांचें होतें. त्यानें घोडेस्वार जमा

करून बुंदीचा मोठ्या स्वामित्वाचा प्रदेश काबीज केला. राजा उमेद यास कोट्याचा नवा राजा दुर्जनसाल यानें मदत केली. या दुर्जनसालास जयपूरच्या राजानें पाणी लावण्याचा बेत केला होता. यासंबंधानें त्यानें पुष्कळ संग्राम केले. राजा उमेद यानें आपल्या पराक्रमानें व शौर्यानें आपलें गतराज्य संपादन करून आपणास राव असें पद लोकांकडून कबूल करविलें. उमेद १४ वर्षें राज्यभ्रष्ट होता. त्यापुढें उमद ९१ वर्षेंपर्यंत जगला होता. जयपुरास त्याला खंडणी द्यावी लागे, यामुळें त्याच्या अंगाचा तिळपापड होई. त्यांतून मराठे लोकांच्या स्वाऱ्या तर एकसारख्या चालल्या होत्या; त्यामुळें त्याचा उत्साह अगदीं लयास गेला.

उमेद याशीं त्याच्या एका सरदारानें बेइमानीपणा केला होता. त्याचासूड उगविण्यासाठीं त्यानें विश्वास घात केला. हें विश्वास घाताचें कृत्य त्याच्या मनांतून जाईना. तो तत्पापक्षालनार्थ स० १७७१ त राज्यपद सोडून देऊन यात्रा करण्यासाठीं निघाला. त्याला श्रीजी ह्मणत. त्यानें हिंदुस्थानांतील सर्व पवित्र क्षेत्रांचें दर्शन केलें. उमेद यात्रा, व तीर्थ वासकरीत असतां त्याचा मुलगा मेला. तेव्हां नातवाला शिक्षण देण्यासाठीं त्याला बुंदीस जाणें भाग पडलें. त्यानें ८ वर्षें त्याच्या शिक्षणाविषयीं दक्षता राखून स० १८०३ त तो मेला, मागून त्याचा नातू बिशनसिंग हा गादीवर बसला. तो मोठा प्रामाणिक, पापभीरु व महत्वाकांक्षी होता. त्यानें सर्व विषयसुखाचा त्याग करून मृगया हीच आपली उपभोग व आनंददायक करमणूक केली होती. तो सिंहाच्या अरण्यांत त्याच्या नियमितजागीं रात्रंदिवस

त्याची वाटपहात बसे. एकदां तो शिकारीस गेला आणि सिंहाच्या शिकारीच्या नादीं लागला ह्मणजे त्याला सिंहाला मारल्या वांचून चैन पडत नसे. त्याला सिंहाखेरीज इतर शिकार कधींही आवडत नसे. तो ह्मणे जो मर्द आहे, त्यानें गरीब हरणांच्या पाठीस न लागतां सिंहासारख्या पशूचीच शिकार करावी. त्यानें अगदीं आपल्या स्वतःच्या हातानें १०० रांवर सिंह मारले. वाघ, चित्ते, रानडुकर, यांची तर गणतीच नाहीं.

स० १८१८ ल्या तहान्वयें बुंदी संस्थान इंग्रज सरकारच्या आश्रया खालीं घेतलें. स० १८२१ च्या मे महीन्याच्या १४ तारखेस विशनसिंग मेला. त्याच्या मागून त्याचा वडील मुलगा रामसिंग हा बारा वर्षांचा होता तो गादीवर बसला. त्यानें राज्याचा उपभोग घेऊन ९ वर्षें झालीं नाहींत, तोंच त्याच्या आणि जोधपूरच्या मध्यें मोठें तुंबळ युद्ध होण्याचा प्रसंग आला. तो केवळ इंग्रजसरकार वर होतें ह्मणूनच थांबला. जोधपूरचीराजकन्या रावास दीली होती. जोधपुरच्या राजकन्येस सासरीं जाच फार करीत. ह्मणून स० १८३० च्यामे महीन्यांत जोधपुराहून ३०० लोकांसह कोणी एक बडा अंमलदार राणीला जाच होऊं नये. ह्मणून समजूत घालण्यासाठीं शहरा बाहेर उतरला होता. तेथें उतरून तीन दिवस झाले नाहींत तों तिसऱ्या दिवशीं किशनराम नामक बुंदीचा मोठा उमदा शाहणा आणि निष्कलंक किर्तिमान दिवाण यास जोधपूरच्या लोकांपैकीं कांहीं लोकांनीं ठार केलें. हें पाहून बुंदीच्या रावास फार राग आला आणि काय होईल तें होवो, पण याबद्दल जोधपूर

वाल्यांना कडक शासन करावें असा त्यानें निश्चय केला. जोधपूरच्या लोकांनीं जेथें आपला तळ देऊन तट बंदी केली होती; त्यावर तीन दिवस एकसारखा तोफांचा भडीमार केला आणि त्याच्या भोंवती वेढा घालून त्यांचा दाणापाणी बंद केलें. दिवाणाला मारण्याच्या कामीं जे दोघे पुढारी होते त्यांस व रावराजास जे कोणी या कामांत प्रमुख वाटले त्यांस धरून सर्व लोकां समक्ष रावराजानें त्यांचें बरेंच पारिपत्य केलें व पुढें बऱ्याच दिवसांनीं हा दंगा शांत झाला. यांस दत्तकाचा अधिकार आहे. यांस १० तोफांची सलामी आहे. हल्लीं राज्य व्यवस्था चांगली आहे.

भाग पहिला प्रकरण सातवें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण आठवें.

## कोटा.

याचें क्षेत्र फळ ४३३९ चौरस मैल आहे. लोक संख्या ४३,३९०० आणि उत्पन्न २८००००० आहे.

कोटा ही बुंदीची शाखा होय. दिल्लीचा बादशाहा जहांगीर यानें राव रतनचा दुसरा मुलगा माधवसिंग यास कोटा आणि त्याच्या ताब्यांतील संस्थानें हीं बक्षीस केलीं होतीं. तीं सर्व संस्थानें मिळून ३६० होतीं. त्यांचें वार्षीक उत्पन्न २००००० रुपये होतें.

माधवसिंगानें ७ वर्षें राज्य केलें. त्यानें माळव्यापर्यंतचा आणि दुसरे कडे बुंदीच्या सीमे पर्यंत सर्व प्रदेश

जिंकून आपल्या राज्यास जोडला. त्याच्या मागून त्याचा वडील मुलगा **मोकंदसिंग** हा स० १६५७ त गादीवर बसला. त्याच वर्षीं **शहाजहान आजारी** पडला व त्याच्या राज्यकारभाराविषयीं आपआपसांत पुष्कळ तंत्रळ युद्धें झालीं. **मोकंदसिंगानें** आपलें पूर्वजांचें इमानीपणाचें **ब्रीद** मनांत आणून वडील मुलाचा पक्ष घेतला.

स० १६५८ त **उज्जनीच्या** लढाईंत **मोकंदसिंग** व त्याचे चार बंधु हे लढाईंत मरूं किंवा जिंकूं हा निश्चय करून रेशमी रंगाचे पोशाख घालून रणभूमींत आपल्या सैनीकांचे अग्रेसर झाले. **यशवंतसिंगाच्या** साहसानें लढाईंत या बंधुपंचकास जय मिळाला नाहीं. याचे हे बंधु समरांगणांत घुसून शत्रूच्या अंगावर तुटून पडले. त्यां पैकीं सर्वांत धाकटा **किशोरसिंग** याला मृतावस्थापन्नास्थितींतून घरीं घेऊन गेले, त्या वेळेस त्याचें शरीर जखमांनीं फारच व्याप्त झालें होतें. तो कांहीं दिवसांनीं बरा झाला. नंतर **जगतसिंग** हा राज्यावर बसला. **बादशहाच्या** दक्षिणेंतील स्वाऱ्यांस त्यानें पुष्कळ प्रकारचें साह्य केलें.

**मोकंदसिंगाचा** मुलगा त्याचे मागून गादी वर बसला. त्यानें १२ वर्षें राज्य केलें. तो दक्षिणेंत **बादशहाचे** सैन्याबरोबर असे. ह्मणून त्याच्या मागून त्याचा चुलतभाऊ **पेमसिंग** हा गादीवर बसला, परंतु तो फारच मुर्ख होता; ह्मणून सरदारांनीं त्यास काढून त्याचे जागीं **उज्जनीच्या** लढाईंत मोठ्या चमत्कारानें बचावलेल्या **जगतसिंगास** गादीवर बसविलें. त्यानें मोंगल **बादशाहाच्या** पुष्कळ कामगिऱ्या बजाविल्या व आपले

अद्वितीय शौर्य आणि पराक्रम त्या सर्वांस दाखविला. विजापूरच्या वेढ्यांत त्याची फारच कीर्ति झाली. तो अर्काटच्या किल्याच्या वेढ्यांत मरण पावला. त्याच्या मागून त्याचा दुसरा मुलगा **रामसिंग** हा गादीवर बसला. दुसरा मुलगा गादीवर बसण्याचें कारण पहिल्या मुलानें बापा बरोबर दक्षिणेंत लढायीस जाण्याचे वेळीं बरोबर येण्यास कुरकुर केली, ह्मणून तो वारस होण्यास योग्य नाहीं, असें सर्वत्रांनीं ठरविलें होतें.

**अवरंगजेबानंतर** त्याच्या मुलांमध्यें राज्यसंबंधीं छोटीशी एक लढाई झाली होती. त्यांत **रामसिंगानें** राजपुत्र आझीम याचा पक्ष घेतला होता. त्याच्या पक्षानें लढत असतां त्यानें त्या लढाईत आपली प्राणाहुती दिली. स० १७०७ मध्यें त्याच्या मागून **भीमसिंग** व **सय्यद** आणि **बादशाचे** पुत्र ह्यांच्या मध्यें ज्या लढाया झाल्या, त्यांत यानें **सय्यदांचा** पक्ष घेतला होता; त्या बद्दल **सय्यदानें** मोठमोठीं बक्षिसें दिलीं. त्यानें **बुंदी** येथें जी त्याच्या घराण्याची ज्येष्ट शाखा होती, तीस **बुंदींतून** हांकून देण्याचे कामांत **जयपूरच्या जयसिंगास** मदत केली. त्यानें आपल्या राज्यास पुष्कळ मुलूख जोडले. त्यान **भिल्ल** लोकांस हांकून देऊन त्यांचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला. तो दक्षिणेचा सुभेदार '**निजामउलमुल्क**' ज्याला **अझोफखान** किंवा **किलिचखान** ह्मणत होते; त्याला धरण्याच्या कामांत मारला गेला. **कोट्याच्या** राजांपैकीं "**पांच सहस्र सेनाधिपती**" ही **पदवी** प्रथम राजा **भीम** यास मिळाली.

सर्व वंशांत **माहाराव** ही पदवी सुद्धां **भीमसिंगास**च प्रथम मिळाली. ही पदवी रजपूताधीश जो **उदेपूरचा**

**राणा** यानें दिली, व **बादशहानेंही** मान्य केली. त्याच्या मागून वडील मुलगा **अर्जुनसिंग** हा गादीवर बसला. यानें ९ वर्षें राज्य केलें. यास मूलबाळ कांहीं एक नव्हतें. ह्मणून या गादी विषयीं पुष्कळ लढाया झाल्या. त्यांत कोट्याच्या राज्यांतून **रामपूर, भानपूर,** आणि **कालापत,** हे मुलूख मात्र कमी झाले. या लढायांत **सैमसिंग** नांवाचा एक मनुष्य मेला. हा पूर्वीच्या राजाचा भाऊ होता.

तिसरा भाऊ **दुर्जनसाल** उरला त्याला कोणी प्रतिस्पर्धि नव्हते; तो पुढें लवकरच गादीवर बसला यामुळें **महंमदशहानें** त्यास वारस कबूल केलें व त्याला दरबारांत **वस्त्रें** दिलीं. **दुर्जनसाल** हा मोठा राज्यकारस्थानी होता. त्यानें मराठ्यांचा मोठा प्रसिद्ध सेनापति जो **बाजीराव** त्याच्याशीं मैत्री केली. **बाजीरावानें** त्यास त्याच्या कामगिरी बद्दल **नहरगड**चा किल्ला बक्षीस दिला. जसें त्याच्या बापानें **जयपूरचा** राजा **बुंदीच्या** घराण्यास तेथून हांकून देण्याच्या कामांत गुंतला असतां **बुंदीच्या** आपल्या वडील घराण्यास मदत न देतां उलटें अनिष्ट केलें; तसें न करितां त्यानें **बुंदीच्या** घराण्यास मदत केली आणि जेव्हां स्वतःच्या **कोट्यावरही बुंदी** मारखाच प्रसंग येऊन बेतला; तेव्हां त्यानें इतक्या शौर्यानें आणि पराक्रमानें दमधरून युद्ध केलें कीं; त्या वेळेस शत्रूचें कांहीं एक चालेना; परंतु शेवटीं त्याला मराठ्यांचें सार्वभौमत्व स्वीकारून **हाळकराला** खंडणी द्यावी लागली.

**दुर्जनसाल** यास संतान नव्हतें. त्याच्या मागून **आजितसिंग** हा गादीवर बसला यालाच राजाराम

सिंगानें लढाईस न आल्या कारणानें बेवारस ठरविलें होतें. त्यानें २ वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा मुलगा **चतरसाल** हा गादीवर बसला. **चतरसालचा** दिवाण **झलीमसिंग** हा या वेळेस अगदीं तरुण होता. **चतर-सालच्या** कारकीर्दींत **जयपुरकरानीं** त्याच्या राज्यावर हल्ला केला; त्यांत **चतर सालानें जयपूरचा**मोड केला. ही गोष्ट स० १७६१ त झाली. त्या लढाईचा प्रकार असा पहिल्यानें एका मागून एक **जयपूरचीं** पलटणें आलीं, त्यांनीं '**चंबला**' नदीच्या लगतचें रक्षण करण्या-साठीं जे लोक ठेवले होते, त्यांवर छापाघातला आणि तसेच विजय करीत करीत बरेच लांब पर्यंत गेले. त्याठिकाणीं ५००० लोक त्यांचा समाचार घेण्यास तयार होते. या एवढ्याशा लोकांच्या हातून काय होणार आहे? असें, समजून ते लोक आपल्याच जया विषयीं यत्किंचीतही मनांत संशय न आणितां त्यांच्या वर तुटून पडले. एक वेळानव्हे, दोन वेळानव्हे, परंतु तिसऱ्या वेळीं सुद्धां मोठ्या शौर्यानें त्या **जयपूरच्या** लोकांस **हारा** लोकांनीं मागें हटविलें. ४ थ्या वेळीं **जयपूरच्या** वीरांचे अंगात वीरश्री येऊन ते मोठ्या निकरानें लढले. बराच वेळपर्यंत कोणाचा जय होतो हें मुळींच कोणास कळेना **झलीमसिंग** मोठा हुशार व समय चतुर असल्या का-रणानें यावेळेस **कोट्यास** जय मिळाला. त्याच वेळेस **मल्हा-रराव होळकर पानिपतच्या** लढाईतून परत येत होता, त्या वेळीं **जयपूरवाल्यांत** व **कोटेवाल्यांत** कांहीं अंतर नव्हतें दोघांनीं फार विनंति केली, तरी तो कोणाकडे मिळाला नाहीं. या लढाईच्या शेवटीं **झलीमसिंगास** एक कल्पना सुचली. ती अशी कीं, आपण **मल्हारावांकडे**

जाऊन त्यास जयपूरच्या सर्व सैन्यास दे माय धरणी ठाय होऊन ते पळताहेत तों त्यांची जागालुटावी, असें सांगावें. त्या प्रमाणें त्यानें केलें व तें ऐकतांच त्यानें हो ह्मटलें. जयपूरच्या लोकांस पुढें समजलें. व ते लोक घाबरून पळाले.

यानंतर चतरसालानें फार दिवस राज्य केलें नाहीं. त्याच्यामागून त्याचा भाऊ गोमनसिंग हा गादीवर बसला. हा राजा गादीवर बसला तेव्हां तरुण असून मोठा बुद्धिमान् व शक्तिमान् असा होता. हा रजपूतांच्या राज्यनौकेस सर्व वावटळें व तुफानें यांतून पार पाडण्याजोगा होता; परंतु ह्याला दैव अनुकूल नव्हतें.

राजानें झलीमसिंगास प्रधानाचे जागे वरून काढून टाकलें. झलीमनें कोटा संस्थान सोडून देऊन उदेपूरचा राजा उर्शी याकडे प्रयाण केलें. तेथें पाहतो तों राजा एका देलवाडी नांवाच्या संस्थानिकाचें रक्षणाखालीं असल्यामुळें त्याची किर्ती फार पसरली होती; यामुळें तेथें त्याचा बराच बहुमान झाला. त्यानें मोठ्या साहसानें उदेपूरच्या राजास देलवाड्याचे बंधांतून मुक्त केलें. या साहसाचे योगानें देलवाडचा संस्थानिक मेला. नंतर पुढें बंड झालें. त्या लढाईत झलीमसिंगास कैद केलें. तो आबाजी इंगळ्याचा बाप त्रिंबकराव याचे ताब्यांत जाऊन पडला. पण पुढें त्याची आणि त्रिंबकरावाची मैत्री जुळली त्यामुळें झलीमसिंग बंधमुक्त होऊन कोट्यास परत आला. नंतर एके दिवशीं योग्य समयीं त्याची आणि राजाची गांठ पडली तेव्हां राजानें सर्व अपराधांची क्षमा करून त्याला पुनः अधिकारी केलें.

झलीमसिंगास पुनः जवळ ठेविलें याचें खरें कारण निराळेंच होतें. मराठे लोकांच्या कोटा संस्थानावर एक-

सारख्या स्वाऱ्या चालल्या होत्या; तेव्हां राजाला त्यांचें निवारण करण्याची युक्ती सुचेना. मराठे लोकांस ६ लाख रुपये दिले तेव्हां त्यांनी दमखाल्ला. मराठ्यांनीं दम खाऊन थोडे दिवस जाहले नाहींत तोंच राजा **गोमसिंग** मरण पावला. त्यानें मरण्या पूर्वी आपला लहान मुलगा **उमेदसिंग** याचे पालन करण्यास **झलीमसिंग** यास नेमिले होते.

**उमेदसिंग** यास **महाराव** असा **किताब** दिला होता परंतु वास्तविक सत्ता **झलीमसिंग** याचे हातीं होती. हा मोठा चमत्कारीक मनुष्य असुन मोठा चाणक्ष असल्यामुळें राजनीति कुशल असा होता. त्याला कामाचा पोंच फार चांगला असे हा मोठा धीट असल्या मुळें कोणतीही अडचण आली असतां तींतून कसें पार पडावें ह्या विषयीं परमदक्ष असे. त्यानें ४५ वर्षे राज्यकारभार चांगल्यारितीनें केला. त्याच्या कारकिर्दीस **मराठे मुसलमान व रजपुत** हे तिन्ही लोक मोठा मान देत. जिकडे तिकडे लुटालुटी, दंगे धोपे व मारा माऱ्या सुरू होत्या. अशा वेळीं **कोटा** येथें शांतता असून जिकडे तिकडे आबादानी होती यावेळेस **कोट्याच्या** जवळचीं सर्व संस्थानें मोठ्या विपत्तींत होती. त्या पैकींच **बुंदी** ही होय. **बुंदीपासून** **झलीमसिंगानें इंदूरगड, बलवान्** आणि **अंतरडे,** हे मुलूख उपटले; ते अद्यापी त्याच्या कडेसच चालत आहेत. **झलीमसिंगास** या कामांत यश येण्याचें मुख्य कारण त्याचे धाडस आणि चातुर्य हें होय. सर्व लोक त्याच्या साध्या शद्वास शपथे पेक्षा जास्ती समजत.

स० १८०५ पासून ते स० १८१७ पर्यंत एकून एक ठराव व कामें ह्या सर्वांत **झलीमसिंगाची** मध्यस्थी

होती. या वेळेस **इंग्रज** सरकारानें राजपुतान्याच्या कारभारांतून आपला हात काढून घेतला होता. स० १८१७ त **इंग्रजसरकारानें** **पेंढारी**लोकांचा मोड करण्याचे मनांत आणलें. तेव्हां **झलीमसिंगानें** त्यास फारच मदत केली

स० १८११ त **कोटा** आणि **ब्रिटिशसरकार** यांच्यामध्यें तह झाला. त्यांत अडचणीच्या प्रसंगीं **इंग्रज** सरकारानें **कोटा** संस्थानास मदत देण्याचें कबूल केलें. मराठ्यांस जी खंडणी देत होतां ती आह्मांस द्यावी, असा इंग्रजसरकारानें **महारावाबरोबर** तह केला. त्यांत **इंग्रजसरकारास** लागेल तेव्हां स्वार पुरवावेत व **झलीमसिंगास** वंशपरंपरेनें दिवाण नेमण्याविषयीं, त्याचप्रमाणें दुसरीं कितिएक महत्वाचीं कलमें **झलीमसिंगास** अनुकूल होतीं; असें जरी होतें तरी **झलीमसिंगाची** ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होती कीं; **इंग्रजसरकारानें** संतुष्ट होऊन **होळकरानें** दिलेले ४ मुलूख **झलीमसिंगास** जाहागिर करून देण्याचें होतें, परंतु त्या स्वामिभक्तानें ते मुलूख कोट्याचे राज्यास जोडविण्यास सांगितलें. **महाराव उमेदसिंग** स० १८२० त मेला. त्या वेळीं सर्व प्रजा फारच दुःखित होऊन गेली होती.

नंतर **किशोरसिंग** गादीवर बसला. स० १८२० त **महाराव किशोरसिंग** यांनीं **कोटा** सोडून आपल्या सरदारांसहित **संस्थानिक** वगैरे जवळच्या राजे लोकांस मदतीस घेऊन **झलीमसिंगास** काढण्याचा विचार आरंभिला. राव ६,००० मनुष्यें घेऊन **जयपुराहून** कोट्यास जाण्यास निघाले. हें **ब्रिटिशसरकारास** कळल्यावर **त्यांना** फारच धास्ती पडली होती. पुढें लौकरच मंगरोळ येथें लढाई झाली. स० १८२१ त **महा-**

**राव** पराभूत झाले. त्या प्रसंगीं त्यांचे बंधु मेले आणि त्यांच्या जवळचे सर्व अनुयायी पळून गेले; तेव्हां **राव** हे फार काळजींत पडले आणि **नाथद्वारास** पळून गेले. नंतर कांहीं ठराव करून ते आपल्या राज्यावर बसले. परंतु त्यांच्या हातीं कोणतीच सत्ता नव्हती; त्यांची सत्ता त्यांच्या वाड्यांत मात्र ठेविली व बाकी राज्य सूत्रें अगदीं निराळीं ठेविलीं. एकंदर ३०० लोक त्यांच्या जवळ ठेविले होते, त्यांतूनही १०० लोक त्यांच्या हुकमांत असावेत असें ठरलें. **महाराजांनीं झलीमसिंग** वंशपरंपरेनें कारभारी असावा असें कबूल केलें होतें. **झलीमसिंगास राजाराणा** ह्मणत असत. तो स० १८२४ त मेला त्याच्या मागून **माधवसिंग** प्रधान झाला हा महा मूर्ख असून प्रधानकीस अगदीं अयोग्य होता.

स० १८२८ त **महाराव किशोरशिंग** मेला; त्या वेळीं कोणासही वाईट वाटलें नाहीं. त्याच्या मागून मदनसिंग हा गादीवर बसला, **मदनसिंग** आणि **माधवसिंग** यांचे कांहीं कारणानें वितुष्ट पडत चाललें आणि दिवसें दिवस तें वाढल्यानें शेवटीं स० १८३८ त ठरावा प्रमाणें **राजाराण्यास** जे वंशपरंपरेनें प्रधानत्व दिलें होतें ते सर्व ठराव रद्द झाले व पुढें **झलीमसिंगाच्या** मुलास **कोट्या-**पैकीं १२ लक्ष वसूलाचे ७ परगणे देऊन त्यास **झालवा-रचें** संस्थान असें नांव दिलें. अशी व्यवस्था झाल्यावर **कोट्याचा तह** पुनः बदलला, **महारावाचे** खंडणी पैकीं ८०० रुपये **झालवारवाल्यांनी** द्यावेत, आणि त्यांनीं स्वतः तीन लक्ष रुपयांचेवर खर्चाचें सैन्य ठेवावें असें ठरलें. हें **महारावानें** मोठ्या कष्टानें कबूल केलें. **महारावानीं** वारंवार ही गोष्ट काढून स० १८४४ त २ लाख रुपये

वर्षाचें कमी करविलें आणि जर खर्चाचा पुरवठा न आला तर कोठ्याच्या खंडणींतून देण्याचें कबूल केलें, या वेळेस महाराव असें ह्मणाले कीं, जर तुमचा पैसा वेळच्यावेळीं आला नाहीं तर सर्व खंडणीच्या पैशाबद्दल एकदम मुलूख घेतला जाईल.

स० १८९७ त कांहीं सैन्यानें एकाएकीं बंड करून पोलिटिकलएजंट व त्याचा मुलगा यांस हाल करून ठार मारलें. महारावसिंग यांनीं बंडाचा नाश करण्यासाठीं मुळींच खटपट केली नाहीं; इतकेंच नव्हे परंतु ब्रिटिशकामगारांना कोणत्याही प्रकारें समजाविलें नाहीं; या मुळें इंग्रजसरकारानें रागावून त्यांच्या सलामीच्या ४ तोफा कमी केल्या, येवढ्या मोठ्या अन्याया बद्दल त्या वेळीं एवढीच शिक्षा कां बरें केली? तर याचें कारण फार निराळें आहे. त्या वेळीं या ब्रिटिश कामगारांस फार भिऊन वागावें लागत असे. नाहीं तर एवढ्या अंमलदाराचा खून झाला, तरी त्या वेळीं या इंग्रजास गप्प बसावें लागलें व असें करणें हें त्या प्रसंगीं योग्य होतें. नाहीं तर हल्लींचा कायदा !!! पूर्वीचे राजे व त्यांची प्रजा मोठी राजभक्त होती व त्यांचें शौर्यही त्या वेळीं मोठें सतेज होतें; नाहींतर हल्लींचेही राजे आहेत. पुढें सर्व घोटाळा शांत झाल्यावर हे राजे व इंग्रज पुनः एकं मतानें वागूं लागले. नंतर लवकरच महाराजांना दत्तकाचा हुकूम मिळाला.

महारावरामसिंग स० १८६६ त मार्चच्या २७ तारखेस संध्याकाळीं मेले. त्यांचें वय त्यावेळीं ६४ वर्षांचें होतें. महाराव मेले तेव्हां गांवांत अशी बातमी पसरली कीं, त्यांची राणी महारावांबरोबर सती जाणार.

या बातमीवरून पोलिटिकलएजंटानें कडेकोट बंदोबस्त करून जनानखान्यावर जिकडे तिकडे पाहरे ठेविले आणि राण्याचे मृत्युची बातमी कळूं नये ह्मणून उत्तम बंदोबस्त केला होता. रावांचे राणीस ४ तास पावेतों मरणाची वार्ता मुद्धा कळविली नाहीं, ह्मणून सती जाण्याचा बेत राहिला. हल्लीं राज्य व्यवस्था चांगली आहे.

भाग पहिला प्रकरण आठवें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण नववें.

## टोंक.

याचें क्षेत्रफळ १८६४ चौरसमैल आहे. लोकसंख्या १८२६७२ आणि उत्पन्न ८२०००० रुपये आहे. टोंक या नांवाचें शहर राजपुतान्यांत बनास नदीच्या उजव्या तीरावर दिल्लीच्या नैऋत्य दिशाकडे २१८ मैलांवर आहे.

प्रसिद्ध लुटारू पेंढारी अमीरखान पठाण यानें या संस्थानाची स्थापना केली. याच्या राजधानीचें मुख्य ठिकाण हेंच होय. अमीरखान हा रोहील खंडांतील एका अफगाण रहिवाशाचा मुलगा होय. हा २० वर्षाचा धाकट्या भावासह बरोबर १० अनुयायि लोक घेऊन आपल्या देशांतून माळव्यांत येऊन भोपाळ येथें लष्करांत चाकरीस राहिला.

**अमीरखानाच्या**अंगीं नैसर्गिक पराक्रम, साहस, शौर्य, इत्यादि गुण पाहून त्याची चीज करण्याची वेळ नशिबानें आणली भोपाळ येथील **चट्टखान** मेल्यावर तेथें पुष्कळ लोकांनीं फारच दंगे व गडबडकेली. तेव्हां **सय्यदमहमद** नांवाचा जो नामधारी **नबाब** त्यानें **अमीरखानास** घोडे स्वार व पायदळ यांवर चाकरीस ठेविलें. तो तेथे वर्षभर राहून **भोपाळ** सोडून **राजगड** येथील **शिद्यानें** हांकून दिलेले जे **रजपूत** संस्थानिक होते, त्यांच्या चाकरीस राहिला.

हे **संस्थानिक** आपला व आपल्या शिपायांचा निर्वाह लुटालुटीवर करीत. तेव्हां ही चाकरी करीत असतां मोठा साहसी व भयरहित असा उत्तम सेनानायक आहे, असें सर्व लोकांत प्रसिद्ध झालें. तेथें त्याचें भांडण होऊन कांहीं दिवसांनीं त्यानें ती चाकरी सोडली आणि **बाळाराम इंगळ्या** नांवाचा एक मराठा सरदार होता. त्याचे हाताखालीं जाऊन राहिला.

**अमीरखानाकडे फत्तेगड** किल्याच्या रक्षणाचें काम होतें. या **किल्ल्यांत नबाब** व **घोसमहंमदास कैदेंत** ठेविलें होतें. त्यांवर देखरेख ठेवण्याचें काम याजवर सोंपविलें होतें व हें काम त्यास फार जपून करावें लागत असे. **मुरीदमहंमद** मेला व मराठे निघून गेले. या मुळें **अमीरखानाचा फत्तेगडचा** सर्व संबंध तूटून गेला. नवा प्रधान **वजीरखान** याचे जवळ राहून त्याला पराक्रम दाखवून त्याचे पदरीं राहावें. असे **अमीरखानाच्या** मनांत पुष्कळ होतें. परंतु त्याला चाकरीस ठेऊन ६ महिने झालेनाहींत तोंच त्या दूरदर्शी **वजीरानें** हा महा साहसी मनुष्य आपल्या जवळ ठेऊन उपयोगी नाहीं,

असे मनांत आणून त्यानें त्यास आपल्या हद्दींतून काढून लाविलें.

स० १७९९ त यशवंतराव होळकर वैभव शिखरास चालला होता. अमीरखानानें त्यास भेटण्याचा बेत करून तो सिद्धीस नेला. तेव्हां ह्यास हत्यारासह येण्याची परवानगी दिली. आणि त्याला कोणत्याही प्रकारानें कमी न समजतां आपल्या बरोबरीचा मान दिला. स० १८०६ त हिंदुस्थानांतून होळकर परत येई पर्यंत दोघांनीं एकमतानें कामें केलीं. यशवंतराव होळकर याजकडे राजत्व आणि सेनापतित्व हीं दोनींएके कालींच होतीं.

अमीरखानाच्या ताब्यांत जें सैन्य होतें, त्यावरची सत्ता त्याच्या हांतात पूर्ण पणें दिली होती. त्यानें पाहिजे त्यास नवे ठेवावें किंवा जुन्यास काढून टाकावें असें होतें. या वेळपर्यंत अमीरखानाचीं हेवा करण्याची स्थिति झाली नव्हती. कारण ज्या वेळेस पैशाची गरज लागे त्या वेळेस त्याला शिपायाचा पगार चुकवून देण्या साठीं जुलूम व लुटालूट करावी लागे. पुष्कळ वेळां पगार चुकविण्यास पैसा नसल्या कारणानें त्यास फारच त्रास आणि संकटें पडलीं. त्याच्या हाताखालच्या शिपाईलोकांस शिपाई ह्मणण्या पेक्षां लुटारू ह्मणावें हें बरें असें होतें. ह्मणून प्रसंगी ज्या मालकाचे पदरीं ते होते त्याचे साठीं ते प्राण देणारे नव्हते. असें कोणी ही समजूं नये. दिवसें दिवस अमीरखानाचें सैन्य वाढत चाललें. तें इतकें वाढलें कीं स० १८०६ त ३५००० लोक आणि ११६ तोफा इतका सरंजाम जमा झाला. त्याचे पूर्वी होळकरानें अमीरखानास माळव्यांतील—सिरोज, चवरा. नथेरावा आणि राजपुतान्यांतील राम-

पुरा, निंबेरा व अलीगड, इतक्या प्रांतांची ज्याहागीरी करून दिली. हीं गांवें टोंक संस्थानांत अग्रगण्य होत. या सैन्याच्या निर्वाहास एवढ्याशा मुलखाचा वसूल पुरेना, ह्मणून त्याच्या टोळ्या नेहमीं राजपुताना, माळवा, आणि बुंदेलखंड, येथें हिंडत असत. आणि लूटालूट करून निर्वाह करीत.

स० १८०७ त अमीरखानानें आपला भाऊ गफीरयास इंदूर येथील कामें संभाळण्यास सांगून आपण जयपूरचा राजा जयसिंग हा जोधपूरच्या राजाशीं उदेपूरच्या राजाच्या मुलांसाठीं भांडत होता, त्याचेजवळ जाऊन चाकरीस राहिला. त्या तंट्यांत जयपूरचा फार नाश झाला; तरी शेवटीं त्यासच यश मिळालें. जोधपूरच्या राजाजवळचा पैसा अगदीं बेताचा होता. तेव्हां आतां आपली फाजती होते, असें पाहून त्यानें अमिरखानास त्याचा लोभिष्ट आणि महत्वाकांक्षी स्वभाव जाणून त्यास जयपूरचे राजाचा पक्ष सोडण्यास सांगितलें व त्यानें तो पक्ष सोडला. तेव्हां जयपूरचें फारच नुकसान झालें. पुढें जयपूर लुटलें. या ज्या कत्तली चालल्या होत्या, त्यांत दोघांचेंही फारच नुकसान झालें.

नागोर येथें लूट होऊन लढाईचें आदिकारण पूर्वीचा जोधपूरचा मुख्य प्रधान जो सवाईसिंग त्याचा विश्वासघातानें वध झाल्यावर जोधपूर व जयपूर येथिल अमीरखानाशीं संबंध अगदीं बंद झाला. अशा प्रकारें राजपुतान्यांत दुर्दशा होऊन तो उद्ध्वस्त झाला; तेव्हां अमीरखानानें नागपूर येथील मराठी राजाचे मुख्य जे भोंसले त्यांवर हत्यार धरिलें. त्याच्या मनांत नागपूरचे भोंसल्यांस काढून आपलें राज्य स्थापावें असें होतें.

तो स्वारीकरण्याचे कामांत गुंतला आहे, असें पाहून त्याची राजधानी **शिरोज** येथें ब्रिटिशसरकारची फौज हल्ला करील अशीं पूर्ण चिन्हें दिसल्या वरून तो तें स्थल सोडून निघाला, त्याचा भाऊ **गफीरखान** यानें त्याला **होळकराकडे** येण्याची निकड लाविली, त्यावरून तेथें जाऊन सर्व व्यवस्था लावून तो पुनः **राजपुताना** आणि **माळवा** येथें लुटालूट करून आणखीं पहिल्या प्रमाणें सैन्य वाढवूं लागला. या धुमाकुळींतून **राजपुताना** व **माळवा** इत्यादि प्रांतांत त्यास शांतता करण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्याच वेळीं ब्रिटिशसरकारानें पेंढा यांचा लढाईत पराभव करून त्यांचा अगदीं बीमोड केला.

स० १८१७ त ब्रिटिशसरकारचें सैन्य जेव्हां **माळव्याकडे** गेलें, त्यावेळेस अमीरखान **जयपूरचा राजपूर** नामक किल्ला होता, त्याला वेढा घालण्याचे कामांत गुंतला होता. तेव्हां ब्रिटिशसरकारानें असें सांगितलें कीं, तुम्हीं आपलें सैन्य नियमित ठेवावें.

ब्रिटिशसरकार तुमच्या रक्षणाची हमी आपल्या वर घेतें. **होळकरानें** दिलेले सर्व प्रांत आम्हीं तुमच्या राज्यांत सामील करूं. परंतु नवीन लुटालुटीपासून जे प्रांत तुम्ही जिंकले ते मात्र तुम्हांस मिळणार नाहींत, असें सुद्धां सांगितलें. पण **अमीरखान** हा पेंढाऱ्यांपेक्षां पेंढारी होता असें म्हटलें असतां चालेल. ब्रिटिशसरकारानें जे ठराव व जितका मुलूख **अमीरखानाला** देऊं केला होता तितका मुलूख हाताखालीं घालून स्वस्थ बसावें. हें **अमीरखानास** सोईचें होतें, ब्रिटिशसरकारच्या म्हणण्यास नाहीं म्हणण्याची **अमीरखानाची** मुळींच शक्ति नव्हती त्यानें त्याचें म्हणणें कबूल केलें, परंतु शितावळमीची लढाई

6

होईपर्यंत त्यानें तह कबूल करण्याचें लांबविलें. ती लढाई झाल्यावर भोंसल्याचें राज्य हाताखालीं घालण्यास सांपडत नाहीं; असा कृतनिश्चय समजून आतां स्वस्थपणानें राहून राज्य करावें असा त्यानें निश्चय केला. **अमीरखान** यास तहाअन्वयें सर्व प्रांत दिले. याशिवाय **ब्रिटिश-सरकारानें टोंक** व **रामपूरचाकिल्ला** आणि एक परगणा दिला. शिवाय ३ लाख रुपये प्रथम उसणवार ह्मणून दिले होते; पुढें तेच देणगीखातर झाले. याच्या मुलाबाळांस १२५०० रुपये द्यावे, असा ठराव केला. यावेळेपासून **अमीरखानानें** लुटालूट सोडून आपल्या राज्यांत सुधारणा आरंभिली. मोठमोठ्या इमारती व पांथस्थांसाठीं धर्मशाळा बांधल्या आणि त्याचप्रमाणें कित्येक परोपकाराच्या कृत्यांत वेळ घालविला. इतकें केलें तरी त्याची तृप्ति ह्मणून झाली नाहीं.

**अमिरखान** जसजसा ह्मातारा*होत चालला तसतशी त्याची वृत्ति फारच बदलत चालली. ज्या गृहस्थानें सर्व **राजस्थानास** लुटून फस्त करून **जोधपूर** येथील सहस्रावधि लोकांस मारून रक्ताचे लोट चालविले; तो मनुष्य खरोखर विरक्त होऊन मोठा धार्मिक व भगवद्भक्त झाला. त्याला बारा मुलें होतीं. त्यांच्या विद्येवर **अमीरखानानें** खूप लक्ष्य पुरविलें होतें.

स० १८३२ त तो **अजमिरास गवर्नरजनरल लार्ड-विल्यमबेंटिक** यांस भेटण्यासाठीं गेला होता; तेव्हां त्याच्याबरोबर ६ मुलें होतीं. ५ मुलांच्या अंगांत चिलखतें

---

* मनुष्याचे हातून तरुणपणांत साहसाचीं अशीं पुष्कळ कृत्यें होतात; परंतु तोच मनुष्य वार्धक्यांत आल्यावर त्याची ती पहिली दुष्टबुद्धि सर्व नष्ट होते, त्याचप्रमाणें याचें हें झालें.

होतीं व त्यांच्या रितीभातीही फार सभ्य व लोकप्रिय अशा होत्या. **राजपुतान्यांतील** सर्व राजांपेक्षां **अमीरखाना**-**चा** चेहरा मोठा सतेज असून पाणिदार दिसे. स० १८३४ त **अमीरखान** मेला. त्याचे मागून त्याचा मुलगा **वजीरमहंमदखान** हा गादीवर बसला. यानें स० १८५७ च्यावंडांत **इंग्रजास** चांगली मदत केली ह्मणून **गवर्नर-जनरल साहेबांनीं** मुसलमानीं कायद्याप्रमाणें अगदीं बेवारस होईपर्यंत याच्या वंशाकडे जाहागीर चालवूं असा ठराव केला. तो स० १८६४ त मेला. त्याचे मागून **महंमदअल्लीखान** हा गादीवर बसला. याचे राज्यांत कांहीं एकप्रकारचा जो घोंटाळा झाला, त्याचे योगानें **महंमदअल्लीखानाच्या** राज्याचा शेवट झाला.

स० १८६५ त **लावाचा** ठाकूर यास त्याच्यावर कांहीं एक अयोग्य प्रकारची मागणी केली होती. हा **ठाकूर** नबाबचा संस्थानिक होता. **नबाबास** या बाबतींत **गवर्नरजनरलच्या एजंटानें** पुष्कळ प्रकारें सांगितलें तरी त्यानें कांहीं एक न ऐकतां एकदम सैन्य जमवून मोठें तुंबुल युद्ध केलें. दोहोंकडच्या सैन्याचा फार नाश झाला व शेवटीं **नबाबास** ठाकुरानें मागें हटविलें. कांहीं दिवस पर्यंत **ब्रिटीशसरकारानें** ह्या तंट्याची विझवाविझव करून दोहोंकडे शांतता करून लढाई बंद करविली. परंतु इकडे **नबाब महंमदअल्लीखान** आपलें इष्ट कसें साधेल याविषयीं विचार करीत होता. **लावा** येथील **ठाकूर** जो **धिरातसिंग** त्याचे राज्यकारभाराचें काम त्याचा चुलता जो **रेवतसिंग** याजकडे स० १८६६ पासून होतें. हा मोठा बाणेदार शिपाई होता. हा अ-**ल्वारास** घोडेस्वारच्या पलटणीचा मुख्य होता. लहान ठा-

कूर हा आपल्या चुलत्याच्या सांगण्यावरून स० १८६६ पासून स० १८६७ पर्यंत टोंक येथें राहून नेहमीं टोंकच्या कामगिऱ्या बजावीत असे. टोंकच्या लोकांस पक्कें माहीत होतें कीं, जरी याला राज्याचा अनुभव मुळींच नाहीं; तरी जोंपर्यंत त्याचा चुलता जिवंत आहे तोंपर्यंत तेथें आपली डाळ शिजण्याची आशाच करावयास नको, असें ते लोक ह्मणत. यासाठीं चुलत्याची गठडीच करावी असें या लोकांस वाटूं लागलें.

स०१८६७त **नबाब महंमद अल्लीखान** यानें हा खून करण्याच्या हेतूनें ठाकूरास **टोंक** येथें वस्त्रें देण्यास बोलाविलें. तेथें **ठाकूर** आपला चुलता व कांहीं चाकर लोक बरोबर घेऊन गेला, चुलत्याचा आदरसत्कार यथास्थित केल्या नंतर **नबाबसाहेबाच्या** वजिरानें चुलत्यास कळविलें कीं, **लावाच्या** ज्या जमीनी **नबाबसाहेबांनीं** घेतल्या आहेत, त्या सर्व पूर्वींप्रमाणें आपलेकडे ठेविल्या. हें ऐकून चुलत्यास फार वाईट वाटलें. आगष्टच्या १ तारखेच्या रात्रीं ८ वाजतां वजिरानें पुनः **रेवतसिंगास** पोषाख देण्याच्या बाबतींत त्याचा विचार घेण्यासाठीं बोलाविलें. त्या वेळीं **रेवतसिंग ठाकूर** २ कामगार व ४ चाकर यांसह **वजिराच्या** घरीं भेटावयास गेला असतां **रेवतसिंग** व कामगार हे माडीवर चढतांना त्यांचा वध केला. खालीं चाकर लोक होते त्यांवर **टोंकच्या** शिपायांनीं हल्ला केला. त्यांतून चुकून ठाकूर मात्र बचला, ज्या घरांत **ठाकूर** होता त्याला लगेच **टोंकच्या** शिपायांनीं वेढा दिला. त्या वेढ्यांत ३ दिवसपर्यंत **ठाकुरानें** टिकाव धरिला. तीन दिवस त्याला व शिपायांला अन्न पाणी नाहीं, अशी भयंकर स्थिति असूनही त्यांनीं तसे दिवस काढले.

चवथ्या दिवशीं नवावाकडून ३ मनुष्यें आलीं आणि त्यांनीं त्यांस असें सांगितलें की, तुह्मांला आह्मी नबाबाची भेट करून देतों. असें ह्मणून त्यांनीं त्यांस त्याकडे नेले. नवाबाच्या भेटीस आल्यावर ठाकुरानें सांगितलें कीं, आपण फार वाईट वर्तणूक केली. नंतर नवाब ह्मणाले-झालेली गोष्ट पुनः येत नाहीं. तुह्मी जर चुलत्यावरोबर असतां तर तुमचाही तोच परीणाम होता. ठाकूर घरीं आला तरी त्याचे मागे शिपाई होतेच. इतक्यांत तेथें एक ब्रिटिशकामगार येऊन त्यानें त्यांस लावा येथें जाण्याची परवानगी दिली. टोंक मध्यें या गोष्टी चालल्या आहेत तों लावा येथें १००० स्वार व ३० तोफांसह किल्ल्यावर भडीमार चालला होता.

इंग्रजसरकार अशा अन्यायाच्या गोष्टींसशिक्षा केल्या वांचून कधींही राहाणार नाहीं. त्यानें या अन्याया बद्दल प्रायश्चितही दिलें. तें असें-प्रथम चौकशी सुरू झाली व पूर्णपणें गुन्हा शाबीद झाल्यानंतर ब्रिटिशसरकारानें असा ठराव केलाकीं; नवाब महमदअल्लीखान यासपदच्युत करून त्याला टोंकच्या बाहेर राहण्यास सांगावें. व त्याचा साह्यकारी जो प्रधान यास कैदेत ठेवावें आणि याकामांत जेजे शिपाई लोक होते, त्यांस हांकून द्यावें, टोंकच्या राजाच्या १४ तोफा आहेत त्या ११ कराव्यात आणि लावा हें टोंकचें मांडलिक संस्थान आहे तें इंग्रज सरकारच्या आश्रया खालील संस्थानांत मोडावें असें ठरलें.

टोंकचें राज्य महंमदअल्लीच्या मुलास द्यावें आणि तो मुलगा लहान आहे, तोंपर्यंत त्याचा चुलता अबदुल्लाखान यानें राज्यकारभार करावा. अशा बद्दल व्हाइ-

**सराय** यांनीं एकपत्र लिहून या सर्व गोष्टी **नबाबास** कळविल्या आणि सर्व सरदार व वडे लोक यांस कळविण्यासाठीं जाहिरनामाही प्रसिद्ध केला.

स० १८६८ त ठरावाप्रमाणें **नबाबाचा** वडील मुलगा **इब्राइमअल्लीखान** यास गादीवर बसाविलें. त्या वेळेस त्याचें वय २०वर्षांचें होतें. हा अविद्वान असून फार उधळ्याहोता. याचे वेळेस **संस्थानाला १२** लाखरुपये कर्ज होतें. खजिन्यांत कांहीं एक शिल्लक नव्हती व चाकर लोकांचा ६ वर्षांचा पगार तुंबला होता. त्याचा चुलता **अबदुल्लाखान** यानें ही सर्व अव्यवस्था मोडण्याचें आपल्या सामर्थ्याबाहेर आहे; असें **इंग्रजसरकारास** दर्शविल्यावरून तेथें एक रिजन्सी नेमली. **त्यांत चार** वडेलोक व त्यांच्यावर एक स्वतंत्र **ब्रिटिश**कामगार नेमला. नवीन **नबाबास** नेहमीं दरबारांत राज्यकारभार चालतांना बसून ऐकून घेऊन माहिती देण्या विषयीं उत्तेजन देत होते. नवीन व्यवस्था झाल्यामुळें मागील सर्व बखेडे मोडले.

पदच्युत **नबाबास बनारस** येथें ठेविलें होतें. त्याला **ब्रिटिश**सरकाराच्या हुकुमावांचून कोठेंही जाण्याची परवानगी नव्हती. त्याला प्रतिवर्षी ६०,००० रुपयांची नेमणूककरून दिली आणि त्याच्या प्रधानांस '**चुनार**' येथे अटकेंत ठेविले होते. त्याला साधारण बाहेर हिंडण्याची व थोडीबहुत चाकरमाणसें जवळ ठेवण्याची परवानगी होती. हल्लीं राजव्यवस्था फारच सुधारलेली असून रयतेस योग्य न्याय मिळतो.

**भाग पहिला प्रकरण नववें समाप्त.**

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण दहावें.

# केरवली.

याचें क्षेत्रफळ १८७८ चौरस मैल आहे. लोक संख्या १८००० आणि उत्पन्न ९०६९०३ आहे. हें संस्थान **भरतपूरच्या** दक्षिणेस आहे. याच्या पुर्वेस **धोलपूर** आणि दक्षिणेस व पुर्वेस **चंबळा** नदी वाहत आहे.

**मोंगल बादशाहाच्या** समाप्तीच्या पूर्वींचा या संस्थानाचा इतिहास फारसा आढळत नाहीं. **मराठ्यांचे** इतिहासांत **केरवली** हें एक **पेशव्यांच्या** आश्रयाखालचें संस्थान असून तें **पेशव्यांस** दर वर्षी २५००० रूपये खंडणी देत होतें. स० १८१७त **इंग्रज** सरकारानें ज्या **संस्थानांस** आपल्या आश्रयाखालीं आणलें त्या सर्वां पूर्वीं प्रथम **केरवली** संस्थानानें त्यांच्या आश्रयाचा स्विकार केला. त्यानें **इंग्रजांचें** सार्वभौमत्व कबूल केलें. याबद्दल **इंग्रज**-सरकारानें त्या राज्याचें संरक्षण करण्याचे कबूल करून त्याला **मराठ्यांना** जी खंडणी द्यावी लागत होती, ती घेण्याची माफी केली.

**पुण्यांतील** तहाच्या १४व्या कलमा प्रमाणें **पेशव्या**नें **नर्मदेच्या** उत्तरे कडील मुलखाचे जे त्याचे हक्क होते, ते सर्व **इंग्रजसरकारास** दिले. यांत **गुजराथचे** मात्र हक्क इंग्रजांस दिले नव्हते. या वेळेस **केरवलीच्या** राजानें कांहीं गडबड न करितां **इंग्रज** सरकाचा आश्रय कबूल केला. **इंग्रजांनीं** जरी **केरवलीच्या** राजाच्या मुलखाचें अपहरण केलें नाहीं; तरी **चंबळा** नदीचे दक्षिणेचा कांहीं

मुलुख केरवलीच्या राजाच्या ताब्यांत होता, तो इंग्रज सरकारानें त्याला न दिल्याकारणानें तो रागावला व पुढें चांगली सवड सापडतांच त्यानें आपलें वैर लागलेंच प्रगट केलें.

स० १८२५त इंग्रज आणि ब्रह्मदेश यांच्या मध्यें लढाई चालली होती. त्यावेळीं भरतपूरच्या राजाचा पुतण्या दुर्जनसाल यानें आपल्या धन्याविरुद्ध बंड केलें. त्या वेळेस केरवलीच्या राजानें आपल्या कडून झाली तितकी घोडे स्वारांची मदत दिली. भरतपुर घेतल्यावर त्याच्या क्रोधास विरजण पडून तो शरण आला आणि अपराधाबद्दलमाफी मागितली. केरवली आणि जयपूर यांच्या मध्यें सीमेसंबंधी कांहीं तंटा पडला होता; त्यावेळेस मात्र इंग्रज सरकार आणि केरवलीचा राजा बुधपाल यांचे मध्यें पत्र व्यवहार चालला होता. त्याशिवाय स० १८१८ पर्यंत एक चिठी सुद्धां इकडून तिकडे गेली नाहीं. त्यास मूल बाळ कांहीं एक नव्हतें.

तो मेला त्यावेळेस त्याची बायको गर्भिणी होती, तिला पुढें मुलगा झाला नाहीं. त्याचा चुलत बंधु प्रतापपाल याचा मुलगा गादीवर बसावा असें सर्वानुमतें ठरलें होतें; परंतु पुढें असा शोध लागला कीं, राजाच्या राण्यांपैकीं एकजण गर्भिणी आहे. पुढें थोड्याच वेळांत तिला मुलगा झाला असेंही बाहेर आलें; परंतु प्रतापपालानें हें सर्व खोटें आहे असें ब्रिटिश सरकारास कळविलें व लगेच चौकशी करण्या साठीं एक कमिशन बसलें. चौकशींत पुत्र प्रसवाच्या सिध्यर्थ व्हावें तसें प्रमाण न मिळाल्यावरून ब्रिटिश एजंटानें तें सर्वखोटें आहे असा निकाल केला.

**इंग्रज सरकारानें प्रतापपाल** यास स० १८३८ त केरवली येथील राजा केला. या **राजा** विरुद्ध **राणीनें** बंड करण्याचा बेत केला होता; परंतु तो व्यर्थ झाला, या मुळें **राणी भरतपुरास** राहण्यास गेली.

स० १८४८ त **प्रतापपाल** मेला. त्याचे राज्यांत अव्यवस्था फार होती, तिचे बहुतेक अंशीं कारण **राजा** आणि त्याचा **प्रधान** हे होत. पैशाची टंचाई फार, या मुळें जुलमानें कसा तरी पैसा उत्पन्न करावा असें त्यांस वाटलें आणि जुलुमाचा परिणाम अर्थातच आज्ञाभंग आणि दंगे धोपे हा झाला. यामुळें **ब्रिटिश** सरकारचा कामगार जाऊन त्यानें सामोपचारानें या गोष्टी बंद होण्याविषयीं पुष्कळ प्रकारच्या खटपटी केल्या; परंतु त्या सर्व व्यर्थ झाल्या. **प्रतापपाल** हा मेला तेव्हां त्यास मूल बाळ कांहीं एक नव्हतें.

**केरवलीकडे इंग्रजसरकाराचे** लाख दीडलाख रुपये तुंबले होते; ते देण्याविषयीं इंग्रज सरकारानें फार तगादा लाविला. त्यामुळें हें सर्व कर्ज देण्याविषयीं दिवाणानें **इंग्रजसरकारा** जवळ कांहींशी मुदत मागून घेऊन थोडेच दिवसांत हाप्त्यांनीं कर्जाची फेड करण्याचें सुरू केलें.

**इंग्रजसरकारानें** दत्तकाची कबुली केली नव्हती; म्हणून दत्तकाचें रक्षण कोणी करावें? या बद्दल निरनिराळ्या **राजपुरुषांत** भांडणें सुरू झालीं होतीं. अशावेळीं कर्जाची फेड झाल्यावांचुन दत्तकाची मंजुरी मिळणार नाहीं, अशा प्रकारचे जे ठराव मागें झाले होते, ते सर्व **इंग्रजसरकारानें** रद्द केले. पुढें **इंग्रज** सरकारानें दत्तक कबूल केला. त्याचें नांव **नरसिंगपाल** असें ठेविलें. पुढें कांहीं दिवसांनीं राज्यांत ज्या निरनिराळ्या फळ्या झाल्या होत्या,

त्यांचें नियमन करून सर्व राज्याची सुरक्षित व्यवस्था लावण्यासाठीं **ब्रिटिश**सरकारचा एक कामगार **केरवलित** कारभार स्वतः चालविण्यासाठीं सरकारानें पाठविला; या मुळें पुढें रयतेस फारच सुख मिळूं लागलें.

स० १८९२ त राना **नरसिंगपाल** मेला. हा मरण्याच्या पूर्व दिवशीं त्यानें एक लांबचा नातेवाईक **भरतपाल** नामें आपल्या मागून गादीवर बसण्यासाठीं दत्तक घेतला होता; परंतु हा **दत्तक** कबूल न करितां **हिंदुस्थान** सरकारानें हें संस्थान बेवारस ह्मणून ठराव केला. या मुळें या **संस्थानच्या** लोकांनीं "**विलायतेंत हौस आफ़्कामन्स**" मध्यें पुष्कळ प्रकारें गवगवा केला. यावरून तें राज्य खालसा करण्यांत आलें नाहीं. हें येथील प्रजेचें मोठें नशीब समजलें पाहिजे.

**ब्रिटिश** सरकारानें **भरतपालास केरवलीचा** राजा कबूल केला आणि तो मोठा होईतोंपर्यंत त्याच्या राज्याची व्यवस्था करण्यासाठीं सर्व तजविजी केल्या. इकडे **केरवलींत** पुष्कळ तंटे झाले होते, त्यांनीं एक नवीनच गोष्ट बाहेर आणून असें सिद्ध केलें कीं; पूर्वीचा **राजा** लहान असल्याकारणानें **भरतपालाचें** दत्तविधान अशास्त्र होय. याशिवाय दत्तक संबंधी कांहीं अवश्य विधी केले नव्हते; यासाठीं **भरतपाला**पेक्षां **मदनपाल** हा जवळचा संबंधी असल्याकारणानें तोच राज्याचा योग्य वारस होय. यास **भरतपूर, धोलपूर, अलवार** आणि **जयपूर** या राजांचें मत पडलें. चौकशी अंतीं या गोष्टी प्रमाण सिद्ध झाल्या. शिवाय **मदनपालास** राण्याच्या राणीनें कबूल केलें. त्यास मोठमोठ्या ९ ठाकुरांची सम्मति मिळाली. राज्यांतील $\frac{3}{4}$ पेक्षां

जास्ती संस्थानिकांसही हेंच मान्य झालें व देशांतील प्रजेचेंही मत **मदनपालास** राज्याधिकार देण्याचें ठरलें. यामुळें इंग्रजसरकारास **भरतपालचे** राज्याधिकारित्व **रद्द** करून **मदनपालास** गादीवर बसविणें भाग पडलें.

**राजा** वयांत येईपर्यंत पूर्वीं प्रमाणेंच राज्यकारभार **ब्रिटिशसरकारचे** मार्फत चालला होता व पुढें ज्यावेळेस **राजास** पूर्ण मुकुत्यारी मिळाली; त्यावेळेस सर्व राज्यकारभाराचा अधिकार **ब्रिटिशअंमलदारांकडुन** त्यास मिळाला.

स० १८५७ च्या धामधुमींत या **राजानें ब्रिटिशसरकारास** पुष्कळ प्रकारची मदत केली. यामुळें **ब्रिटिशसरकारानें** प्रसन्न होऊन ११७००० रुपये कर्ज होतें त्याची सूट दिली व यास बहुमानाचीं चांगलीं वस्त्रें दिलीं आणि सलामिच्या ज्या **१५** तोफा होत्या त्या १७ केल्या.

स० १८५९त **संस्थानास** पैशाची टंचाई फार पडली, व कर्जही वाढलें. तेथें **पोलिटिकल एजंटास** कर्जाची व्यवस्था लावण्यास पाठविलें. **एजंटानें** शहाणपणानें आपण **सार्वभौम इंग्रजसरकारचे** अधिकारी* आहों, असें न दाखवितां **माहाराजाशीं** मित्रत्वाच्या व मोठ्या सलुख्याच्या नात्यानें वागावें, असा त्या **ब्रिटिश** अधिकाऱ्यास **इंग्रजसरकारचा** हुकूम होता. स० १८६१त तो माघारा गेला

* पूर्वीं जे कामगार संस्थानांत नोकर होते, ते हल्लींच्या कामगारांसारखे उतावळ्या स्वभावाचे नव्हते. हल्लीं जे नोकर संस्थानांत आहेत ते राजांपेक्षांही डोई जड झालेले असतात.

त्यानें सर्व व्यवस्था चांगल्या प्रकारें लावली, त्यामुळें पुढें बिलकुल त्रास पडला नाहीं.

भाग पहिला प्रकरण दहावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण अकरावें.

## शिरोही.

याचें क्षेत्रफळ ३०२४ चौरस मैल आहे. लोकसंख्या १८७००० आणि उत्पन्न ७०,००० रुपये आहे. याच्या उत्तरेस **जोधपूर**, ईशान्येस **गोडूवर** आणि पूर्वेस **मेवाड**, दक्षिणेस **गायकवाडाचें** राज्य.

**राजपुतान्यामध्यें राठोर**, मराठे किंवा **मोंगल** या कोणाचेंही मांडलिकत्व न स्विकारितां ज्यानें आपलें **स्वातंत्र्यदैवत** जागृत ठेविलें; तें शिरोही हें **संस्थान** होय.

शिरोहीसंस्थानांत **ठाकूर, राव, भिल्ल, मिना,** आणि **गिरासि** हे आपआपल्या पर्वतमय प्रदेशांत येथेच्छ रहात असतां त्यांच्यावर महाशूर व मानधन असे चव्हाण **रजपूत** राजे राज्य करीत. अशा तऱ्हेनें आयुष्यक्रमण करणें हें त्यांस मोठें स्वातंत्र्य वाटून या स्वातंत्र्यांसच ते आपलें परमभूषण मानीत. ते आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं सर्वस्व खर्च करण्यास तयार असत. **जोधपूरच्या** राजानें त्यांच्यावर वारंवार एकामागून एक असे अनेक हल्ले केले आणि पुष्कळ लढाया केल्या; परंतु **शिरोही** प्रांताच्या लोकांवर त्यांचा कधींच नकशा झाला नाहीं. अत्यंत प्राचीन कालापासून अगदीं

आलीकडील कालापर्यंत ते लोक रानटी व विचारशून्य असून स्वातंत्र्यदेवतेचे मोठे निःसीम भक्त होते. प्रत्येक वस्तूस विपन्नावस्था आहेच. तदनुरूप त्यांचें बल कमी होण्याची जेव्हां वेळ आली; तेव्हां त्यांच्यात आपआपसांत एकुणिसाव्या शतकाच्या आरंभीं पुष्कळ तंटे सुरू झाले. तेव्हां हा राजा मोठा जुलमी व अन्यायी होऊन बसला होता व आपल्या पर्वतमय प्रदेशस्थ लोकांस त्यानें फारच त्रास दिला.

पुष्कळ लोकांनीं बंडें केलीं आणि त्यांनीं मोठमोठ्या मानकऱ्यांस आपलें स्वामित्व दिलें. जे लोक उदासीन होते, ते तसेच स्वातंत्र्यप्रिय होऊन राहिले. त्यांच्या राजानें प्रथम त्यांस विश्वास देऊन नंतर फार लुटलें. त्याचें प्रायश्चित त्यांस लवकरच मिळालें त्यांनी त्यास पदच्युत करून कैद केलें. तो जिवंत होता तोंपर्यंत राज्यकार्यासाठीं त्यांनीं दुसरा **प्रतिनिधि** नेमला. हा कोणी परकी नव्हता. पदच्युत केलेल्या **रावाचा बंधु** जो **शिवसिंग**, त्यास त्यांनींप्रतिनिधि नेमलें.

**उदिवानजी** यानें **जोधपूरचा राजा मानसिंग** यास मध्यें **घालुन** मदत मागण्यास निरोप पाठविला. **मानसिंगास** ही गोष्ट इष्टच होती. त्यानें आपल्या पुर्वींच्या सर्व अटी कबूल करून घेतल्यावर होय असें उत्तर दिलें. त्याच्या पूर्वजानीं **शिरोही** संस्थान आपलें मांडलिक असावें, ह्मणून शेंकडो लढाया केल्या, तरी त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं; तेव्हां ही संधि यास बरी वाटली. यांनीं त्यांचें मांडलिकत्व कबूल; केलें परंतु ते ह्मणण्याप्रमाणें वागत नव्हते.

जोधपूरच्या राजानें होते तेवढे प्रयत्न केले;परंतु शिरोहीच्या स्वातंत्र्याचें लेशमात्रही अपकर्षण त्याच्यानें करवलें नाहीं. हीच कायती वेळ शिरोहीवर आपलें स्वामित्व स्थापन करण्याची आहे; असें समजून जोधपूरच्या राजानें स्वारीची तयारी केली. तो मोठ्या ऐटीनें शिरोही प्रांतांत गेला. परंतु तेथें त्याची दाणादाण होऊन त्याचे इष्ट मनोरथास विरजण पडून या कामीं त्याची फार मान हानि मात्र झाली. त्या डोंगरी लोकांपुढें त्याचें कांहीं एक चालले नाहीं. उदिभानजी पुष्कळ दिवस पर्यंत कैदेंतच होता. तो तुरुंगांत हाल होऊन मेला.

शिरोहीवर जोधपूरच्या स्वारीचें फारच भयंकर अरिष्ट होतें. उदेपूर व जोधपूर आणि बडोदें व त्याचप्रमाणें शिरोही जवळचीं दुसरीं निरनिराळीं संस्थानें, हीं सर्व यावेळेस ब्रिटिश लोकांच्या सार्वभौम अधिकाराखालीं होतीं.

ब्रिटिश सरकारानें त्यावेळीं लहान लहान संस्थानांचें पालकत्वस्विकारिलें होतें; त्याचा उपयोग राजपुत्र्यांतील लोकांस फार वाटूं लागला. अमीरखान पेंढारी याचे दंगे कमी झाले. ज्या ज्या संस्थानानें ब्रिटिश सरकारचा आश्रय संपादन केला; त्यांचें फार कल्याण होऊन पेंढारी वगैरे लोकांच्या जाचांतून तें मुक्त झाले. आणि अशी स्थिति त्या वेळीं इंग्रजास इष्ट होती.

अमीरखान नामें मोठा प्रसिद्ध लुटारू होता, तो पुढें एक छोटासा राजा बनून मोठा धर्म परायण झाला होता. ब्रिटिश सरकारच्या आश्रयवृक्षाची आसपास चोहोंकडे

मोठीं परिपक्क कल्याणफळें पाहून शिवदेव यानेंही आपल्या संस्थानास त्याचा आश्रय घेतला.

स० १८२३ च्या सप्तेंबरच्या ११ वे तारखेस ब्रिटिश गव्हर्नराशीं एक तह करण्यांत आला. त्या तहा अन्वयें प्रतिनिधीनें इंग्रजाचें सार्वभौमत्व कबूल करून इतर संस्थानांशीं राज्यकारणी पत्रव्यवहार किंवा दळण वळण कोणच्याही रितीनें ठेऊंनये असें ठरलें ब्रिटिश-सरकाच्या एजंटाच्या अनुमतानें राज्यव्यवस्था सुधरावयाची आणि उत्पन्नच्या $\frac{3}{8}$ खंडणी द्यावयाची असें ठरलें. ब्रिटिशसरकारानें संस्थानचें रक्षण करण्याची जोखीम आपले शिरावर घेतली. शिवसिंगाच्या मागें उदिवानजीच्या मुलांपैकीं कोणी राहिल्यास त्यास राज्यपद द्यावयाचें, आणि मालावरच्या जकातीनियमाचा हक्क आपलेकडे ठेवायाचा. इतक्या अटीचे तहाचे ठराव होते.

स. १८४७ त उदिवानजी निरपत्य होत्साता मरण पावला. व शिवसिंग हा राजा झाला. त्या सर्व राज्यांत नानाप्रकारचे घोंटाळे झाले. राज्यकारभार मोठ्या मुलानें चालविला. मानसिंगास जरी युद्धांत मागें हटविलें, तरी ठाकूर, सरदार, मानकरी यांचीं मनें अगदींच अस्वस्थ झालीं होतीं. पुष्कळ लोक तर स्वातंत्र्यानें अगदीं दंगा करण्याचे बेतांत होते. बाकीचे उदिवानजीच्या-राज्यांत धुळीस मिळाले होते. हा दंगा मोडण्यासाठीं रावाला इंग्रजसरकारची मदत घेणें फार जरूरीचें पडलें.

इंग्रजांनीं त्याला लाख दीडलाख रुपये उसणवार देऊन रानटी मिना लोकांचा पराभव करण्यासाठीं घोडेस्वार पाठविले. तरी लवकरच इंग्रजसरकारानें मध्यें पडून

सर्व पूर्ववत् व्यवस्था केली आणि जे ठाकूर उदिबानजीच्या विरुद्ध कटांत होते त्यांस पुन्हा राज्यप्रितीचा पूर्ण दृढाभ्यास करण्यास सांगितलें.

स. १८४० त रावानीं अबुपर्वतावरच्या कांहीं जमिनी इंग्रजास दिल्या. त्यावेळेस इंग्रजाकडून जे ठराव करून घेतले त्यांतला तेथें गोवध करूं नये असा एक आहे. हा ठराव बंद करण्यासाठीं ब्रिटिशसरकारांनीं पुष्कळ खटपट केली परंतु ती सर्व व्यर्थ गेली.

स. १८६४ त रावानीं पुष्कळ विनंती केल्यावरून संस्थानचें काम इंग्रजसरकारांनीं चालविलें. त्यावेळेस २ लाख रुपये संस्थानास कर्ज होतें. ३०,००० रुपये खंडणी अयोग्य वाटल्यावरून त्यांतील निम्मे खंडणी कमी केली. स. १८९७ पर्यंत संस्थानचा कारभार इंग्रजसरकारच करीत होतें. ज्या वेळीं बंद झालें त्या वेळेस रावानीं इंग्रजसरकाराशीं उत्तम प्रकारें दोस्ती दाखविल्या वरून इंग्रजसरकार प्रसन्न होऊन त्यांनीं पुनः खंडणीची रकम निम्में कमी केली.

स. १८६१ त राव शिवसिंग फार म्हातारा झाल्याकारणानें त्यानें आपलें सर्व राज्य आपला मुलगा उमेदासिंग याचेवर सोंपवून आपण फक्त राजनामपद धारण करिता झाला. त्याचवर्षी तो मेला. अजूनपर्यंत राव उमेदासिंगास ब्रिटिश पोलिटिकलएजंटची मदत होती. परंतु स. १८६९ मध्यें कर्ज संपल्या कारणानें एजंटाची गरज राहिली नाहीं व राज्यकारभारही चांगला सुरळीत चालल्यामुळें इंग्रजानींही कांहींएक हरकत घेतली नाहीं.

त्यावर ते **मारवाडांत** आले. तेथें त्यांनीं **अमर-कोट** आणि **झेलोर** येथील राजघराण्यांशीं विवाह संबंध केले. त्यानीं तेथें एक मोठा किल्ला बांधला. त्याचें नांव **टानोटा**. त्यांनीं तीं आपली राजधानी केली. **टानोटा भटी** लोकांकडे होता; त्यावेळीं जवळच्या लोकानीं त्यावर हल्ला करून त्यांतील लोकांस मारून आपल्या ताब्यांत घेतला. नंतर त्याचा मुख्य जो **देवरावळ**, त्यानें मोठ्या युक्तीनें दुसरा एक किल्ला बांधला व त्याचें नांव **देवरावळ** असें ठेविलें. त्या राजानें आपलें गत-वैभव संपादन केलें. त्यानें **लोद्रा रजपुतांची** एक राजधानी **लोदोबा** शहर हें जिकलें.

त्याच्या सहाव्या पुरुषानें तें शहर शत्रूचे माऱ्यांत आहे असें पाहून तेथून दहा मैलांवर दुसरें एक शहर बांधलें. त्यास त्यानें **जेसलमीर** असें नांव ठेऊन आपली राजधानी केली. हें शहर अजून असून त्या शहराचें नांव त्या प्रांताला पडलें आहे. या पुढें **जेसल** १२ वर्षें होता. **जेसला** मागून **शालिवाहन** हा गादीवर बसला. **शालिवाहन बलुची** लोकांशीं लढत असतां मारला गेला. यानें कोणतींही महत्वाचीं कामें केलीं नाहींत.

त्याचा मुलगा **विजिल** हाही बापामागून लवकरच मरण पावला. त्याचा चुलता **कैलण** यानें **बलूची** लोकांचा सेनापति मारून त्याचा पराभव करून आपल्या भाचाच्या मरणाचा सूड उगविला. त्यानें १९ वर्षे राज्य केलें. स० १२१९ त त्याचा मुलगा **किकदेव** हा गादीवर बसला. त्यानें १२ वर्षे राज्य केलें. पुढें त्याचा नातु **कर्ण** यानें २८ वर्षे राज्य केलें. हे दोघेही मोठे शूर होते. त्याच्या मागून **लखरसेन** गादीवर बसला. हा

हा **राव** गादीवर बसला तेव्हां प्रथम त्याच्या १ भावांस ज्या नेमणूका करून दिल्या होत्या, त्या त्यांस न आवडल्याकारणानें त्यांनीं पुष्कळ बंडें केलीं. परंतु ह्या कामीं त्यांस मुळींच यश मिळालें नाहीं, पुढें लवकरच शांतता झाली. यावेळेपासून लिहिण्यासारखें कांहींएक झालें नाहीं. यांना दत्तकाचा अधिकार आहे आणि १९ तोफांची सलामी आहे. हल्लीं राज्यव्यवस्था बरी आहे.

**भाग पहिला प्रकरण अकरावें समाप्त.**

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण बारावें.

## जेसलमिर.

याचें क्षेत्रफळ १२२५२ चौरस मैल आहे. लोकसंख्या ७४४०० आणि उ० ८५०० रुपये आहे.

**भटी** लोकांचा राजा अथवा **रावळ जेसल** यानें स० ११५६ त **जेसलमीरची** स्थापना केली. **भटी** कुल ही एक यादव कुळाची शाखा होय, तीन हजार वर्षांपूर्वी **यादवराजे** सार्वभौमपदावर होते.

**जेसलमीरच्या** पूर्वजांबरोबर या लोकांनीं **हिंदुस्थान** सोडून **मर्व्ह** येथें वसाहती केल्या. तेथून पुनः पुढें येऊन त्यांनीं **अफगाण** देश जिंकून **गिझनी** ही आपली राजधानी केली. तेथून त्यांना **खोरासानचे** राजानें काढून दिल्यावर त्यांनीं **पंजाबांत** वसाहती केल्या. तेथें त्यांनीं **शालाभान** शहराची स्थापना केली. पुढें त्यांस गिझनीच्या **महंमदानें** काढून दि-

महामूर्ख होता. जर त्याला कोणीं सांगितलें कीं **महाराज रात्रीं थंडी फार वाजते ह्मणून कोल्हे ओरडतात.** तर तो लगेच **कोल्ह्यांस थंडीच्या निवारणार्थ उत्तम वस्त्रें तयार करून पुरविण्यास हुकूम करी.** याची कारकीर्द लिहावी तितकी थोडीच; यानें एकवेळ आपल्या खजिन्यांतील सर्व शिल्लक वाळत घालून ती वाऱ्यानें पाखडली व या संधींत लबाड लोकांनीं पुष्कळ द्रव्यापहरण केलें. याने ४ वर्षें राज्य केलें. नंतर त्याचा मुलगा **मंमाल** हा गादीवर बसला. तो मोठा लबाड, रागीट व हेकेखोर होता. ह्मणून त्याच्या सरदारांनीं एक होऊन त्याला काढून **कर्ण** याचा मुलगा **जीति** यांस गादीवर बसविलें.

**जीति** यानें १८ वर्षें राज्य केलें. याचे राज्यांत **बादशहा अल्लाउद्दीन खिलजी** यानें स्वाऱ्या केल्या. ह्या ८वर्षें चालल्या होत्या. नंतर **रावळजीति मेला.** याणें आपल्या कारकीर्दींत कोणचीं ही महत्वाचीं कामें केलीं नाहींत. त्याचा मुलगा **मूळराज** हा गादींवर बसतांच याचे कारर्दींत पूर्वीं पेक्षां अनिवार दंगे झाले. तरी त्यानें एका मागूनएक हल्ले केले व त्यांत त्यांस मागें हटविलें. प्रजाजनाच्या दुःखसमुद्रास इतकी भरती आली कीं; **रावळ** व त्याचे **मानकरी** वगैरे यांनीं देशाच्या रक्षणासाठीं समरंगणीं आपल्या प्राणाची आहुती देण्याचा ज्यावेळीं निश्चय केला, त्या वेळीं त्यांच्या २४०० स्त्रियांनीं आपल्या मानधनाचें संरक्षण करण्यासाठीं चितेमध्यें **भस्मीभूत** होऊन **वैकुंठास** गमन केलें. लगेच **पुरुषांनीं** ढाल तरवार घेऊन मोठ्या उत्साहानें समरांगणांत प्राणाची आहुती देऊन सूर्यमंडळ भेदन करून मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठीं शत्रुवर चालकेली आणि शत्रूंच्या लो-

कांची कत्तल उडवून सर्व पडले. रावळमूळराजाच्या मागें त्याचे दोघे पुतणे जिवंत होते. त्यांतील एक वारस झाला.

**मुसलमान** लोकांनीं २ वर्षें **जेसलमीर** आपल्याकडे घेतलें होतें. पुढें **मोहें** येथील **राठोर** लोकांनीं तेथें येऊन वसाहती केल्या; परंतु त्यांना **भटी** लोकांनीं हांकून दिलें. त्यावेळेस सेनापति **जेसलचा मुलगा यदु** होता. हा पुढें **प्रबळ** झाला. एके दिवशीं **दिल्लीच्या बादशाहाचे** घोडे सरोवरांत पाणी पीत असतां यदूनें ते हीरावून नेले. या कारणानें **जेसलमीरवर** हल्ला आला. या खेपेसही पूर्वी प्रमाणें अत्यंत भयंकर एक **नरनारी यज्ञ** झाला. इतक्यांत **रावळमूळराज** याचे दोघे पुतणे होते ते **दीलीस** गेले. तेथें त्यांनीं **बादशाहा** जवळ राहून उत्तम कामगिऱ्या बजावल्या. ह्मणून वडील मुलगा **मार्तो** यास **बादशाहानें** प्रसन्न होऊन **जेसलमीरचे राज्य** आणि मुलूख वंशपरंपरेनें दिला. तो आपले नातेवाईक, आप्तगण, इष्टमित्र, यांसह तेथें गेला. त्यावेळेस **जगमल्ल** याचे सरदार बरोबर होते. त्यानें तेथें जाऊन बऱ्याच सुधारणा केल्या आणि मक्कम सैन्य ठेविलें. त्याला **जेसलचा** मुलगा **यदू** याच्या सोयऱ्यांनीं मारला. त्याच्या मागून **केहूर** हा गादीवर बसला.

शेवटचा राजा **मनोहरदास यानें** आपल्या पुतण्याचा खुन केला होता. हा त्याच्या मागील राजा जो **भिम** त्याचा मुलगा होता. त्याचे मागून **सवालसिंग** हा गादीवर बसला. याचे कारकिर्दीत **जेसलमीरच्या** ताब्यांतील **संस्थानें** उत्तरेस **गारा** नदी, पश्चिमेस **सिंधु**, पूर्वेस व दक्षिणेस **मारवाड** व **बिकानेर** येथपर्यंत होतीं.

**सवालसिंगामागून अमरसिंग** हा गादीवर बसला. त्यानें राज्यांतील चोऱ्या बंद केल्या. **बिकानीर च्याराजाची** व याची कांहीं झटापट होणार होती. परंतु त्याची यास पुर्वींच माहिती होती, यामुळें शत्रूचे मनोरथ सिद्धीस गेले नाहींत. हा स० १७१० त मेला.

पुढें **जयवंतसिंग** गादीवर बसला. तो मोठावाईट नशीबाचा होता. **मुगलवार, मेर व फिलोडीसे हे** तीन मुलूख शिवाय दुसरीं शहरें आणि प्रांत हे त्या पासून राठोर लोकांनीं हिसकावून घेतले आणि उत्तरे कडील डोंगरा जवळचा मुलूख शिकार पुरापासून होता, तो एका **आफगाणानें** बळकाविला. तो मेल्यावर त्याचे गादीविषयीं भाऊ व मुलें तंटे करूं लागले, शेवटीं वडील **अखीसिंग** हा गादीवर बसला. त्यानें ४० वर्षे राज्य केलें. त्या राज्यांतील **देवरावळ व खंडाळें** हे प्रांत **दाोअदखानचा** मुलगा जो **भावलपूरचा** स्थापक यानें घेतले. याचे मागून मूळराज हा स० १७६२ त गादिवर बसला. याच्या मूर्ख प्रधानामुळें **भटी संस्थानाचा** फार नाश झाला

त्या **प्रधानाचें** नांव **सुरूपसिंग** असें होतें. **हा** मोठा विषयलंपट असून दुष्ट बुद्धीचा होता. याच्या दुष्टवर्तनामुळें राज्यांतील मानकरी व सरदार हे फारच त्रासून गेले होते. **रायसिंग** यानें त्याचे **बायकोसमोर सुरूपसींगास** ठार मारलें. नंतर राज्यांत धुमाळी माजली. सरदारांचे मनांत **मूळराज** यास काढून **रायसिंग** यास बसवावयाचे होतें. परंतु **रायसिंग** तें कबूल करीना, ह्मणून तें तसेंच राहिलें. **सुरूपसिंगाचा** मुलगा **सलीमसिंग** मोठा झाल्यावर त्यास **दिवाण** केलें. सलीमसिंग हा

बापापेक्षां मूर्तिमान दुर्गुणी असून सर्पासारखा दुष्ट व व्याघ्रासारखा क्रूर असा होता. तरी ही तो मोठा भाक्तिमान् असे.

हा जोधपुराहुन येत असतां वाटेंत रायसिंग व त्या बरोबर हद्दपार केलेले सरदार यानीं त्यास अवाचित गांठून आतां ठार करणार, तों त्याची दीनवाणी प्रार्थना ऐकून त्यांस दया आली व त्यांनीं त्यास जिवंत सोडून दिलें. ह्या उपकाराबद्दल ज्या सरदारांनी त्याचे जीव वांचविले होते, त्या सरदारांस त्यानें विष घालून ठार मारिलें. नंतर त्यानें आपले भाऊबंद यांसही अशाच तऱ्हेनें कैलासवासी केलें.

ज्या किल्यांत रायसिंग आणि त्याची बायको ठेविली होती, तेथून त्यांनां कोठेंही जातां येऊं नये असें केलें व पुढें त्यांस तोफेच्या तोंडी देऊन जाळून ठार मारिलें. त्याच्या मुलास रामगडास बंदींत ठेऊन तेथें विषप्रयोग करून त्यांसहीं ठार केलें; नंतर त्यानें मूळराजाच्या तिसऱ्या मुलाचा मुलगा जोगतसिंग यास वारस ठरविलें. रावळचे दुसरे पुत्र पौत्र जीव रक्षणार्थ पळून गेले. सलीमाचें इतका प्रळय करूनही समाधान होईना. त्याला जो जो विरूद्ध वाटला त्याचा त्यानें वध केला. सर्व जेसलमीर शहर त्याच्या क्रुरपणानें अगदीं ओस पडलें होतें.

रावमुळराजाचे कारकर्दीत इंग्रज लोकांचा पाय प्रथम जेसलमिरांत शिरला. रावळ यानें स० १८०८ त ब्रिटिशसरकारचा आश्रय घेतला असता; परंतु कांहीं राज्यकारणामुळें यमुना नदीच्या पूर्वप्रदेशांत सत्ता वाढविणें हें योग्य न वाटल्या वरून त्यावेळेस तें राहीलें.

स० १८१९ त तह झाला; त्या तहान्वयें **रावळमूळराज** याचे वंशजास राज्य देण्याची **इंग्रजसरकारानें** हमी घेतली होती. **रावळमूळराज** याचे राज्यावर कोणी स्वारी अगर लढाई वगैरे करील तर **इंग्रजसरकारानें** मदत द्यावी. मात्र त्या लढाईचें कारण स्वतः **रावळ** नसावाअसें ठरलें.

**इंग्रजसरकार**चे सार्वभौमत्व कबूल करून खंडणी देऊं नये असें ठरलें व पुढे लवकरच **रावळमूळराज** मेला आणि त्याचे गादीवर त्याचा नातु **गजसिंग** हा बसला. यास **सलीमसींगानें** अगदीं बंदिवान करून सोडलें होतें. त्याचे भोंवती नेहमीं **सलीमसींगाचीं** चाकर माणसें असत. त्यांनीं त्याचे शब्दानुशब्द टीपून ठेवून **सलीमसिंगास** कळवावे. **गजसिंग** हा गादीवर बसला तेव्हां त्याचे वय अगदीं लहान होतें. यापुढें **सलीमसिंग** ४ वर्षें जिवंत होता. तोंपर्यंत त्याचा जुलूम व क्रूरपणा हे सारख चालले होते.

**विकानीर**शीं ज्या लढाया झाल्या त्या त्याचे जुलमीपणा मुळें होत. त्यानें नेहमी आपल्या धन्याच्या नांवानें दुसऱ्या **संस्थानिकां**च्या ताब्यातील मुलखास आपल्या **संस्थाना**चे स्वामित्व लावावें. त्या अटीसाठीं तो एकदा **कलकत्यास** सुद्धां जाण्यास निघाला होता. स० १८२४ त यानें आपल्या **प्रधानास** ठार मारण्याचा यत्नकेला होता, परंतु तो लौकर जावा तसा सिद्धीस गेला नाहीं. **सलीमसिंग** मेल्यावर मग दिवाणगीरीचें काम त्याच्या सावत्र भावास दिलें. याच्या सावत्र आईनें व्यभिचार केल्यामुळें यानें तिला ठार मारलें. याबद्दल **रावळ गजसिंग** यानें त्यास **कैद** केलें. प्रधानपक्षाच्या मंडळीनें या बद्दल बरीच गडबड केली; परंतु **रावळ** हा खंबीर असल्या कारणानें व **इंग्रज सरकारानें** गृहकलहांत हात

चालण्याचें नाकारल्यामुळें ते सर्व विझुन गेलें. नंतर लौकरच **रावळ** स्वतः राज्य कारभार करूं लागला; तेव्हां त्याचा स्वभाव मोठा उमदा लोकप्रिय व मन मिळाऊ असल्याकारणानें तो लोकांस फारच प्रिय झाला. याच्याच शहाणपणानें **विकानीर**शीं पुनः या संस्थानाचा प्रेम भाव वाढत चालला. यांचा व **ब्रिटिश सरकारचा** प्रेम भाव फारच चांगला आहे.

स० १८४४ त पुष्कळ किल्ले **इंग्रजसरकारानीं जेसलमी**-**र**कडून जिंकून घेतल होते. हे किल्ले **मीरअल्ली मुराद** यानें **ब्रिटिश सरकारच्या** हुकुमानें पुनः**रावळ**यास दिले.

स० १८४६ त **गजसिंग** मेला त्याला पुत्रसंतान नव्हतें. त्याच्या बायकोनें **रणजितसिंग** नावाचा एक मुलगा दत्तक घेतला. त्याला स० १८६२ त दत्तकाच्या परवनगीची सनद मिळाली. तो स० १८६३ त मेला. त्याला मूलबाळ कांहीं एक नव्हतें याच्या कडून कोणतीच महत्वाची गोष्ट झाली नाहीं.

**रणजितसिंगा**च्या बायकोनें त्याचा 'भाऊ **बेहेरीसाल**' यास दत्तक घेतलें. त्या वेळेस त्याचें वय १९ वर्षाचें होतें. त्याला असें वाटलेंकीं मला **जेसलमीरचे राज्य** पचणारनाहीं. असें वाटल्यावरून त्यानें राज्य पद नाकारिलें ह्मणून त्याचा बाप **ठाकूर केसरीसिंग** याच्याकडून राज्यकारभार चालविला. स० १८६६ त **गव्हरसरजनरलाच्या एजंटानें** त्यास **माहारावळ** असा किताब देऊन राज्याभिषेक केला. त्याच्या बापानें राज्य कारभार मोठ्या दक्षतेनें व हुशारीनें केला होता ह्मणून त्यासच पुनः **दिवाण** नेमलें. यांस १९ तोफांची सलामी आहे.

**भाग पहिला प्रकरण बारावें समाप्त.**

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण तेरावें.

## रेवा.

याचें क्षेत्रफळ ९८२७ चौरस मैल आहे. लोकसंख्या १२००० आणि उत्पन्न वीसलाख रुपये आहे. या संस्थानाच्या उत्तरेस अलाहाबाद आणि मिर्झापूरची हद्द; उत्तरेस व पूर्वेस मिर्झापूर; पूर्वेस कोरिया; दक्षिणेस सागर.

रेव्याचें राज्य हें एका लहानशा नदीच्या कांठीं वसलें आहे. हें प्राचीन कलिंगरचे राज्यांतर्गत एक संस्थान होय. हें औरंगजेबाचे कारकीर्दींत कलिंगरपासून विभक्त झालें व तें औरंगजेबानें खालसा करून अलाहाबादेस जोडलें. मोंगलबादशहा सार्वभौम असल्याकारणानें रेवाचे राज्यास बादशाहाला खंडणी द्यावी लागत असे. या राज्यांत भांगिला जातीचे लोक राहातात. मोंगल लोकांचें राज्य नवें झाल्यावर जयसिंगनामक देवसिंगाच्या वंशांतील भांगिला लोकांच्या मुख्यानें पेशव्यास नावाला मात्र सार्वभौम कबूल करून आपलें स्वातंत्र्य जशाचें तसेंच कायम ठेविलें होतें. जयसिंगदेव १९ व्या शतकांत फार प्रसिद्ध होता.

स० १८०३ त ब्रिटिशसरकारानें आह्मी तुझ्या राज्याचें रक्षण करतों ह्मणून सांगितलें; परंतु त्यावेळचा राजा जयसिंगदेव यानें ब्रिटिशसंरक्षणावांचून अडावयाचें नाहीं, असा विचार करून आह्मांस तुमच्या रक्षणाची गरज

नाहीं ह्मणून सांगितलें. त्याच्या राज्याशीं त्यावेळीं कोणाचें वांकडे नसल्याकारणानें त्याचें कांहीं दिवस ब्रिटिशांच्या संरक्षणावांचून चाललें.

स० १८१२ ह्या वर्षीं राजा **जयसिंगदेव** यानें पेंढारी लोकांना **मिर्झापुरास** ब्रिटिशसरकारच्या प्रांतांत स्वाऱ्या करण्यास मदत दिली. **ब्रिटिशसरकारच्या** विरूद्ध राजाचें अंग आहे; असें पूर्णपणें कळल्यावरून त्यांनीं राजास तहाचीं कलमें कळविलीं तीं अशीं–ब्रिटिशसरकारानें **रेवाचे** राजास **राजा** असें कबूल करावें व **राजाचा** मानमरातब त्यास असावा. ब्रिटिशसरकारानें त्याचे रक्षण करावें. एकमेकांनीं मित्रभावानें वागावें. त्यांच्या आसपासच्या संस्थानिकाशीं जे कांहीं तंटे असतील त्या सर्वांचा निकाल ब्रिटिशसरकारच्या मध्यस्थीनें व्हावा आणि शिवाय ब्रिटिश घोडेस्वारांस **रेवाचे** राज्यांतून सुरक्षित जाऊं द्यावें व त्या राज्यांत राहूं द्यावें. त्याचप्रमाणें तुमच्या प्रांतात ब्रिटिशसरकारचे शत्रु व बंडवाले वगैरे असतील त्यांस धरून **ब्रिटिशसरकारचे** स्वाधीन करावें.

राजा **जयसिंगदेव** यानें या तहावर सही केली; परंतु तो त्या तहाप्रमाणें वागला नाहीं. उलटें त्यानें आपल्या प्रांतांतून ब्रिटिश सैन्य जात असतां त्यावर हल्ला केला व त्यांना अन्नपाणी न मिळतां उपासमार काढून मरावें अशा विषयीं त्यानें तजविजी योजल्या; पण या दोन्हीं गोष्टींत त्यास यश मिळालें नाहीं.

**इंग्रज** सरकाराशीं द्वेष भाव मात्र सिद्ध झाला. राजाच्या अशा अयोग्य वर्तना मुळें सैन्याची अवश्यकता आली. त्याच्या मुलखावर पाठविलेल्या स्वारांस पाहतांच

राजानें लढाई वगैरे न करितां आपला पश्चात्ताप दाखविला आणि मुकाट्यानें शरण गेला. नंतर स० १८१३ त पुन्हां तह झाला. त्यांतील ठराव--राजानें राज्य कारण संबंधानें दुसऱ्या संस्थानिकांशीं पत्रव्यवहार ठेवूंनये व आपले राज्यांत इंग्रजांचीं पोस्टहपीसें बांधावीं व ज्याणीं इंग्रज सरकाराशीं द्वेषबुद्धि धरली होती, त्यांस शिक्षा करावी, असें ठरलें, परंतु ह्या तहाचीं कलमें केवळ मलाच लागू आहेत; आपल्या मुलास कांहीं लागू नाहींत. असें समजून त्याणें ह्या पैकीं एकही कलम अमलांत आणलें नाहीं. आपण राज्यापासून पराङ्मुख होऊन आपला मुलगा **विशनाथसिंग** यास त्यानें गादीवर बसविलें; पण त्याचें तें करणें व्यर्थ झालें. ब्रिटिशसरकारानें **विशनाथसिंगास** तहाचीं कलमें कबूल करण्यास सांगितले आणि **विशनाथ**सिंगानें नाहीं नाहीं म्हटलें; तरी शेवटीं त्यास सर्व कलमें कबुल करावीं लागलीं. याच्या बापाचे विचार दृढ नसल्यानें असे घोंटाळे वरेचवर झाले.

स० १८१४ त **ब्रिटिश**सरकारांनीं दुसरा एक ठराव केला. त्यांत ब्रिटिश राज्यांतील कांहीं जमीनी जप्तकेल्या होत्या त्या त्यास माघाऱ्या दिल्या. त्या तहांत **रेवाचे** राजे आणि त्याचे संस्थानिक यांचे तंट्यांत आम्हीं हात घालणार नाहीं, असें सरकारानें कबूल केलें. या पुढें २० वर्षे कांहींएक विशेष झालें नाहीं.

स० १८३४ त राजा **विशनाथ**सिंग मेला व त्याचे गादीवर **रामराजासिंग** बसला. हा त्यांचे वंशावळी प्रमाणें ३२ वा राजा होय. स० १८४७ त या राजानें आपल्या राज्यांतील सती जाण्याची चाल बंद केली. स० १८५७ त राजानें इंग्रजांस चांगली मदत केली, या बद्दल राजा-

ला पुष्कळ मुलूख दिले. रेवाचे राजास दत्तकाचा अधिकार आहे. स० १८६४ त व्हाईसरायानें "त्यांस आर्डरआफ़दी स्टार आफ् इंडिया" हा किताब दिला. ह्याचे राज्यांतील कांहीं लोकांनीं जवळच्या प्रदेशांत बऱ्याच लुटालुटी सुरू केल्या होत्या, परंतु ब्रिटिशसरकारानें राजास पुष्कळ प्रकारच्या सूचना केल्यावरून त्यानें मोठ्या मेहनतीनें तें सर्व बंदकेलें. यांस १७ तोफांची सलामी आहे. येथील राज्यरीति बरी आहे.

भाग पहिला प्रकरण तेरावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण चवदावें.

## उर्चा किंवा तेहरी.

याचें क्षेत्रफळ २१६० चौरसमैल आहे. लोकसंख्या-२००,०००; उत्पन्न ९५००० रुपये आहे हें संस्थान आग्र्याचे आग्नेय दिशेस आहे.

हें बुंदेलखंडांतील पहिल्याप्रतिचें संस्थान होय बुंदेलखंडांतील पेशव्याच्या ताब्यांतून आलेलें केवळ हेंच एक संस्थान होय. स० १८१८ त राजानें गव्हर्नरजनरलास जेव्हां नजराणा दिला; तेव्हां तो ह्मणाला कीं, परकिय सत्तेचें सार्वभौमत्व कबूल करण्याचा या घराण्यास हा पहिलाच प्रसंग होय. तेहरीच्या प्राचीन इतिहासावरून पाहतां अयोध्येच्या रामचंद्रापासू[illegible] हा वंश आहे असें कळतें. रामचंद्रानंतर त्याचा मुलगा अंकुश हा गादीवर बसला त्याचे

मागून जे राजे झाले त्यानीं **गयेस** पुष्कळ देवळें बांधली. २४ वा राजा **बलदेव**, यानें **प्रयाग** अथवा अलाहाबाद येथें पुष्कळ देवालयें बांधिली. त्याचा मुलगा **इंद्र** यानें प्रसिद्ध जगन्नाथचें देऊळ बांधलें. राजा **कूर्म** यानें **काशीप्रांत** घेतला. या राजाचा दुसरा मुलगा **किंकरु** यानें हिमालयावर मोठी अघोर तपश्चर्या केली. त्यामुळें त्यास **देवता** प्रसन्न झाली. तो आपला देह **देवीस** अर्पण करण्याच्या बेतात होता, इतक्यांत त्याच्या पुढें **देवी** साक्षात उभी राहिली, त्यानें आपल्या हातानें आपल्या अंगावर खड्ग घात केल्यानें जे रक्त बिंदु पडले होते, तेथें **अमृत** शिंपडल्याबरोबर तेथें एक लहानसा मुलगा उत्पन्न झाला; त्याचें नांव **बिरासिंग** असें ठेविलें. त्यानें आपल्या लोकांस **बुंद** ह्मणजे **बिंदु** पासून **बुंदल** असें नांव ठेविलें त्यानें लौकरच पुष्कळ राज्य संपादन केलें आणि नीतीनें प्रजेचें पालन केलें. राजा **प्रतापरुद्र** यानें **उर्वा** शहराची स्थापना केली. त्यानें आपलें राज्य मुलाचे स्वाधिन करून आपण जो लढाईस गेला, तो त्या लढाईतुन माघारा आला नाहीं.

ह्या राजाची न्याय दया वगैरे विषयीं फार ख्याती होती. तो **अकबराचे** कारकीर्दीत फारच शूर असा वाखाणला होता. याचा वडील मुलगा **राम** यास अयोध्येचें राज्य दिलें. धाकटा मुलगा **नरसिंगदेव** यांस जहांगिरानें **उर्वा** येथें कायम केलें आणि **राम** याला पितृपरंपरांगत राज्यास मुकल्याबद्दल वाईट वाटूं नये ह्मणून त्याला दुसरा मुलूख दिला. **नरसिंगदेव** यास १२ मुलें होतीं; त्यां पैकीं तिसरा मुलगा **औरंगजेबाबरोबर**

**औरंगाबादेस** गेला व तेथें त्यानें एक गांव वसविलें, ते अद्याप त्याचे नांवानें प्रसिद्ध आहे.

राजा **चंपतरायानें** शहाजानास खंडणी देण्याचें नाकारिलें ह्मणून **बादशाहाच्या** सैन्यानें **बुंदेलखंडावर** २ वेळां स्वाऱ्या केल्या आणि चोहोंकडे धंडाळी माजविली; परंतु **बादशाहाच्या** सैन्याचे हातून **त्यां संस्थानचें** तीळभर ही वांकडें झालें नाही आणि **बादशाहाचें** सैन्य परतलें तेव्हां **बुंदेलखंडाचें** लोकांनीं त्यासैन्याची यथास्थित चांदी केली. **चंपतरायानें औरंगजेबास** मदत केली, त्या लढाईंत त्याचा मुलगा **चतरसाल** हा १३ वर्षांचा होता तो प्रमुख होता. या लढाईंत **औरंगजेबास** जो जय मिळाला त्याचें मुख्य कारण या बापलेकांस **यमुना नदीपलीकडच्या** देशांतील सर्व प्रकारची पूर्ण माहिती हेंच होय. **बादशाहानें** आपल्या **यवनधर्मास** योग्य अशा कृतघ्नतेनें **चंपतराय** मेल्यावर आपलें सैन्य **बुंदेलखंडावर** पाठविलें आणि तेथील लोकांस बला-त्कारानें **मुसलमान** करण्याचा यत्न केला.

या वेळेस **चंपतरायाचा** मुलगा **चतरसाल** हा दक्षिणेंत **शिवाजी** जवळ होता. एके वेळीं **शिवाजीचें** आणि **चतरसालाचें** बोलणें चाललें असतां **शिवा-जीनें चतरसालास** स्वदेश व स्वधर्मसंबंधी कर्तव्य-कर्माचा उपदेश केला. नंतर **शिवाजीनें** कमरेची तरवार उपसून सांगितलें कीं, भवानी देवीची मर्जी अशी आहे कीं, यवनाची चाकरी करून **स्वदेश-द्रोहाच्या** पातकांत न पडतां भरत भूमीस यवन राजा-च्या दुष्ट अंमलापासून मुक्त करून तीवर "**स्वातंत्र्य-सूर्याचा प्रखर प्रकाश पाडावा.**" चतरसालानें त्याचा

उपदेश मान्य करून ... दुष्ट यवनांस आपल्या राज्यांतून ... देऊन बुंदेलखंडाचा बहुतेक प्रांत घेतला.

चतरसालानें दातिया, सावतुर, झाशी आणि रेव्याचा कांहीं भाग इतके मुलूख जिंकून आपले राज्यास जोडले. तो मेल्यावर दातिया हें याच घराण्यांतील एका पुरुषाचें संस्थान झालें. त्याच्या प्रदेशापैकीं झाशीचा जितका प्रदेश त्याचे ताब्यांत होता; तो सर्व त्यानें बाळाजी बाजीरावाचे नांवें करून टाकिला होता. तेहरीप्रांत आणि त्याची राजधानी उर्चा यांचें जें स्वातंत्र्य होतें, त्यास कोणीं अडथळा केला नाहीं.

पुढें एकंदर राज्याचे विभाग झाल्यापासून नुकसान फार झालें. चतरसालानें जेव्हां बुंदेलखंडांत स्वतंत्र राज्य स्थापन केलें तेव्हां राज्याचें उत्पन्न दोन कोट रुपये होतें; परंतु तेंच स० १८३७ त तेहरीचें उत्पन्न सहा लक्षसुद्धां नव्हतें; पुढें पुढें तर याहीपेक्षां कमी उत्पन्न होऊं लागलें.

स० १८०९ त तेहरीचा राजा आणि इंग्रजसरकार यांच्यामध्यें प्रथम पत्रव्यवहार सुरू झाला, त्यावेळेस राजानें बुंदेलखंडांतील इतर संस्थानिक जसे इंग्रजसरकारानें वसईच्या तहाअन्वयें आपल्या आश्रयाखालीं घेतले; त्याच प्रमाणें आपणांसही इंग्रजसरकारानें आपले आश्रयाखालीं घ्यावें अशाविषयीं विनंति केली; त्यावेळेस " लार्डकार्नवालीस " व त्याचे मागून आलेले गव्हर्नर यांनीं असा ठराव केला होता कीं हिंदुस्थानांतील ' नेटीव्हराजांचे कारभारांत ' हात घालावयाचा नाहीं. ह्मणून राजाची विनंती मान्य करतां येईना, परंतु तो काळ अशा प्रका-

रच्या राज्यपद्धतासी अगदीं प्रतिकुळ होता. स० १८१२ मध्यें पेंढारी लोकांनीं मिर्झापुरावर स्वाऱ्या केल्या; त्या स्वाऱ्यांच्यावेळीं ब्रिटिशसरकारास वाटलेंकीं, बुंदेलखंडाचे स्वतंत्रराजांस मदत करून त्यांच्या शत्रूचा मोड केला असतां फार फायदा होईल. असें वाटतांच उर्वाचा राजा विक्रमजित याशीं इंग्रजसरकारानें तह केला; त्या तहा प्रमाणें राजाला ब्रिटिशसरकारानें आपल्या मित्रांत घेतलें व त्याच्याकडून कवडीही खंडणी न घेतां त्याचें राज्य वंशपरंपरा त्याचेकडे चालविण्या विषयीं ब्रिटिशसरकारानेंहमी घेतली.

राजानें जे ठराव कबूल केले ते असे. "राजानें ब्रिटिशसरकाराबरोबर शत्रुभावानें वागूं नये, इतर संस्थानिकाशीं जसे ज्यांचे हक्कसंबंधानें वगैरे तंटे बखेडे होतील; ते सर्व ब्रिटिशांचे मध्यस्थीनें तोडावे. त्याच्या राज्यांतून जाऊन जर कोणी ब्रिटिशसरकारचे मुलुखावर लुटालूट करतील तर त्यास आपल्या राज्यांतील रस्ते बंद करून अडवावें व त्याचप्रमाणें इंग्रजसरकाराचे स्वार राज्यांतून जाऊं द्यावें" व त्यांस राज्यांत राहण्यास परवानगी असावी. नंतर पुढें जेव्हां "मार्किसहेस्टिंग्स" हे आपले बरोबर सैन्य घेऊन पेंढारीलोकांचा नाश करण्यासाठीं तेहरीप्रांतांतून गेले; तेव्हां राजा विक्रमजितानें ब्रिटिशसरकारास सार्वभौमत्वाच्या नात्यानें नजराणा दिला आणि तो त्यास ह्मणाला "उर्वाच्या राजास दुसऱ्याचें सार्वभौमत्व कबूल करण्याचा हाच पहिला प्रसंग होय."

राजा विक्रमाजित स० १८३४ त मेला; त्याचे पूर्वीं त्याचा एकुलता एक मुलगा धर्मसिंग हा मरण पावला होता, यामुळें राजाचे मागून त्याचा भाऊ तेजसिंग हा गादीवर बसला. तो स० १८४२ त मेला. यानें मरतेवेळीं आपल्या चुलत भावाचा मुलगा सर्जुनसिंग यांस दत्तक घेतला होता. परंतु पूर्वीचा राजा धर्म याच्या बायकोनें असें ह्मणणें पडलें कीं, मला दत्तक घेण्याचा अधिकार आहे. जेव्हां हें प्रकरण हातघाईस येऊन पोंचलें, तेव्हां इंग्रजसरकारास फौज पाठविणें भाग पडलें.

ब्रिटिशसरकारानें सर्जुनसिंगास त्याचा योग्यवारसा पोंचल्यावरून व शिवाय आसपासच्या संस्थानिकांच्या संमतीवरून गादीवर बसविलें आणि तो मोठा होई तो पर्यंत रांणीस प्रतिनीधि नेमिलें. सर्जुनसिंग हा स्वतः राज्यकारभार करी तों पर्यंत पुष्कळ काळ लोटला परंतु शेवटीं त्यानें राज्याचा स्वतः फार दिवस उपभोग घेतला नाहीं.

त्याच्या मरणानंतर त्याच्या विधवेनें बुंदेलखंडातील संस्थानिकाच्या अनुमतानें हमीरसिंग यास दत्तक घेतलें हा लहान असतांना राज्य चालविण्यासाठीं जे प्रतिनिधि नेमले होते; त्यांनी स० १८५७ त चांगली मदत केल्यावरून त्यांना शाहीस जी खंडणी द्यावी लागत होती ती ब्रिटिशांनीं माफ केली. स० १८६२ त यांस दत्तकाच्या हुकुमाची सनद देण्यांत आली. यांना ११ तोफांची सलामी आहे. स० १८४७ त या राज्यांतील सतीची चाल बंद झाली. हल्लीं राज्यव्यवस्था चांगली आहे.

भाग पहिला प्रकरण चवदावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण पंधरावें.

## दतिया.

यांचें क्षेत्रफळ ९५० चौरस मैल आहे. लोकसंख्या १२००००आहे. आणि उत्पन्न १००००००रुपये आहे.

या संस्थानाचे राजे उर्छा संस्थानाच्या घराण्यांतील आहेत. तथापि पासून हे स० १७३५ त विभक्त झाले; तरी ते पहिल्या प्रमाणेंच स्वतंत्र होते. त्यांनीं पेशव्यांचें सार्वभौमत्व कबूल केलें होतें.

स० १८०३ मध्यें जेव्हां पेशव्यांकडून वसईचा तह करून घेतला, तेव्हां पेशव्यांचीं जीं बुंदेल खंडातील मांडलीक संस्थानें,त्यांनीं इंग्रज सरकारचें स्वामित्व कबूल केलें; त्याच वेळेस या संस्थानीकांनींही कबूल केलें. स० १८०४ च्या मार्च महिन्याचे १५ तारिखेस रावराजा-परचीत याजबरोबर तह करण्यांत आला. त्यांतील कलमें ब्रिटिश सरकारच्या रक्षणाचीं व फायद्याचीं होतीं. स० १८१७ मध्यें रावराजा यानें इंग्रज सरकारास पेश-व्याला पदच्युत करण्याच्या कामांत जी मदत केली; त्या-साठीं राजाला सिंधचे पूर्वेस जे प्रांत आहेत ते इंग्रज लोकांनीं दिले.

स० १८३९ त राजापरचीत मेला. त्याच्या मा-गून दत्तक घेतलेला त्याचा आवडता विजय बहादूर हा गादीवर बसला. गतराजाच्या घराण्यांतील लोकांनीं अशी तक्रार केली कीं, आह्मीं जवळचे वारस असतां हा दुसरा लोकांचा मुलगा कां दत्तक घेतला? दत्तक घेतला

तरी यांस गादी मिळू नये असें यांचें मत होतें. परंतु ब्रिटिश सरकारानें तें कांहीं एक न ऐकतां विजयबाहदुरास गादीचा वारस कबूल केला; तेव्हां त्याच्या विरूद्ध कोणाचेंही चाललें नाहीं. **विजयबाहदुरानें** राज्य चांगलें केले. तो लोकांस मोठा प्रिय होता. स० १८१७ त **विजयबाहदुर** मेला. त्याला दोन मुलगे होते. एक सशास्त्र, त्याचे नांव **भवानिसिंग** व दुसरा अशास्त्र, त्याचे नांव **दुर्जनसिंग. भवानिसिंग** हिंदूधर्म शास्त्राप्रमाणें योग्य वारस ह्मणून त्यास राजा कबूल केलें; परंतू हें **दुर्जनसिंगास** पसंत पडेना व हा दंगा वगैरे करणार इतक्यांत त्याला **दतिया** येथून घालवून दिलें. नंतर लौकरच त्याच्या आईनें बंड केलें. तेव्हां इंग्रज सरकारास स्वार पाठविणें भाग पडलें, त्यांनीं लवकरच हा दंगा मोडला. आणि बंडवाल्यांस एकदम कैद केलें. मुख्य मुख्य पुढारी लोकांस **चुनारा** येथें कैदेंत ठेवलें व राणीवर सक्त नजर ठेवली. स० १८६१ त पुन्हां त्याबद्दल तंटा झाला, परंतु तो लौकरच विझला. यांस ११ तोफांची सलामी होती ती स० १८४७ त कांहीं राजकीय संबधानें बंद झाली.

भाग पहिला प्रकरण पंधरावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

### भाग पहिला प्रकरण सोळावें.

## सांवतूर.

यांचें क्षेत्रफळ १७५ चौरस मैल आहे. लोकसंख्या ३०००० आणि उत्पन्न ४१०,००० रुपये आहे.

स० १७६२ पर्यंत **सांवतूर** आणि **दतिया** हीं दोन्हीं मिळून एकच संस्थान होतें. नंतर कांहीं कारणानें **सांवतूर** **दतिया** पासून विभक्त झालें. **दतियानें** जरी **पेशव्यांचें** सार्वभौमत्व कबूल केलें तरी **सांवतूर** स्वतंत्रपणाचा बाणा बाळगून होतें. **पाणिपत** येथें **मराठ्यांचा** पराभव झाला, ही संधि साधून ज्या लोकांनीं आपलें स्वातंत्र्य वाढविलें तेंच **सांवतूरचे** राज्य होय. जरी हे संस्थान आपणांस स्वतंत्र ह्मणवीत असे, तथापि त्याचें मराठ्यांशीं फार वैर होतें व त्यांचा या संस्थानास मोठा दरारा असे.

स०१८०५ त जेव्हां **शिंदे** आणि **होळकर** यांचा पराभव झाला; तेव्हां **राजारणजितसिंग** यानें **ब्रिटिशसरकाराजवळ** आपणांस आश्रय देण्यासाठीं विनंति केली. तद्वाच्या ठरावाचे कागद पत्र वगैरे चालले होते. इतक्यांत **लार्डकार्नवालीस** आले, तेव्हां **राजानें** **इंग्रजसरकास** वारंवार आश्रयाविषयीं विनवणी केली; परंतु स० १८१७ पर्यंत त्याच्या प्रमाणें **इंग्रजसरकार** कबूल करीना.

पुढें **सांवतुराबरोबर** **इंग्रजसरकारानें** इतर संस्थानिकांप्रमाणें ठराव केलें. **सांवतूरच्या** राजानें **इंग्रजसरकारचें** कल्याण चिंतन करावें आणि तैनातींत घोडेस्वाराची सेना ठेवावी; ह्मणजे **इंग्रज सरकार** **सांवतूरच्या** राज्याचें शत्रुपासून रक्षण करील. त्या प्रमाणें राजानें जे घोडे स्वार दिले ते मध्यप्रांताच्या फौजेस सामील केलें. त्यांनीं कामगिरी चांगली केली.

स० १८२७ त **राजारणजितसिंग** मेला. त्याच्या मागून त्याचा मुलगा **नंदुपत** गादीवर बसला;

तेव्हां तो ६ महिन्यांचा होता. त्याच्या आईस त्यावेळीं प्रतिनिधि नेमिलें होतें; परंतु जसा **नंदुपत** मोठा झाला, तशी त्याची चित्तवृत्ति विक्षिप्त दिसूं लागली. त्यानें लग्न केलें, त्याला मुलेंबाळेंही झालीं, परंतु त्याचे चित्ताचा विक्षिप्तपणा तसाच राहिला. तो मोठा झाला तेव्हां **राणीनें ठाकुर** आणि इतर मोठमोठे अधिकारी यांच्या संमत्तीनें **नंदुपत** यास बंदींत ठेऊन स्वतः राज्यकारभार चालविला.

वडील मुलगा **चेतसिंग** ज्याला **राजाबहादर** ह्मणत, तो वयांत येईपर्यंत तिनें स्वतः राज्यकारभार चालविला. स० १८९४ **त राजाबहादर** २१ वर्षांचा झाला, तेव्हां त्यानें **पोलिटिकलएजंटाकडे** अशी फिर्याद केली कीं, माझी आई मला राज्यकारभारांत कांहींएक समजूं न देता राज्यांत अवाढव्य खर्च करितें, आणि ती व्यभिचारणी असून तिनें आजपर्यंत पुष्कळ प्रकारचीं वाईट कृत्यें केलेलीं आहेत. त्यांतून एक दोन कृत्यें त्यानें **ब्रिटिश** अंमलदारांस दाखविलीं, या मुळें अंमलदारांचीही पूर्ण खात्री झाली.

**ब्रिटिशसरकारानें** एकदम राज्यकारभार **राजाबहादर** यानें करावा असा हुकूम केला. हुकुमाप्रमाणें लगेच तसें केलें आणि विक्षिप्त **राजा** व **राणी** यांस दुसरीकडे पाठविलें व तेथें त्यांस नेमणूक करून दिली. **राजकुमाराच्या** मदतीसाठीं ६ मनुष्यांचें एक **कौन्सिल** नेमण्यांत आलें. यांस दत्तकाचा अधिकार असून ११ तोफांची सलामी आहे.

**भाग पहिला प्रकरण सोळावें समाप्त.**

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण सतरावें.

## कच्छ.

याचें क्षेत्रफळ ६७६४ चौरस मैल आहे. लोकसंख्या ५०९९२२ आणि उत्पन्न ९०००००, रुपये आहे. याच्या उत्तरेस व पूर्वेस गायकवाडाचें राज्य, दक्षिणेस कच्छचें आखात व काठेवाड; नैर्ऋत्येस हिंदीमहासागर.

कच्छचेराज्यांत एक मोठें चमत्कारिक **रण** ह्मणून अरण्य आहे; त्याचे दोन भाग किंवा २ **रणें** ह्मटलें तरी चालेल. मोठें **रण** तें **कच्छचे** उत्तरेस आहे; ह्याची लांबी पूर्वपश्चिम १६०, मैल व रुंदी उत्तरदक्षिण ८० मैल आहे व क्षेत्रफळ ७००० चौरस मैल आहे.

धाकटें **रण** कच्छ व **गुजराथ** ह्यांच्या मध्यें आहे ह्याचें क्षेत्रफळ १६०० चौरस मैल आहे. ह्या रणाची जमीन उन्हाळ्यांत कोरडी आणि कठीण अशी असते. येथें मृगजळांचा चमत्कार वारंवार दृष्टिस पडतो. येथें स० १८१९ त एक मोठा भूमिकंप झाला व ह्या योगें या भुमिकंपाचे ठिकाणीं एक मोठा बांध उत्पन्न झाला आहे. त्यास येथील लोक '**आल्लाबांध**' असें ह्मणतात.

कच्छ प्रांत बहुत करून रानटी लोकांनीं व्यास आहे. प्राचीनकाळीं येथें **चौरा** लोकांचें राज्य होतें, परंतु त्या लोकांचा हल्लीं अगदीं ऱ्हास झालेला आहे. हे लोक **झाराचा** मुलगा **जामलाखा** याचे

हाताखालीं १९ व्या शतकांत सिंध पासून आले. झारारा-ज्याचें घराणें ओळखतां यावें म्हणून यांस झारी असें आडनांव दिलें आहे. त्यांचा धर्म हिंदु किंवा मुसलमान यांविषयीं अद्याप पर्यंत निर्णय झालेला नाहीं. कच्छ प्रांतांत जामलाखाचे ३ मुलांनीं कच्छ प्रांताचे विभाग केले.

स० १५४०त या तिन्ही घराण्यांत १ जामदादर २ जामहम्मीर आणि ३ जामरावळ असे पुरुष होते. कच्छ प्रांताचे पूर्वेकडील मुलखांत वाघर लोकांवर जामदादर यानें राज्य केलें.

रावळ यानें हम्मीरास मारून, बलात्कारानें त्याचें राज्य आपले राज्यास सामिल करून, त्यानें त्याचा कच्छाचे पश्चिमे कडील मुलूख आपले राज्यास जोडला; परंतु हम्मीराचा खेंगा म्हणून एक मुलगा होता, त्यानें अमदाबादच्या नबाबाची मदत घेऊन आपले बापाचे गेलेले सर्व मुलुख आपल्या ताब्यांत घेतले; इतकेंच नव्हे परंतु त्यानें जामरावळ यास कच्छांतून काढून लाविलें आणि दादर यास जिंकून वश केलें; या मुलानें अमदाबादच्या नवाबापासून कांहीं मुलख व राव ही पदवी मिळविली. ही पदवी अजून कच्छचे राजास चालु आहे.

स० १५८२ त कच्छसंस्थानचें वैभव शिखरास जाऊन पोंचलें होतें. त्या वेळेस राव देसलचे स्वार कच्छ, पारकर, आणि काठेवाड येथें होते. रावळ लाखा यानें आपल्या मुलखावरीलं आपलें स्वामित्व घालविलें. हा स० १७५१ त गादीवर बसला व हे त्याचे मागून रायधोर हा गादीवर बसला. हा तर

राज्यास अगदींच अयोग्य असा होता. याचे राज्यांत बेबंदशाई व बंडाळी फार माजली होती. राव घोर स० १७९६ त मेला.

याचे मागून रावरायधन हा गादीवर बसला तो फार विषयी होता त्याचा स्वभाव त्याचे स्वाधीन मुळीच नव्हता; तो तऱ्हेवाईक स्वभावाचा होता, शेवटी त्याच्या या स्वभावाचा परिणाम असा झाला कीं स० १८०२ त त्याच्या मांडलिक सरदारानीं त्याला कैदेंत ठेविलें. नंतर अधिकाराबद्दल झगडे सुरु झाले. त्यांत जमादार फत्तेमहंमद म्हणून एक मोठा शूर व धाडशी घोडेस्वार होता, त्यानें याकामांत आपला हात साधून घेतला. स० १८०२ त रावाचा भाऊ बाबा यानें बंड केलें आणि फत्तेमहंमद यास हाकून दिलें; परंतु पुन्हां त्यानें कांहीं थोडासा प्रांत जिंकून त्यावर तो अंजार येथून अम्मल करीत असे, बाकीचा मुलुख हंसराज यानें आपले ताब्यांत घेतला होता.

भुज राजधानी लखपतरायाचे ताब्यांत होती; तेथून त्यानें गुजराथ आणि काठेवाड प्रांतांवर स्वाऱ्या केल्या व त्याच वेळापासून चांचेपणा करून द्रव्य लुटावें अशीहि त्यास इच्छा झाली, त्यानें पैसे मिळविण्यासाठीं लुटालुटीचा क्रम आरंभला; त्यामुळें स० १८०७ च्या अखेरीस ब्रिटिशसरकारास फत्तेमहंमद आणि हंसराज यांशीं ठराव करणें भाग पडलें, त्या ठरावाप्रमाणें या दोघांनीं कच्छचे आखात आणि रण यांचे पूर्वेचे मुलखांत हात घालूं नये, चांचेपणा बंद करावा व आपले राज्यांत अमेरिकन व इतर

**युरोपीयन** यांस प्रतिबंध कररून राज्य करण्याची योग्यता येई तोंपर्यंत **मांडवी** प्रांत **हंसराजाकडे** राहील असें अभिवचन दिलें. या पुढें थोड्याच दिवसांनी **हंसराज** मेला.

त्याचे मागें त्याचा मुलगा गादीवर बसते वेळीं गृहयुद्धाचा प्रसंग येऊन पडला व इंग्रजसरकारास व्यवस्था लावण्यासाठीं आपली फौज नेणें भाग पडलें. **हंसराजाचे** पुर्वी जेजे ज्यांचे मुलूख होते तेते त्यांस दिले तहा प्रमाणें न वागल्याकारणानें पुन्हां स० १८१३ त **ब्रिटिशसरकारास** राज्य कारभारामध्यें हात घालावा लागला. पुन्हां तह वगैरे चालला होता इतक्यांत **फत्तेमहंमद** मेला, याचे मागून **रावरायधन** हा महिनाभरच जगला त्याचे मागून **रावभारमल्ल** हा गादीवर बसला. त्यास **फत्तेमहंमदाच्या** २ मुलांनीं मदत केली होती, त्याचें वय त्यावेळीं १८ वर्षांचे होतें. वास्तविक पाहतां त्याचा ,पुतण्या गादीवर बसणें सशास्त्र होतें. **भारमल्ल** हाही बापाप्रमाणें विलक्षण असल्या कारणानें त्यानें लोकांवर जुलूम केले. आसपासच्या संस्थानिकांशीं तंटे केले आणि थोड्याच दिवसांनीं तो **फत्तेमहंमदाच्या** मुलांच्या आश्रया पासून मुकला; कारण त्यांपैकीं एक जण तर भर दरबारांत मारला गेला व दुसरा तर विक्षिप्तच होता.

**रावाला** त्यावेळीं कोणी विचारणारा नसल्या कारणानें दिवसें दिवस त्याची कृति तऱ्हेवाईक होत चालली. त्यांतच अम्मल सेवन! मग काय विचारावें? राज्यांत इतकी अव्यवस्था व जुलूमचालले कीं, इंग्रज सरकारास मध्यें पडून व्यवस्था व शांतता करणें

भागपडलें. स० १८१६ च्या जानेवारींत इंग्रज लोकांचें सैन्य त्यांचे राज्यांत गेलें व एक तह ठरविण्यांत आला. त्यांतील कलमें—रावाच्या प्रजेनें, त्याच्यां मुळें जें जें नुकसान झालें तें त्यानें भरून द्यावें; चांचेपणा करूं नये व कायदेशीर वागून अंजारचा किल्ला स्वाधीन करून घ्यावा. हे ठराव मान्य असल्यास इंग्रजसरकारानें त्याचे राज्यांतील अव्यवस्था मोडून टाकून चांगली व्यवस्था करावी आणि प्रजेस राजाची आज्ञा मान्य करण्यास लावावें. या प्रमाणें एका महिन्यांत व्यवस्था झाली. पुढें कांहीं महिन्यांनीं कच्छचे राज्यांत अव्यवस्था बेबंदशाही आणि २० वर्षे बंडाळी माजल्या कारणानें सर्व देश दरीद्री होऊन गेला होता; ह्मणून इंग्रजसरकारानें मेहेरबानीनें आपल्या फौजेचा खर्च व वार्षिक खंडणी राजास माफ केली; परंतु हे ठराव होऊन कांहीं दिवस झाले तों पुन्हां राव आपले पहिले पदावर आले त्यानें आपले चुलत भावास ठार मारलें.

त्यानें ब्रिटिशसरकारच्या आश्रयाखालचा एक वाधीर संस्थानिक होता त्यावर हल्ला केला; त्यांतील हेतु हा कीं, इंग्रजसरकारच्या आश्रयाखालीं जे राहतात, त्यांस अशी शिक्षा मिळावयाची, हें दाखविण्या साठीं त्यानें लोकांवर व संस्थानिकांवर इतका जुलूम केला. शेवटीं मुख्य मुख्य झारीआ संस्थानिकांनीं ब्रिटिशसरकरास मध्यें पडण्यास सांगितलें.

ब्रिटिशसरकारानें मध्यें पडल्यावांचून आतां गत्यंतरच नव्हतें; ह्मणून स० १८१६ त तहाचीं कलमें रद्द करून सरविलीयमग्रांटकेर यांच्या हाताखालीं इंग्रजसरकारानें सैन्य देऊन त्यांस कच्छचे

राजाकडे पाठविलें. त्यावेळीं राव अगदीं कामांतून गेला होता; त्यास गादीवरून पदच्युत केलें आणि त्याचे जागीं त्याचा मुलगा देसलजी यास गादीवर बसविलें. राव देसल लहान होता, ह्मणून प्रतिनिधि मंडळा-कडून राज्यकारभार चालवावा असें ठरलें.

या प्रतिनिधि मंडळांत सर्व संस्थानिकांचें आग्रहा-वरून ब्रिटिशरेसिडेंटानें अध्यक्षस्थान स्विकारण्याचें कबूल केलें. कच्छप्रांताचें संरक्षण करितां यावें ह्मणून तेथें सैन्य ठेवलें; तें सैन्य ब्रिटिशसरकारानें वाटेल त्यावेळीं माघारें न्यावें अथवा मुळींच काढून टाकावें. असें ठरलें होतें. स० १८१९ च्या अक्टोबरांत जो तह झाला त्या तहान्वयें त्या सैन्याचा खर्च कच्छाच्या राज्यांतून मिळावा असें ठरलें. त्यांत कांहीं नवीन कलमें घातलीं, त्यांतील एका कलमांत असें होतें कीं, झारिआ सं-स्थानिक व त्याच प्रमाणें कच्छ आणि वाघर येथील सर्व रजपूत संस्थानिकांच्या संस्थानांचा त्यांनीं पूर्ण उपभोग घ्यावा आणि ब्रिटिशसरकारानें त्यांचें रक्षण करण्याविषयीं हमी घ्यावी.

प्रतिनिधि मंडळानें जे नियम केले, त्यांतील पहिलें कलम असें कीं; वाघर लोकांनीं शांतता राखण्याचें कबूल केल्यावरून त्यांच्या मुख्यास कांहीं संस्थानें द्यावीं. स० १८१२त कच्छाच्या राजानें प्रतिवर्षास हजार रुप-ये देण्याचें कबूल केल्यावरून त्यास पुन्हां अंजारचा-किल्ला, शहर आणि प्रांत दिला. ब्रिटिशसरकारानें कच्छाच्या राज्याचें रक्षण करण्यासाठीं जी फौज ठे-वली होती, तिच्या खर्चाबद्दल २ लाख रुपये वर्षास देण्याचें ठरलें होतें; परंतु संस्थानास एवढा खर्च दे-

ण्याचें सामर्थ्य नसल्याकारणानें त्यांनीं कांहीं सूट घातली.

स० १८३२ त कोर्टआफडैरेक्तरनें असें ठरविलें कीं, अंजारप्रांत माघारा दिल्याबद्दल कच्छ संस्थानावर जे कर बसाविले होते ते वाजवीपेक्षां फाजील आहेत असें वाटल्यावरून ते सर्व कर सोडले. याप्रमाणें सर्व करांची सूट दिली व मागील एकंदर २ लाख रुपये देणें निघालें, या रकमेबद्दल ब्रिटिशसरकारानें असें ठरविलें कीं, जसजसें इंग्रजसरकार कच्छमधील सैन्य कमी करील तसतसा खर्च कमी करावा. एकंदर खर्चाची रकम ८८ हजारांत ठेपली. किंवा सैन्य मुळींच कमी केलें तर मात्र अंजारप्रांताबद्दल पैसे मागण्यास चिंता नाहीं. याप्रमाणें न्यायानें सर्व व्यवस्था केल्यापासून कच्छच्या शिरावरचें देणें पुष्कळ उतरलें.

स० १८३३ त पदच्युत राव भारमल्ल याच्या वर्तणुकीबद्दल गवगवा झाला. त्यानें वाईट उपदेशानें आपल्या मुलाचें मन बिघडविण्याचा प्रयत्न केला. राव भारमल्ल ह्याची वर्तणूक कशी आहे याबद्दल देखरेख करणारे जे लोक होते, त्यांना त्याच्या अयोग्य वर्तनावरून फार त्रास झाला व शेवटीं त्याचें दुष्टाचरण बंद करण्यासाठीं त्याचा चांगला बंदोबस्त करून त्याला दुसऱ्या एका वाड्यांत नेण्याचा ठराव झाला. त्याचवेळेस तरुण रावास प्रतिनिधि मंडळांत घेऊन त्यास राज्यकारभाराचें शिक्षण देण्यास सुरुवात झाली होती. हा शिक्षणक्रम चालला असतां रावाची बुद्धिमत्ता इतकी दिसून आली कीं, स० १८३४ च्या जून महिन्यांत जरी त्याचें १९ वर्षांचें वय होतें तरी त्यास पूर्ण मुखत्यारी दिली.

रावदेसलच्या राज्यकारभारावरून त्यानें आपल्या अधिकाराचा सद्विनियोग केला! स० १८३५ च्या दिसेंबर महिन्यांत ब्रिटिशसरकारानें गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं जे प्रयत्न केले त्यास त्यानें फार मदत केली. त्यानें आपल्या राज्यांत जो कोणी गुलामांचा व्यापार करून मुलें वगैरे विकील त्यास जबर शिक्षा मिळेल असा जाहिरनामा लावला.

स० १८३८ त इंग्रजसरकारची व काबुलची लढाई सुरु झाली, त्या लढाईत रावानें इंग्रजसरकारास पुष्कळ प्रकारची मदत दिली. ही मदत करण्यासाठीं त्यास पुष्कळ खर्च पडला. तो खर्च इंग्रजसरकार माघारें देत असतां त्यानें घेतला नाहीं. ह्या त्याच्या उदारपणाबद्दल ज्यावेळेस त्याच्या राज्यांत एक वर्ष मुळींच धान्य पिकलें नाहीं, त्यावेळीं त्यास १ वर्षाचा सैन्याचा खर्च इंग्रजांनीं दिला व त्याचप्रमाणें पुढें ४ वर्षें वार्षीक देणें देण्यास त्याला सवड सांपडली नाहीं व त्याचें योग्य कारण त्यानें ब्रिटिशसरकारास असें कळविलें कीं, शेतकी मुळींच न पिकल्याकारणानें खजिन्यांतील पैसा रयतेच्या निर्वाहास खर्च केला आहे व यामुळें वार्षिक देणें होत नाहीं. हें ह्मणणें ब्रिटिशसरकारानें मान्य केलें.

स० १८४० त असा एक ठराव झाला कीं, वाऱ्याच्या योगानें मांडवीबंदरांत जर जहाजें गेलीं तर त्याची जकात घेऊं नये. स० १८५२ त सती जाण्याची चाल बंद केली व यापासून त्यावेळीं पुष्कळ दंगे झालेले आहेत. स० १८६० त रावदेसल मेला.

त्याच्या मागून राव प्रागमल्ल हा गादिवर बसला. यानें कोणतेंही महत्वाचें कृत्य केलें नाहीं.

याचे मागून राव खेंगारजी हा गादीवर बसला. हा ज्यों वेळीं लहान होता त्यावेळीं राज्यकारभार ब्रिटिशसरकारचे हातीं होता व त्यावेळीं राज्यकारभार ब्रिटिशानीं चांगला सुधारला. खेंगारजी वयांत आल्यावर सर्व राज्यकारभार त्यांस दिला. हल्लीं राज्यकारभार चांगला चालला आहे. यांस दत्तकाचा अधिकार असून २२ तोफांची सलामी आहे. कच्छप्रांतांत लखपत या नांवाचें एक मुंबई सारखें भव्य, पण ओसाड शहर आहे. हें बंदर होतें. तें बंदर सिंधुनदीचा ओघ फिरल्यामुळें बंद झालें. तेव्हां तेथील सर्व व्यापारी कराचीस आले. हल्लीं लखपतात मुंबई सारख्या मोठमोठ्या हवेल्यां, महाजनवाड्या आणि मंदिरें आहेत; तरी त्यांत वस्ती मुळींचनाहीं. बंदर मोडतांच लखपत ओसाड पडलें आणि कराची वसली; असें तिकडचे लोक ह्मणतात. एथिल वस्ती एक लाख होती ह्मणून यांस लखपत हें नांव पडलें.

भाग पहिला प्रकरण सतरावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण अठरावें.

## भोपाळ.

याचें क्षेत्रफळ ६७६४ चौरसमैल आहे. लोक संख्या ६६३६०६ आणि उत्पन्न १३७६२९२ आहे. भोपाळ

च्या संस्थानांची स्थापना १७ व्या शतकांत दोस्तमहंमदखान नांवाच्या एका अफगाण सरदारानें केली.

स० १६९० त बादशाहानें दोस्तमहंमद यास भैरशिआ प्रांतावर मुख्य नेमलें. बादशाहा मेल्यावर फारच घोंटाळा झाला, त्या घोंटाळ्यांत त्यानें आपणास बादशाहाच्या चाकरीबद्दल हा प्रांत जाहागीर आहे, असें सांगून तो त्या प्रांताचा नबाव झाला. या राज्य संपादनांत त्यानें पुष्कळ राज्यकारणें, युक्त्या व लबाड्या केल्या होत्या. त्याप्रमाणें त्यास जयही आला.

बादशाह मेल्यावर दोस्तमहंमदखान १६ वर्षे जिवंत होता. तो स० १७२३ त मेला. त्यावेळीं त्याचें वय ६६ वर्षांचें होतें. त्याची लोकांमध्यें हा मोठा साहसी, धैर्यवान व शूर आहे अशी किर्ति होती. तो मेल्यावर राज्याचे वारस दोघे होते. वडील होता त्याचें नांव यारमहंमद हा बेकायदेशीर आणि अशास्त्र होता. दुसरा सुलतानमहंमद हा लहान असून सशास्त्र होता, तोच गादिचा मालक झाला. पुढें निजामानें यारमहंमदाचा पक्ष घेऊन त्यानें पुष्कळ बंडें वगैरे करून यानें रायगड व दुसरीं कांहीं संस्थानें देऊन यारमहंदास गादीवर बसविलें. यारमहंमद हा बापासारखा हुशार, दक्ष व शूर नव्हता. त्याचा मुलगा फैजमहंमद हाही आपल्या आजासारखा गुणी नव्हता. तरी पण या दोघांमध्यें एक मोठा चांगला गुण होता; तो हा कीं, ते स्वतः जरी मूर्ख होते तरी शहाण्याचें ऐकत असत. त्या दोघांचेही प्रधान हिंदु होते. ते मोठे प्रामाणिक व बुद्धिमान् होते. फैजमहंमद हा धार्मिक होता. तो जरी धर्मवेडा होता, तरी त्यानें कोणवर

धर्मसंबंधानें जुलूम केला नाहीं. हा ' **अवलिया** ' असे. याचा **विजयराय** नामक एक हुशार दिवाण होता; त्यानें फार चांगल्या प्रकारें राज्यकारभार केला. **फैजमहंमद** हा ३८ वर्षें राज्य करून मरण पावला. त्याच्या मागून **महंमद** यानें राज्य केलें. पण तो फारच थोडे दिवस राहिला. त्याच्यामागून त्याचा तिसरा भाऊ **हिय्यतमहंमद** हा थोडासा शहाणा व चतुर होता तो गादीवर बसला. त्यानें. २९ वर्षे राज्य केलें; त्यांत पुष्कळ विशेष गोष्टी घडल्या. स० १८०३ मध्यें **हिय्यतमहंमद** याच्या **फैदालखान** नामक कारभाऱ्यानें इंग्रजसरकारच्या **गोदर्द** नामक सेनापतीस चांगली मदत केली;या उपकाराची इंग्रजसरकारास कधींही विस्मृति होणार नाहीं.

पुढें जेव्हां **मध्यहिंदुस्थानांतून** सैन्य चाललें, तेव्हां त्यास शेंकडों अडथळे व अडचणी आल्या. वाटेंत राजपुतान्यांतील जीं संस्थानें होतीं, तीं मुळींच मराठ्यांच्या अंकित नव्हतीं. त्या सर्वांनीं मदत देण्याचें नाकारलें. त्यावेळीं केवळ एकट्या **भोपाळच्या** संस्थानिकानें मात्र मदत दिली. इंग्लिश लोकांचा **कमान जोमेद** यास सैन्य पुढें नेण्यास जेव्हां अनिवार अडचणी येऊं लागल्या; तेव्हां ' **भोपाळानें** ' इंग्लिश लोकांस संकट समयीं पुष्कळ मदत केली. **भोपाळच्या** संस्थानिकानें केवळ **इंग्रजी** सैन्याला आपल्या मुलखांतून जाऊं दिलें एवढेंच नव्हे, तर त्यांना त्यावेळीं ज्या ज्या साधनांची जरूर लागली त्या सर्व साधनांची त्यानें त्याला पूर्ण मदत दिली. **भोपाळ व इंग्रजसरकार** यांच्यामध्यें याच वेळेपासून दोस्तीस आरंभ झाला व ती दोस्ती अजून पर्यंत दोघांकडून तशीच

चालली आहे व त्यापासून दोघांचेंही पुष्कळ प्रकारचें चांगलें हित होत आहे.

**वजीरमहंमदाच्या** उदयाची वेळ येऊन पोंचल्यामुळें त्याला पुढें **दिवाणाचें** काम मिळालें. तो आला तेव्हां राज्यांत जिकडे तिकडे अव्यवस्था, सर्व **खजीना** रिकामा, **लोक** दरिद्री आणि **सैन्यांत बंडाळी** होऊन गेली होती. त्याला **दिवाणाची** जागा मिळतांच त्यानें सर्व अव्यवस्था मोडून टाकिली आणि सैन्य तयार केलें. **भोपाळच्या सेनानायकांशीं विजयश्रीनें आपलें पाणिग्रहण** केलें. असेंच कांहीं दिवस चाललें असतें तर राज्य उत्तमावस्थेंत जाऊन पोंचलें असतें. परंतु पुनः मत्सरी लोकांनीं त्याचा पाडाव केला. त्याला मदत करण्यासाठीं **घोस महंमद** यानें **पेंढारी** व **मराठे** यांस बोलावलें.

याच सुमारास त्याचा बाप **नबाब हैयत महंमद** मेला आणि **पुढें घोस** हा गादीवर बसला. त्यानें आपल्या जाति बंधूंवर विश्वास न ठेवितां **मराठे** लोकांस आपलें पालन करणें सांगितलें. **वजीरमहंमद** आपलें काम सोडून निघून गेला होता; तो योग्य प्रसंगाची वाट पाहत बसला होता. तो माघारा आला आणि त्यानें **मराठे** लोकांस हांकून लाविलें. त्या दिवसा पासून **घोस महंमद** हा नांवाचा मात्र **नबाब** होता. परंतु खरी सत्ता **वजीरमहंमद** याचे हातांत होता.

या पुढें ९ वर्षें वजीरमहंमद आपल्या राज्याचें रक्षणार्थ लढायां मध्यें गुंतला होता. स० १८०९ त ब्रिटिश लोक **पेंढाऱ्यांचा** पाठलाग करीत होते. त्या समयीं त्यांस **पेंढाऱ्यांशीं** कांहीं कारणामुळें ऐक्य करणें

भाग पडलें. त्यानें **इंग्रजसरकारास पेंढाऱ्यांशीं** ऐक्य करणें अवश्य कां पडलें इत्यादि सर्व यथास्थित समजावून सांगितलें आणि आतां माझी तुमच्याशीं स्नेह भावानें वागण्याची इच्छा आहे, असा हेतु प्रदर्शित केला.

**ब्रिटिश सरकारानें** या वेळीं कांहींच नक्की सांगितलें नाहीं. परंतु **भोपाळच्या दिवाणाचे** मनांत तें पक्कें बिंबलें होतें. पुढें लगेच चार वर्षांनीं **शिंदे** व **भोंसले** यांनीं **भोपाळ राजधानीवर** स्वारी केली. ९ महिने पर्यंत त्यानें मोठ्या धैर्यानें आणि अद्वितीय शौर्यानें त्यांच्याशीं सामना करून त्यांची अगदीं दाणादाण करून मोडिली व त्यांस त्यानें मागें हटविलें. या लढायांत त्याचें सैन्य **शत्रूच्या सैन्याच्या** संख्येशीं तुलना करून पाहतां फारच थोडें होतें. पुढल्यावर्षी पुनः वेढा घालण्याची **शिंद्यानें** धमकावणी दाखविली. परंतु **इंग्रजसरकारच्या** मध्यस्थीनें तें बंद पडलें. यावेळेस **इंग्रजसरकारच्या** मनांत नुकते **भोपाळच्या स्नेहाचे** फायदे येत चालले होते. या पुढें १८ महिन्यांनीं स० १८१६ त **वजीरमहंमद** मेला. त्या वेळीं त्याचें वय ६१ वर्षांचें होतें. त्याची हा अद्वितीय योद्धा, मोठा चतुर, युक्तिवान, राजकार्यधुरंधर, नीतिवान्, विचक्षण, अप्रतिम धैर्यशाली आहे, अशी सर्व लोकांत कीर्ति होती. त्याच वेळीं हें **संस्थान** वैभवाचे शिखरास पोंचलें होतें.

त्या मागून त्याचा मुलगा **वजीरमहंमद** यास **प्रधानकीची** जागा मिळाली. हा मोठा योग्य पुरुष होता. याची **नात** हल्लीं **भोपाळच्या** गादीवर आहे. **वजीरमहंमद** यानें जरी साधारण ४ वर्षें **प्रधानकीचें** काम केलें तरी तितक्या अवकाशांत त्यानें जी राज्य व्यवस्था केली

ती मुळें त्याच्या सर्व राज्यांतील लोकांस चिरकालीनफायदा झाला. **वजीरमहंमद प्रधान** झाल्यावर स० १८१७ त त्यानें **इंग्रजसरकाराशीं** एक ठराव केला, त्या ठरावान्वयें **भोपाळच्या राजानें इंग्रजसरकारास** आपल्या **सैन्याची** मदत करावी; शिवाय **पेंढारी** लोकांचा नाश करण्यासाठीं **इंग्रजास** सहाय्य व्हावें; इतकें मान्य असल्यास **इंग्रज** सरकारानें **भोपाळचें** संरक्षण करण्याचें कबूल केलें. **भोपाळसरकारानें इंग्रजास** ६००० घोडे स्वार आणि ४००० पायदळ, इतक्या सैन्याची मदत दिली; त्या बद्दल त्यांना माळव्यांतील ५ मुलूख दिले.

**वजीरमहंमद दिवाण** असतां राज्याच्या वसुलाची तूट त्यानें भरून आणली आणि लढायांत **भोपाळचे** जे प्रांत गेले होते ते आपणाकडे वंशपरंपरा चालावे असा ठराव केला. **भोपाळ संस्थानावर** नुकताच **सौख्यसूर्य प्रकाशमान** होत आहे, तोंच **फौजदारखान** ह्मणून **वजिरखानाचा** ८ वर्षांचा मेहुणा होता त्याच्या पिस्तुलाच्या बारानें अवचित **भोपाळच्या** लोकप्रिय व परम राज कार्य धुरंधर अशा मोहोऱ्यास यमसदनीं पाठविलें. **वजीरमहंमद** यास एक बायको होती तिचें नांव "**कुडशियाबेगम.**" **घोस** ही महंमद याची मुलगी; हिची इतिहासांत मोठी कीर्ति आहे.

**वजीरमहंमद** मेल्यानंतर **भोपाळचे** सरदार व मानकरी लोक यांनीं **इंग्रजसरकारचे** संमतानें असें ठरविलें कीं, **वजीरमहंमदाचा** पुतण्या **मुनीर महंमदखान** यानें **शिकंदरबेगमेशीं** लग्न करून **वजीरमहंमदाचे** गादीवर बसावें आणि तें लग्न होई तोंपर्यंत **वजीरमहं**-

**मदाची बायको** **कुडशियाबेगम** हिला प्रतिनिधित्व देऊन राज्यकारभार चालवावा.

'**कुडशियाबेगम**' हिचें वय त्या वेळीं १७ वर्षांचें होतें. तिला राज्याचें प्रतिनिधित्व दिलें. तिनें आपल्या **नवऱ्या**-च्या वेळेचें जें प्रधानमंडळ होतें तें तसेंच कायम ठेविलें आणि त्यांच्या संमतानें राज्यकारभार चालविला. कांहीं दिवस अशा रितीनें राज्यकारभार चालत असतां **कुड-शियाबेगम** हिला राज सत्तेचा लोभ अधिकाधिकच वाढत चालला. तिच्या मुलीचें लग्न **मुनीरमहंमदाशीं** ठरलें होतें. **कुडशियाबेगमच्या** राज्य कारभारास ६ वर्षें लोटल्यावर **मुनीरमहंदानें** **शिकंदरबेगमेशीं** लग्न करण्याविषयीं मागणी घातली. हें **कुडशियाबेगम** हीस प्रतिकूळ असल्याकारणानें तिनें विवाह वचन मोडून प्रतिषेध केला. या वचन भंगाबद्दल **मुनीर-महंमदखान** यानें पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु **कुड-शियाबेगमनें** आपला हात साधून घेतला. तिचें व दरबारचे सर्व सरदार व मानकरी यांचें ऐक्य असल्या कारणानें सर्वांनीं मिळून ठराव केलाकीं, **कुडशिया-बेगमनें** या पुढें बरेच दिवस अप्रातिहत राज्य कार-भार करावा. **मुनीरमहंमदाशीं** **शिकंदरबेगमचें** जें विवाह वचन स० १८२१ त झालें आहे ते मोडावें. या बद्दल **मुनीरमहंमद** यास ४०००० रुपयांची जाहगीर करून द्यावी आणि त्यानें आपले सर्व हक्क **जाहांगिरमहंमदखान** याचे नांवें करून द्यावें.

**जाहांगीरचें** वय त्यावेळीं अगदीं लहान होतें. **कुडशियाबेगम** हिच्या मनांत राजसत्ता आपले हातांत असावी असें असल्या वरून तिनें लग्न पुन

लांवणीवर टाकलें. तरी आतां लांबणीवर टाकणें अगदीं अयोग्य असल्या कारणानें स० १८३५ च्या एप्रिल महिन्याच्या १८ व्यां तारखेस **शिकंदरबेगम** आणि **जाहांगीर** यांचा विवाहसंबंध त्यांच्या वैभवानुरूप झाला. परंतु विवाह संबंधानें उलटा गृहकलह मात्र ज्यास्त वाढला. राजसत्तेसाठीं भांडणाऱ्या आतां ३ व्यक्ती झाल्या. एक **कुडशियाबेगम**; दुसरी चि- **मुकली शिकंदरबेगम** आणि तिसरा तिचा नवरा **जाहांगीरमहंमदखान. जाहांगीर** यानें हळूहळू काम चालविलें असतें तर त्याचा हेतु साधला असता. परंतु त्यानें उतावळेपणा करून **कुडशियाबेगम** हिला धरून कैदेंत घालण्याचा बेत केला. त्यानें याबद्दल कारस्थान चांगलें केलें होतें. परंतु योग्य वेळ आली, त्यावेळेस साहसाविषयीं त्याची अन्तःकरणवृत्ति डळमळूं लागली. **बेगम** त्याच्या अगदीं हातांत आली असतां त्यानें तिला सोडून दिलें.

त्याचें प्रायश्चित त्यालाच भोगावें लागलें. पुनः गृह- कलहास आरंभ झाला; त्या युद्धांत **जहांगिराचा** पराभव झाला. त्याला **अष्टा किल्यांत** कैद करून ठेविलें. याजबद्दलचा वेढा एक सारखा २ महिने पडला होता. २ महीन्यां नंतर उभय पक्षांनीं **इंग्रज- सरकारास** मध्यस्थ करावें असें कबूल केलें. शेवटीं असें ठरलें कीं, **बेगमला** ६००० रुपयांची जहागीर तहा हयात करून द्यावी आणि मग राज्य कारभार **जाहांगीर** यानें हातांत घ्यावा. या ठरावान्वयें स० १८३७ च्या नोवेंबरच्या २९ व्या तारखेस **कुडशि- याबेगमच्या** संमतीनें **जहांगिरास** राज्याभिषेक झाला.

या नंतर **कुडशियाबेगमचें नांव** इतिहासांत मुळीच आढळत नाहीं.

**नवाबच्या** सुदैवानें त्याला जी **शिकंदरबेगम बायको** मिळाली, ती मोठी पाणीदार, राज्यकारस्थानी, महत्वाकांक्षी आणि दृढ निश्चयाची होती.

**शिकंदरबेगम** ही मोठी शहाणी व धूर्त असल्या कारणानें तिनें आपल्या नवऱ्याचा पींच पूर्णपणें ओळखून ठेविला होता. तिनें उतावळी न करितां आपल्या नवऱ्यास आपल्या आई जवळ राहूं दिलें. त्यांत तिच्या अनुमाना प्रमाणें थोडक्याच दिवसांत घडून आलें. **जाहांगीर** मोठा विषयासक्त असल्या कारणानें तो दुर्व्यसनी आणि अशक्त होऊन ६ महिन्यांनीं मरण पावला. तो मेल्यावर राज्यावर '**शिकंदरबेगमला**' एकटे किंवा तिची आई '**कुडशियाबेगम**' इच्या सह गादीवर बसवून राज्य कारभार चालवावा अशा विषयीं पुष्कळांनीं खटपट चालविली. परंतु त्यांत यश आलें नाहीं. कारण '**शिकंदरबेगमच्या**' मनांत हें सिद्धिस जाऊं नये असें होतें. शेवटीं स० १८४७च्या फेब्रुवारी महिन्यांत **शिकंदरबेगमच्या** मुलीचें **प्रतिनिधित्व शिकंदरबेगमला दिलें.**

**शिकंदरबेगमच्या** बुद्धिवैभवाचा पूर्ण विकास होण्यास आतां सर्व सामग्री मिळाली. हिच्या बुद्धिवैभवाचीं जीं जीं फळें लोकांनां अपेक्षित होतीं, तीं सर्व त्यांनां पुर्णपणें प्राप्त झालीं. ६ वर्षांत तिनें राज्याचें सर्व कर्ज फेडून टाकलें. तिनें सर्व मक्ते वगैरे काढून टाकून खेड्यांतील मुख्यांशीं आपला साक्षात् संबंध ठेविला. तिनें व्यापाराचे वगैरे मक्ते बंद केले. तिनें नाटकं-

शाळेची व्यवस्था आपले नजरे खालीं आणली आणि **पोलिसाची** बंडाळी मोडून नीट व्यवस्था केली व अशाच प्रकारें निरनिराळ्या पुष्कळ सुधारणा केल्या. एकंदर तिच्या राज्यव्यवस्थेंत तिनें आपलें अद्वितीय चातुर्य, दक्षता आणि राजकार्य धुरंधरता प्रकट केली.

तिला **प्रतिनिधीचा** अधिकार देते वेळेसच तिच्या **मुलास** १८ वें वर्ष लागे तों पर्यंत मात्र तो अधिकार **शिकंदरबेगमकडे** असावा असा ठराव होता. परंतु तिच्या **मुलीचें सेनानायक** जो **बुक्षिबाकर महंमदखान** याशीं लग्न झाल्यावर पुढें ३ वर्षे आणखीं मुदत जास्ती वाढविली. एवढ्यानें **बेगमचा** राजसत्तेचा लोभ सुटेना. तिच्या मनांत आपण अप्रतिहत अधिकारानें राज्यकारभार चालवावा. असो; जरी **इंग्रजसरकारानें** तिची मुलगी **शहाजानबेगम** हीस राज्याचे वारस कबुल केलें, तरी पुष्कळ निरनिराळ्या कारणांचे संबंधानें राज्यकारभार **शिकंदर बेगम** हिच्या हातांत ठेवावा लागला. तिच्या मुलीनें आई जीवंत असे तोंपर्यंत आपला राज्याधिकार तिच्या स्वाधीन केला. तिनें ही राज्य नौका स० १८५७ पर्यंत चालविली, तों त्या सालीं **बंडरूप** तुफान झालें. तिनें प्रसंगानुरूप आपला विश्वास, स्नेह व सत्य यांचें उत्तम रितीनें पालन केलें. तिनें त्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या पूर्वींच **ब्रिटिशएजंटाला इंग्रज** लोकांचा सत्यानास करण्याविषयीं जे जाहिरनामे लागले होते, त्या सर्वांची बातमी कळविली. तिनें जून महिन्यांत **भोपाळांतून** एका नेटिवास हांकून दिलें; हा गृहस्थ पुष्कळ घोडेस्वार जमाकरीत होता.

ते कशासाठीं वगैरे **बेगमनें** त्यास विचारिलें; परंतु त्यानें मुळींच उत्तर दिलें नाहीं.

**होळकराच्या** बंडांत सामिल झालेल्या फौजेंतून बचावून आलेले जे **ब्रिटिश कामगार** त्यांस तिनें आश्रयदिला; त्याबद्दल तिजवर पुष्कळ संकटें आलीं. **भोपाळच्या ब्रिटिशकामकागारांच्या** हाताखालची तैनाती फौज जेव्हां **बंडास** सामील झाली; त्याच प्रमाणें तिची धर्म भोळी आई आणि त्याच प्रमाणें मुसलमान धर्माभिमानी तिचे चुलते यांनीं **काफर** लोकांस **हिंदुस्थानांतून** हाकून द्यावें अशा विषयीं रात्रं दिवस तिच्या कानाशीं टाहो फोडला असतां **इंग्रजसरकारच्या** स्नेहा विषयीं तिचा जो निश्चय झाला, तो किंचितहि डगमगला नाहीं. तिनें शेवट पर्यंत **ब्रिटिश सरकारास** आश्रय दिला आणि **ब्रिटिश कामगारांस** सुखरूप **होशिंगाबादेस** पोंचविलें आणि मोठ्या गंभीरपणानें आपल्या राजधानींतील बंडाची विझवा विझव केली व मोठ्या शौर्यानें बंडखोर लोकांचा पराभव करून आपले राज्यांत जिकडे तिकडे स्वस्थता केली.

पुढें जेव्हां "**आंग्लवैभवचंद्र**" प्रकाश पावूं लागला तेव्हां तिनें जवळची सामग्री, शिपाई, इत्यादि जें जें होतें तें सर्व **इंग्रजांस** मदतीसाठीं दिलें. या तिच्या कामगिरी बद्दल **शिकंदरबेगमेस ब्रिटिशसरकारानें बेसिया** प्रांत **धारे**कडून काढून घेऊन **शिकंदरबेगमेस** बक्षीस दिला. तिच्या हातीं **भोपळच्या** राजसत्तेचा पूर्ण अधिकार दिला आणि मुसलमानी नियमा प्रमाणें तिला वंशपरंपरेनें **भोपाळचें** राज्य दिलें. तिला ४ तोफा

बक्षीस दिल्या. आणि स० १८६२ च्या सप्तेंबरच्या १ तारखेस भोपाळच्या बेगमेस व्हाइसरायांनीं "मोस्ट एक्स्लेन्ट स्टार आफ इंडिया" हा किताब दिला, ती मोठी उदार होती. तिनें आपल्या प्रजेपैकीं जे उपयोगीं पडले त्यांस चांगलीं इनामें दिलीं.

पुढें दोन महिन्यांनीं आपले मुलीकडे सर्व राज्य कारभार सोंपवून ती मक्केची यात्रा करण्याकरितां आपल्या लवाजम्यासह भोपाळाहून निघाली. हिच्या चरित्राच्या अखेरीस विशेष सांगण्या सारखी गोष्ट झटली ह्मणज ही एक मुशाफरी होय. मक्केच्या यात्रेस जावें, असा तिचा संकल्प कांहीं दिवसांपूर्वीं झाला होता, परंतु तो तडीस जाईलसें दिसत नव्हतें. तथापि स्वधर्माचें मुख्य-स्थान पाहण्याची जी तिला इच्छा होती, ती तिनें तृप्त करून घेतली. मनुष्यास ज्ञान संपादण्याचीं जीं अनेक साधनें आहेत, त्यांत देशाटन हें उत्कृष्ट साधन होय. राजे लोकांस मुशाफरी पासून अनेक फायदे होतात. निरनिराळ्या देशांतील राज्यव्यवस्था व लोकांची अंतर्गतस्थिति याचें ज्ञान राजास अवश्य असलें पाहिजे. धर्म बुद्धीनें जरी देशपर्यटन केलें; तरी जे फायदे व्हावयाचे असतात ते होतातच. विद्येनें मनुष्य जसा शहाणा होतो तसा मुशाफरीनेंहि होतो. कोणी एक कवि ह्मणतो कीं "जो मनुष्य देशपर्यटन करीत नाहीं व पंडित जनांशीं सहवास ठेवित नाहीं, त्याची बुद्धि पाण्यामध्यें जसा तुपाचा थेंब त्या प्रमाणें संकुचित होते." परंतु जो अनेक देशांत प्रवास करितो आणि विद्वज्जनांच्या समागमें राहतो; त्याची बुद्धि

पाण्यांतील तैलबिंदु प्रमाणें विस्तार पावते; हें कवीचें ह्मणणें शद्बशः खरें आहे.

देशाटना पासून अनेक फायदे आहेत असें समजून व यात्रेची यात्राहि होईल असें जाणुन **शिकंदरबेगम** हिनें **मक्केस** जाण्याचें प्रस्थान ठेविलें. तेव्हां तिच्या मागें तिच्या **मुलीचें** रक्षण **इंग्रजसरकारानें** केलें. तिच्या मनांतून मुशाफरी करीत करीत **मादिना** येथेंही जावयाचें होतें. व तेथून **विलायत** पाहण्यास जाण्याचा विचार होता; परंतु मध्यंतरीं रस्त्यानें लुटारू लोकांपासून अतिशयित उपद्रव झाल्यामुळें पुढें जाण्याचा बेत रहित करून ती आठव्या महिन्यांत परत आली. स० १८६४ त जून महिन्यांत ती आपल्या परिवारासह **मुंबईस** येऊन दाखल झाली व तेथें चार पांच महिनें राहून नंतर **भोपाळास** परत गेली.

परत आल्यावर कांहीं दिवस पर्यंत राज्यकारभाराकडे हिनें तादृश लक्ष्य दिलें नाहीं; परंतु पुनः पूर्ववत् दक्षतेनें राज्यकारभार पाहूं लागली. शहरामध्यें पाण्याची गैरसोय होती ती दूर करावी ह्मणून तिनें एक मोठा तलाव बांधला. हिला विद्येची अभिरुचि होती. प्रजेला विद्यादान देणें हें राजाचें कर्तव्य कर्म आहे असें ती समजत असे. **मुलींच्या** विद्याभ्यासा करितां हिनें कांहीं शाळा स्थापित केल्या. स० १८६६ त वाटसरू लोकांच्या सोयी करितां नाक्याच्या ठिकाणीं धर्मशाळा बांधिल्या. पांथस्थांस कोणत्याही प्रकारें इजा होऊं नये असा बंदोबस्त केला. देशाटन सुखावह व्हावें ह्मणून राजधानी पासून इसलामनगर रेसिन पर्यंत सडका केल्या; त्यामुळें प्रवासास आतां वि-

शेष अडचण राहिली नाहीं. आपल्या राजधानीची हिनें चांगली सुधारणा केली.

उपजला प्राणी मरावयाचा हा सार्वत्रिक नियम आहे तो कधीं टळावयाचा नाहीं, व टळल्याचें अद्याप एकाहि उदाहरण दृष्टीस पडत नाहीं. वृद्धि आणि क्षय यांची सांगड बनून राहिली आहे. राज्यांतील प्रत्येक खात्याचा नीट बंदोस्त करून सन १८६८ त आक्टोबर महिन्याचे तिसावे तारखेस **शिकंदर बेगम** ही शरीरीं कांहीं विकृति होऊन मरण पावली. हिच्या मरणाची वार्ता ऐकून **इंग्रज सरकारास** फार वाईट वाटलें.

**इंग्रजांच्या** सत्तेचा नाश करूं पाहणारे असे जे **पेंढारी** व **बंडवाले** त्यांचा नाश करण्यास **भोपाळचें** किती सहाय होतें हें दिसतच आहे. **तर इंग्रजसरकारानें** तें स्मरून जेणें करून **नेटिवसंस्थानें** दिवसें दिवस सुधारून स्वतंत्र होतील, तसें न्यायाचें योग्य आचरण करून उभयतांचा फायदा करून घ्यावा असें आमचे मत आहे. जरी या **संस्थानां**कडून अगर प्रजे कडून आन्याय झाला तरी वेळोवेळीं समजूत करून न्याय द्यावा ह्मणजे बरें पडेल.

इकडे चोऱ्या करणारे, साहसी व आनीतिमान लोक फार आहेत. या प्रांतीं हत्यारें बाळगण्याची सर्वत्रांस परवानगी आहे, यामुळें कदाचित् इकडचे लोक प्राणावरही उदार होतात. अफूची निशा करून राहणारे लोकांची वस्ती इकडे फार आहे.

या **संस्थानावर** देखरेख करण्याकरितां **गव्हरनर जनरल** यांचे कडून एक रेसिडेन्ट असतो. राज्

कारभार पाहण्याकरितां हल्लीं बेगमसाहेबांनीं दिवाणा दाखल एक युरोपियन इंग्रजसरकारचे मार्फत मागून घेतला आहे. यांस दत्तकाचा वगैरे सर्व अधिकार असून चांगल्यारितीचा बहुमानही मिळतो.

भाग पहिला प्रकरण अठरावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण एकोणिसावें.

## धार.

याचें क्षेत्रफळ २६९१ चौरसमैल आहे. लोकसंख्या १०४८६० आणि उत्पन्न ४,८१००० आहे. या संस्थानास होळकराच्या व शिंद्याच्या मुलखाचा वेढा आहे. हें संस्थान महूच्या पश्चिमेस ३३ मैलांवर आहे.

धारच्या पांवाराच्या घराण्याची उत्पत्ति रजपुतापासून आहे. हें रजपुताचें घराणें प्राचीनकाळीं माळव्यांत होतें. पवार घराण्यांतील प्रथम प्रसिद्धीस आलेला जो शिवाजी पवार, तो पुण्यापासून ३० मैलांवर मुलतान ह्मणून एक खेडें आहे तेथील पाटील होय. या मुलतानच्या खेड्यांत अजूनपर्यंत त्या घराण्यांतील पुरुष वंशपरंपरा पाटील आहेत. शिवाजी पवार याला एक मुलगा होता. त्याचें नांव कृष्णाजी, तो आणि त्याचे मुलगे बाबाजी, रमाजी, आणि केरूजी, हे कृषिकर्म करीत असून शिलेदारीच्या कामावर होते. बाबाजी यास संभाजी आणि काळोजी

असे मुलगे होते ते प्रसिद्ध शिवाजीच्या पदरीं लष्करांत मोठमोठ्या सेनेच्या कामावर होते.

शाहूराजाचे कारकीर्दीत मराठ्यांच्या सैन्यांत संभाजीचे ३ मुलगे—उदाजी, आनंदराव आणि जगदेव हे उत्तम प्रकारें लढले; याप्रमाणें यांनीं छत्रपतीची सेवा केली आणि शिंदे, होळकर हे पेशव्याचे चाकर होत. ह्मणून शिंदे, होळकरांपेक्षां पवार यांचें घराणें श्रेष्ठ आहे. या तिघांपैकीं उदाजीपवार हा प्रसिद्धीस आला; त्याचे हातांत मोठ्या सेनेचा अधिकार होता. एवढेंच नव्हे, परंतु शाहूमहाराज आणि त्याचा प्रधान बाजीराव या उभयतांची त्याच्यावर मोठी मर्जी होती.

उदाजीपवार याजवर सत्ताधीश पेशव्याची मर्जी कांहीं कारणानें खप्पा झाल्यामुळें त्यास कारागृहवासाचें अवलंबन करावें लागलें, यामुळें त्याचें नांव पुढें इतिहासांत नाहीं. त्याचे वंशज अजून सुलतानचें पाटलाचें काम करतात. उदाजी कैदेंत पडल्यावर त्याचा भाऊ आनंदराव, याजकडे या घराण्याचें अग्रेसरत्व आलें.

स० १७३४ त याला माळवा आणि गुजराथ येथील मराठे लोकांच्या वट्ट्याचें उत्पन्न जमा करण्यासाठीं नेमलें होतें. पुढें थोड्याच दिवसांनीं ते धारेस राहिले. हा मुलूख आणि याच्या आसपासचे प्रांत व जवळच्या रजपुत संस्थानिकांच्या खंडण्यावर त्याला आणि त्याच्या सेनेला निर्वाह करण्यास सांगितलें होतें. या रितीनें त्यानें धारच्या संस्थानाची स्थापना केली.

11

स० १७४९ त **आनंदराव पवार** मेला. तेव्हां त्याचे मागून त्याचा मुलगा **यशवंतराव** हा गादीवर बसला. यासच प्रथम **धारचा राजा** असा कितात्र मिळाला. हा मोठा उदार व शूर होता. त्याच्या ह्या गुणद्दया-बद्दल **माळवा**प्रांतांत त्याचें नांव सर्वतो मुखीं आहे. स० १७६१ त यानें इतर **मराठे** लोकांप्रमाणेंच **पानिपतच्या रणयज्ञांत** आपल्या अमूल्य प्राणांची आहुति दिली. त्याच्या मागून त्याचा मुलगा **खंडेराव पवार** हा गादीवर बसला तो लहान असल्याकारणानें त्याच्या घराण्याचें फार नुकसान झालें.

**शिंदे** व **होळकर** हे जरी या लहानशा राजास आपल्यापेक्षां मानानें श्रेष्ठ असे कबूल करीत, तरी त्यांनीं त्याच्या राज्याचे लचके तोडून तोंडांत टाकण्यास अगदीं कमी केलें नाहीं. स० १७७४त जेव्हां **रघुनाथराव पेशवे** यांच्या वंशस्थावर जेव्हां मोठा कहर येऊन गुदरला, तेव्हां त्यांनीं आपलीं बायकामा-णसें रक्षणार्थ **धार** येथें पाठवून दिलीं होतीं. त्यामुळें तर धारच्या संकट नदीस मोठाच पूर आला. **रघुनाथ-रावाची बायको आनंदीबाई** येथें असतां तीस **बाजी-राव पेशवे** हा पुत्र झाला. त्यामुळें **रघुनाथरावाच्या** उलट पक्षाकडील मंडळीची त्या मुलास धरण्यासाठीं **धारे**वर एकदम धाड पडली. यावेळीं **खंडेराव** मोठा झाला होता. त्यानें आपला राज्यकारभार आपले हातांत नुकताच घेतला होता. तो यावेळेस **रघुनाथ-रावाचे** पक्षास मिळाला; त्यामुळें **रघुनाथरावाच्या** वि-रुद्ध पक्षाच्या मंडळीला **धारचें संस्थान** केव्हां बळका-वून टाकू असें झालें होतें. त्यांनीं एकदम हल्ला करून

शहर वगैरे आपल्या ताब्यांत घेतलें आणि **आनंदीबाई** व तिचा **मुलगा** यांस या राजपक्षाकडील मंडळींनीं त्यांचे स्वाधिन करतांच ते त्यांस कैद करून **पुण्यास घेऊन** गेले आणि त्यांनीं मग **धारचें संस्थान** पुनः त्याचे राजाचे ताब्यांत दिलें.

**खंडेराव** हा स० १७८० त मरण पावला; त्यावेळीं त्याचें वय २१ वर्षांचें होतें. त्यावेळेस त्याची **बायको गर्भिणी** होती, ती **गोविंदराव गायकवाडांची** मुलगी होय. पुढें ६ महिन्यानतंर ती **वडोद्यास** बाळंतीण झाली, तीला एक मुलगा झाला त्याचें नांव **आनंदराव** असें ठेविलें.

स० १७९७ पर्यंत **आनंदराव पवार वडोद्यास** आपले आजोळीं होता. स० १७९७ त त्यांचें वय १७ वर्षांचें होतें. **आनंदराव** गादीवर बसल्यावर **रंगराव** यांनें त्यांचे राजसत्तेंत बराच प्रतिबंध केला. हे **रंगराव आनंदराव** लहान असतां राज्यकारभार पाहत होते. **रंगरावानें** आपल्या हातीं राजसत्ता ठेवण्याविषयीं बरीच खटपट केली; परंतु त्याचें कांहींएक न चालून त्यांस **होळकराकडे** पळावें लागलें. **होळकरानें आनंदराव पवाराशीं** त्याचा प्रधान **रंगराव** याच्याबद्दल कांहीं बोलणें लावण्याच्या मिषानें येऊन त्याचा सर्व मुलूख लुटून उद्वस्त केला. **रंगरावानें होळकराचें** आपणावर पुरें लक्ष नाहीं असें पाहून तो **दौलतराव शिंद्याकडे** गेला आणि त्यास **धारवर** हल्ला करण्यास सांगितलें. **दौलतराव शिंदा** यानें **पेशव्यांच्या** हुकुमाच्या मिषानें ७ वर्षांत **धारेपैकीं अगर** आणि **सोमिल** हे मुलूख आपले राज्यास जोडिले.

त्याशिवाय द्वारावतींतील सर्व धारचेप्रांत आपल्या राज्यास जोडून धारचे राजापासून पुष्कळ पैसा काढिला. पुढें २ वर्षांनीं संभाजी ह्मणून एक शिंद्याचा सरदार होता त्यानें क्षय पंथास लागलेल्या धार संस्थानावर पुनः हल्ला करून वडनेरास लढाई मारली आणि शिंद्याच्या हुकूमावरून ७९०० रुपये काढण्यासाठीं धारचा सर्व मुलूख आपले ताब्यांत घेतला.

आनंदरावांचे मनांत आपलें संस्थान आपले ताब्यांत घ्यावें असें आल्यावरून त्यानें ते रुपये देण्याचें कबूल केलें. परंतु दुर्दैवानें मुलूख माघारा मिळण्याचे पुर्वींच तो मरून गेला. आनंदराव मेल्यामुळें पुनः पुष्कळच घोंटाळा झाला. त्या मंदीत शिंद्यानें येथील पुष्कळ पैसा व प्रांत बळकाविला होता. आनंदराव पवारास त्याच्या बहिणीनें विष प्रयोग केला असें ह्मणतात. ही बहीण मोठी दुराचारी होती. आनंदरावास ठार मारून सर्व राजसत्ता आपल्यास मिळेल असें तिला वाटल्यावरून तिनें हें अघोर कृत्य केलें.

आनंदराव मेल्यावर थोड्याच दिवसांनीं तिच्या दुष्ट कृतीचें प्राय श्चित इह लोकींच दाखविण्यासाठीं कांहीं मंडळींनें तिला यमसदनास पाठविलें आनंदराव मेल्यावर त्याची बायको भिमाबाई इच्या हातांत राजसत्ता गेली; त्यावेळीं ती गर्भिणी होती, परंतु तिचे शत्रु फार होते ह्मणून तिनें आपला बचाव होण्याकरितां ती महुस राहिली. हिच्या नवऱ्याचा मुरारराव ह्मणून कोणीएक नातेवाईक होता त्याणेंही बरीच धामधुम चालविली होती. परंतु त्यापासून यावें तसें यश त्यास आलें नाहीं.

**भिमाबाईस** मुलगा झाला. त्याचें नांव **रामचंद्र-राव** असें ठेवलें. पुढें ती लवकरच **धारेस** आली आणि आपल्या शाहाणपणानें आणि दृढ निश्चयानें तिनें **मुराररावाची** चांगली खोड मोडली. तिनें आपल्या रक्षणासाठीं **बडोद्याहून** स्वार आणविले आणि आपण राज्याची सुधारणा करण्याचे कामास लागली. यावेळेस राज्याची व्यवस्था मुळींच नव्हती.

**संस्थानाची** इतकी दुर्दशा होऊन गेली होती कीं व्यवस्था करणें मोठें दुष्कर झालें होतें. **मुराररावाकडे** थोडासा प्रांत होता; शिवाय नेहमीं इतर सर्व प्रांतांवर ही त्याचा डोळा होता. अशा वेळीं **संस्थानास** पैशाची भरती करण्यासाठीं जवळच्या **राजपुतान्यांत** हल्ला करून लुटण्यापेक्षां गत्यंतरच नव्हतें. अशाप्रकारें संस्थानाची कशी तरी निरवानिरव करण्याचे बेत चालले आहेत, तों **रामचंद्रराव** मेला. त्याच्या आईनें मनाचा दृढ निश्चय करून **शिंदे** आणि **होळकर** यांचे विचारानें आपल्या बहिणीचा एक मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव **रामचंद्रराव** पवार असें ठेविलें यापुढें ८ वर्षें पर्यंत **धार** संस्थानावर जवळच्या **संस्थानिकांच्या** एकसारख्या स्वाऱ्या चालल्याच होत्या. **मुरारराव** मरतो तों दुसरे शत्रु उद्भवले. तिच्या हांतून पेंढाऱ्यांचा बंदोबस्त होईना. एकंदरींत ज्यावेळेस स० १८१७ त **ब्रिटिशसरकार** पेंढाऱ्यांचा नाश करण्यासाठीं **माळव्यांत** शिरलें, तेव्हां **धारच्या राणी** जवळ तिच्या सर्व राज्यापैकीं केवळ **धार** शहर मात्र राहिलें होतें. त्यावेळीं राज्याचें उत्पन्न २०,००० किंवा ३०,००० रुपये इतकें होतें.

आतां या पुढें धार अगदीं निराळ्या स्थीतींत जाऊन पडलें. स० १८१९ च्या जानेवारीच्या १० तारखेस ब्रिटिशसरकारानें धार संस्थानास आपले आश्रया खालीं घेतलें; त्यावेळेस धारच्या राज्यांतील ज्या ज्या मुलखांचें अपहरण झालें होतें ते सर्व मुलूख धारच्या ताब्यांत दिले. क्षय पंथास लागलेल्या धार संस्थानचे रुग्णत्व जाऊन त्याचे शरीरास पुष्टता येईल अशा प्रकारची व्यवस्था व ठराव इंग्रजसरकाराशीं करण्यांत आले व पुढें २ वर्षांनीं बराच मुलूख धारेस जोडला. त्या योगें या संस्थानचें उत्पन्न बरेंच वाढलें. याशिवाय बैरशियाप्रांताबद्दल ब्रिटिशसरकाराकडून दर वर्षास १,१०,००० रुपये आणि स० १८२१ त दिलेली अलीमेहनतची खंडणी ही धारसरकारास मिळूं लागली.

स० १८१९ त धारसंस्थानचे डोंगरपुर व बासवाडा यांवर जे हक्क होते. ते त्यानीं ब्रिटिशसरकारास दिले. ब्रिटिशलोकांनीं धारच्या राज्यांत हात घातल्यापासून धारेची स्थीति सुधारण्यास आरंभ झाला. धारच्या संस्थानास त्याच्या सुदैवानें बापुजी रघुनाथ नामक मोठा चाणाक्ष दिवाण मिळाला. राजा लहान असतांना त्या दिवाणाचे कारकीर्दींत त्यांनीं परकीय उगीच अव्यवस्थित जें सैन्य होतें तें कमी करून त्याचे जागीं उत्तम ३०० स्वार व ८०० पायदळ इतकें सैन्य ठेविलें. याशिवाय लागेल तितके पोलीस लोकही ठेविले मागल्या ८ वर्षांत जो राज्याचा वसूल २०,००० रुपये होता तो एकदम स० १८२० त २,६७,००० रुपये झाला. राज्यांत शांतता झाल्या-

मुळें जमिनीची लागवड करण्यास लोकांस विश्वास उत्पन्न झाला.

**दौलतराव शिंदा** यांची पुतणी **अन्नपुर्णाबाई** यांचा विवाह संबंध **रामचंद्रराव** पवार यांच्याशी झाला. वराचें वय १२ व वधुचें वय ८ वर्षांचें होतें. लग्न समारंभ **ग्वालेरीस** मोठ्या थाटानें झाला. उभय पक्षीय सरदार, मानकरी, यांस परम आनंद झाला. **शिंद्यानें** दर **वर्षास** १ **लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख हुंड्या** बद्दल देण्याचें कबूल केलें होतें; परंतु तो न देता एक प्रांत मात्र दिला. तेव्हां **धारच्या** राजास या बद्दल फारच वाईट वाटलें. तो मुलूखही पुढें **शिंद्यानें** आपल्या कडे घेतला.

स० १८२६ त धारच्या राजानें **दौलतराव शिंद्याची** दुसरी भेट घेतली. त्यांतील हेतु **दौलतराव शिंदे** फार आजारी होते, तेव्हां त्यांजकडून कांहीं तरी मुलखाविषयीं लिहून घ्यावें असा होता. लग्न झाल्यादिवसापासून मुलगी **ग्वालेरीसच** होती; परंतु या त्याच्या भेटी पासून **रामचंद्ररावास** कांहीं एक फायदा झाला नाहीं; तो फक्त आपल्या बायकोस घेउन **धारेस** आला. **इंग्रज** सरकारानें **बैरासिया** प्रांता बद्दल **धार** संस्थानास उत्पन्नाचे सर्व पैसे न देतां खर्च जाऊन उरलेला पैसा देण्याचें कबूल केलें.

स० १८३२ त **उचेतराव** याने लोकांस असें सांगितलें कीं, **पानिपतच्या** लढाईत मेलेला **यशवंतराव पवार** याचा नातू **मुरारराव** याचा मी मुलगा आहें. असें लोकांस सांगून त्यानें आपल्या पक्षाकडे

पुष्कळ लोक जमा केले आणि धारेवर हल्ला केला; तेव्हां पुनःदेशांत बंड, लुटालूट व विध्वंस सुरू झाला.

या बंडास येवढें महत्व येण्याचें मुख्य कारण ह्मटले ह्मणजे मुराररावाचा भिल्ल लोकांशीं फार स्नेह संबंध असल्या कारणानें त्याच्या पक्षास भिल्ल लोक छाती पुढें करून मिळाले, या बंडा मुळें मोठमोठे अनर्थ झाले. भिल्ल लोक लुटालूट, ग्राम विध्वंस इत्यादि करूनच न थांबतां त्यांनीं ३,००० हजार गुरें धरून नेलीं. हें बंड मोडण्यासाठीं बापुजीरघुनाथ यानें ब्रिटिशसरकारास सांगितलें कीं; सर्व खेडीं गांवें ओसपडून गेलीं आहेत आणि आतां जर उपेक्षा केली तर खरोखर राज्याचा नाश होईल. ब्रिटिश लोकांनीं प्रथम सामोपचारानें उचेतरावास मांगून पाहिलें. परंतु तें सर्व व्यर्थ, असें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां त्यांनी मध्यें पडण्याचा यत्न केला. शेवटीं उचेतराव आणि त्याचे अनुयायी यांनीं इंग्रजसरकारचे ह्मणण्यास आह्मी मान्य आहों असें सांगितलें. उचेतराव यांस २०० रुपये माहिना देण्याचें कबूल केलें. भिल्ल लोकांशीं त्यानें संबंध ठेऊं नये व लुटलेलीं जनावरें व पैसे वगैरे सर्व परत द्यावें असा ठराव झाला.

भिल्ल लोकांनी ज्या ज्या गोष्टी मागितल्या त्या त्यांस दिल्या. स० १८३३ च्या अक्टोबरांत ११ दिवस दुखणें येउन राजा रघुनाथरावपवार मरण पावला. यावेळीं त्याचें वय २४ वर्षांच्या आंत होतें. त्याला फक्त एक मुलगी होती. हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें त्याच्या बायकोनें यशवंतराव पवाराच्या वंशांतील एक जवळचा मुलगा दत्तक घेतला. ब्रिटिशसरका-

रांतून संमती मिळाल्यावर मल्हारराव पवार यास स० १८३१ चे एप्रिलांत गादीवर बसविला. त्या वेळेस त्याचें वय ११ वर्षांचें होतें. गादीवर बसल्यावर त्याचें नांव यशवंतराव असें ठेवलें. हा राजा गादीवर बसल्यावर २ वर्षांनीं शिंद्यांनें हुंड्या बद्दल दिलेला प्रांत परत घेतला, तो शिंद्या कडे फार दिवस टिकला नाहीं. शिंद्याचे फौजेवरच्या अधिकाऱ्यांत भांडण सुरू झालें. ही संधी साधून धारचे अधिकाऱ्यांनी तो प्रांत आपणाकडे घेतला पुढें सर्व व्यवस्था सुरळीत चालावी ह्मणून धारचे दिवाणानें ब्रिटिशसरकाराकडे राज्य सोंपून देऊन फक्त खर्च जाऊन वसूल द्यावा अशी व्यवस्था केली. स० १८३६ त तो मोठा हुशार राज्य कार्यदक्ष प्रधान बापूजी रघुनाथ मेला; त्याचा तिसरा मुलगा अद्वीय गुणसंपन्न होता त्यास दिवाण नेमिलें. हा राजा मेल्यावर त्याचे मागून त्याचा भाऊ आनंदराव हा गादीवर बसला. पुढें धार संस्थानच्या लोकांनीं बंडास मदत केली. बंडाचा मोड झाल्यावर धार संस्थान खालसा केलें. परंतु राजा लहान असल्या कारणानें बंडाच्या मदती बद्दलचें प्रायःश्चीत त्यांस देणें हें ब्रिटिशसरकारास अयोग्यवाटून त्यांनीं तें राज्य कायम ठेविलें. तरी राजा वयांत येई तों पर्यंत तें त्यानीं आपल्या देखरेखीखालीं ठेविलें. धारच्या लोकांनीं केलेल्या अपराधाबद्दल फक्त धारच्या संस्थाना कडून बैसारा प्रांत घेऊन तो भोपाळच्या बेगमेस दिला.

स० १८६३ त आनंदरावपवार वयांत आले; परंतु पोलिटिकलएजंटानें राजा राज्य करण्यास अयोग्य आहे असे कळविल्या वरून त्या वेळीं यांस मुकत्यारी दिली

नाहीं. स० १८६४ त सर जानलारेन्स यानें राजाचे हातांत अधिकार देऊन पाहावा. असें मत दर्शविल्यावरून अक्टोबरच्या १ तारखेस राजास मुक्त्यारी दिली; त्या वेळेस कांहीं ठराव करण्यांत आले. ते असे:— आनंदरावपवारानें पुर्वीची राज्य व्यवस्था कायम ठेवण्याचें कबूल केलें. गव्हर्नर जनरलच्या एजंटाच्या मतानें नेमलेल्या दिवाणांचे हातून राज्यकारभार चालवावा असें ठरलें. एजंटाच्या मता वांचून जवळच्या संस्थानिकांच्या मुलखाची अदलाबदल करूंनये व धारचा किल्ला तसाच ठेवावा. त्याच प्रमाणें राज्यांत प्रजेची आबादानी करीन हेंही पवारांनीं कबूल केलें.

यांच्या हातांत राज्य कारभार आल्यावर पुढें पुर्वीच्या राज्य पद्धतींत पुष्कळच फेरफार झाले व हळुहळू राज्य पद्धत बिघडत चालली. रयतेचें म्हणणे एक व राजाचें म्हणणें एक, यामुळें राज्यांत दोन तट झाले. पुर्वीचे जुने नोकर कमी करून नवीन भरले, यामुळें रयतेचें म्हणणें वेळेवर राजास समजेनासें झालें. आनंदरावाविरुद्ध गावांत जाहिर नासे लागत व याचें मुख्य कारण एका नोकराच्या संबंधानें होय. सर्व रयतेचें आणि प्रजेचे म्हणणें असें होतें कीं, ज्यानोकराबद्दल सर्व लोकांस कंटाळा आहे तो नोकर कमी करावा.

या म्हणण्याकडे आनंदराव यांनीं लक्ष्य न देतां त्यास मोठ्या हुद्याची बढती दिल्या मुळें प्रजेचें व राजाचे असे दोन तट झालेले आहेत.

येथें परकीय मनुष्य आल्यास त्यास फार त्रास पडतो. वेळेवर राजाची भेट होत नाहीं. गावांत कोठें उतरण्यास जागाही मिळत नाहीं. यांचें लक्ष्य हिं-

दुस्थानच्या हितापेक्षां विलायती कामाकडे फार असतें, इकडील लोक मोठे निष्ठूर असून कावेबाज असे आहेत. हे लोक बोलतील एक व करतील एक.

राज्यांत ब्रिटिशसरकारच्या व्यवस्थे प्रमाणे सर्व कामकाज चालविण्याची पद्धत सुरु केली आहे, परंतु तिचा उपयोग व्हावा तसा अद्याप झालेला दिसत नाहीं. येथें एक वर्तमान पत्र आहे; परंतु तें कांहीं एक उपयोगाचें नाहीं. इकडील पत्रांचे फक्त त्यांत उतारे असतात. शाळा खात्याची व्यवस्था अद्याप सुधारली नाहीं. इंदुरा प्रमाणेंच अव्यवस्था आहे. यांस सर्व प्रकारचे अधिकार असून बहुमानही मिळतो.

भाग पहिला प्रकरण एकोणिसावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

## भाग पहिला प्रकरण विसावें.

## देवास.

यांचें क्षेत्रफळ २९६ चौरस मैल आहे. लोकसंख्या २५००० आणि उत्पन्न ४,२५००० रुपये आहे. हें संस्थान इंदुरा जवळ आहे.

धारची हकीगत सांगतानां आह्मीं असें सांगितलें आहे कीं संभाजी पाटील यास एक मुलगा होता त्याचें नांव **कृष्णाजी.** त्याला तीन मुलगे होते; त्यांची नावें:— **बाबाजी, रमाजी,** आणि **केरुजी,** हे **शाहूराजाच्या** मोठ्या प्रीतींतले सेनेचे अधिकारी होते. **केरुजी** यांनीं दुसरें **संस्थान** स्थापलें तें असें—**केरुजी** याला ४ मुलें होतीं; त्यांची नांवें **कृष्णाजी, तुकाजी, जिवाजी,**

आणि, **यिनाजी**. यापैकीं स० १७२५ व स० १७२६ त **तुकाजी** आणि **जिवाजी** हे **बाजीराव पेशव्या** बरोबर **माळव्यांत** आले होते; त्या वेळीं यांच्या इलाख्याचे विभाग केले. तेव्हां त्यांना **देवास, सारंगपूर, आलाट** व यांशिवाय दुसरे एकंदर २,४२००० उत्पन्नाचे प्रांत दिले, यांतून प्रत्येक वर्षी कित्येक गांव शिवाय संस्थानिकांस २६,००० रुपये द्यावे असें ठरलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं ७८९२५ रुपये खंडणीचे मुलूख त्यांचे स्वाधीन केलें. हे मुलूख पुढें फार दिवस त्यांचेकडे राहिले नाहींत.

**देवास** येथील दरबारची व्यवस्था कांहीं चमत्कारिक आहे. हें संस्थान प्रथम **तुकाजी** आणि **जिवाजी** यांना दिलें होतें. त्यांच्यांत बेबनाव झाल्यावर त्याचे विभाग झाले. पुढें त्याचे वंशजांस दोघांच्या सत्तेचें व अधिकाराचें ऐक्य असावें असें वाटलें. त्या वेळे पासून ऐक्य चाललें होतें. दोघां राजांचें मानपान सारखेच असतात. त्या दोघांचे मान इतके सारखे आहेत कीं; एक चुन्याचा तुकडा जर पाटलानें नजराणा पाठविला; तर त्याचे बरोबर दोन तुकडे करावे लागतात. जरी दोघां राजांचें सख्य होतें तरी चाकर माणसांत कधीं कधीं भांडणें लागत होतीं. दोघांचा एक प्रधान असावा अशी योजना करण्याचें ठरल्या वरून दोघांनीं मिळून एक चांगला हुशार वृद्ध प्रधान नेमला होता त्यानें राज्याची चांगली व्यवस्था केली.

**तुकाजी** आणि **जिवाजी** यांचे वंशजांस व प्रजेस फारच दुःखें भोगावीं लागलीं. यांस सैन्य ठेवण्याचें सामर्थ्य नसल्याकारणानें ते संस्थान **शिंदे होळकर**

पेंढारी इत्यादि सर्वांनीं यथेच्छ लुटलें. यांत आश्चर्य हेंच कीं, अशा संकटावस्थेत त्यांचें एवढें तरी राज्य कायम राहिलें.

**तुकाजी पवार** याला मूलबाळ कांहीं एक नव्हतें. त्यानें आपल्या वडील भावाचा नातु **कृष्णाजी** यास दत्तक घेतला. **कृष्णाजी** ही तसाच निरपत्य होत्सातां मेला. त्यानें आपला भाऊ **राणोजी** याचा मुलगा **तुकोजी** यास दत्तक घेतला. स० १८२४त **तुकोजी** मेला. त्याचे मागून दत्तक **रामचंद्रराव** हा गादीवर बसला; यास **खासा** साहेब ह्मणत. तो स० १८६० त मेला. त्याचा दत्तक **कृष्णाजीराव** हा गादीवर बसला. तो लहान होता; त्यास स० १८६७ पर्यंत मुकूत्यारी मिळाली नाहीं. या राज्याची एक विलक्षण व बहुधा हिंदु राज्यांत साधारण ह्मटल्यास चिंता नाहीं अशी तऱ्हा ही होय कीं, त्यांस औरस संतति मुळींच नव्हती; प्रत्येक राजास दत्तक घ्यावा लागला.

या **संस्थानाचा** दुसरा स्थापक जो **जिवाजी पवार** त्याला २ मुलगे होते. त्यांची नांवें **सदाशिव** व **आनंदराव**. **सदाशिवरावाचा रुक्मा** मुलगा मेला. तेव्हां त्याचा अगदीं निर्वंश झाला. **सदाशिवरावाच्या** मागून **हैबतराव**, **हैबतरावाचा** दत्तक **निळकंठराव**, यास पुढें **आनंदराव** ह्मणूं लागले. तो स० १८९७ त मेला. त्यानें **हैबतराव** यास दत्तक घेतला. त्याला स० १८६० ह्या वर्षी मुलगा झाला. **हैबतराव** मेल्यावर ४ वर्षांनीं ह्मणजे स० १८६४ त **नारायणराव** यास आधिकार मिळाला. राजा लहान असतां राज्यकारभार **गोविंदराव रामचंद्र** करीत होते.

यावर गव्हर्नर जनरलच्या एजंटाची देखरेख होती. हें स० १८६७ पर्यंत चाललें होतें. या वर्षी राजे **कृष्णाजीराव पवार** वयांत आले आणि त्यांना ही यावेळीं पूर्ण अधिकार मिळाला. स० १८१८ त **धार** प्रमाणें **इंग्रजसरकाराने*** या **संस्थानांत** हात घातल्यापासून संस्थानचें पुष्कळ हित झालें.

या **संस्थानास शिंदे होळकर** व **पेंढारी** यांनीं फार त्रास देऊन कांहीं मुलुख ही बळकावले होते. पुढें **इंग्रजसरकारानीं शिंद्यानें** अपहरण केलेला सारंगपुराचा प्रांत **धारचे** राजास देवविला. दोघां राजांस **देवास**, **अलाट**, **सारंगपूर**, **गुरागुच्छा**, **विकानोड** आणि **बाघोड** यांचे राज्याधिकारी ह्मणून **इंग्रजसरकारानें** कबूल केलें. **संदर्शीच्या** उत्पन्नाच्या तिसऱ्या भागावर आणि **दुंगेला** प्रांताच्या अर्ध्या भागावर त्यांची सत्ता **इंग्रजसरकारानें** कबूल केली स० १८२८ त **बाघोड संस्थानावर** अंमल करणें फार कठीण पडूंन गलें, ह्मणून तें **इंग्रज** लोकांच्या ताब्यांत देऊन

---

*नेटिव्ह राजांनी आपआपसांत भांडावें व भांडतभांडत इंग्रज सरकारांजवळ जावें व त्या परकियांनीं यांचें भांडण मिटवावें. या अशा भानगडीमुळें इंग्रज लोकांनी यांच्या राज्यांची व्यवस्था करतानां हा राजा काढून दुसरा नेमावा व त्याचा स्क्रू एजंटसाहेबांनीं फिरवावा व त्या दिवसा पासून नेटिव्ह राज्यांच्या उदयास आरंभ व्हावा, काय चमत्कार हा! तरी स्वराज्याचें स्वातंत्र्य कोणीकडे आणि परकिय लोकांचे दास्यत्व कोणीकडे! हत्तीचे कळप नेहमीं रानांत स्वेच्छेने विहार करीतात, त्याच्यावर नेहमी दुसरे रानांतील हत्ती येऊन पडतात. तरी ते रानांतील स्वेच्छेनुरूपविहार करणारे हत्ती सुखी; किंवा ज्यास धरून आणून चारी पायास शृंखला अडकवून तबेल्यांत बांधलेला हत्ती सुखी!

खर्च जावून शिलक मात्र **देवास सरकारास** द्याव याची असें ठरलें.

स० १८१८ त **ब्रिटिशसरकारानें** राज्याची नीट व्यवस्था लावल्या पासून देवास येथें शांतता आहे. मधून मधून **रघुगडच्या ठाकुरानें** खंडणी देण्याचें नाकारून बंडें वगैरे केलीं होती; परंतु त्याचा परिणाम पुढें फार वाईट झाला. स० १८३४ त **ठाकुरावर** लुटालुटीचा अपराध शाबित झाल्यावरून त्यास कैद केलें. स० १८५७ त जेव्हां इकडे प्रचंड बंड झालें; त्या वेळीं येथील दोघांही **राजांनीं ब्रिटिशसरकारास** वेळेवर चांगल्या प्रकारची मदत दिली, या मुळें ब्रिटिश **अंमलदार** फार खुप झाले.

स० १८६२ त यांस दत्तकाची सनद मिळाली. **सीनियर** आणि **ज्यानियर** अशीं दोन घराणीं आहेत. दोन्हींकडे हल्लीं वेगळाले कामगार आहेत. **कृष्णराव पवार** हे चांगले शिकलेले नाहींत. हें निरुपयोगी कामाकडे पुष्कळ पैसा खर्च करतात. आदा थोडा आणि खर्च फार असें असल्यानें कर्ज काढावें लागतें व कर्ज फार वाढलें ह्मणजे त्याचा परिणाम काय होतो हें सर्वत्रांस माहितच आहे. **यास** कर्ज फार झाल्यामुळें कर्जाची फेड होण्याकरितां संस्थानांत **ब्रिटिशसरकारानें** नेटिव **कारभारी गोरे** यांस नेमलें व **गोरे** यांनी आपल्या कारकीर्दींत **संस्थानाची** पुष्कळ प्रकारची सुधारणा करून **संस्थानांत** जो अवाढव्य खर्च होता तो अजिबात बंद केला, यामुळें सर्व कर्ज लौकरच फिटलें. कर्ज होण्याचें

मुख्य कारण हें होतें कीं, **कृष्णराव** यांनीं एके वेळीं आपल्या ताब्यांतील सर्व लोकांस विनाकारण शाली वाटल्या व अशाच प्रकारचा आणखीं खर्च केला होता.

**कृष्णराव** हे स्वतः राज्य कारभार पहात नाहींत. यांस पाहिजे तितका पैसा खर्च करण्यास मिळाला ह्मणजे हे राज्य प्रकरणीं काळजी वाहणारे नाहींत यांच्या जवळ जे लोक नेहमी राहाणारे असतात ते हांजी हांजी करून आपला चारितार्थ भागवून घेण्यापुरत्या बेतांत असतात; यामुळें चांगला सल्ला यांस मिळण्याची वानवाच असते.

यांच्या कडून जितका खर्च होतो तितका निरुपयोगी कामा कडे असतो. हे विद्या वृद्धीच्या कामीं मुळींच लक्ष्य देत नाहींत. यांस कोणी कांहीं गोष्ट सांगो, ती खरी वाटते. **गोरे** राज्य पद्धत सुधारून लोकांस सुखी करतात, तोंच **कृष्णराव** यांच्या जवळ असणारे लोक व मुख्यत्वें करून '**फडणीस**' वगैरे मंडळींनीं **कृष्णराव** यांस **गोरे** यांच्या बद्दल भलभलतें सांगून आपसांत कलह मातविला. या मुळें **गोरे** यांस **कृष्णराव** यांनीं कमी केलें. पुढें '**राज्यनौका**' चालविण्यास कोणी अनुभविक मनुष्य न मिळाल्यामुळें राज्यरीति बिघडत चालली व पुन्हां **संस्थानास** पुष्कळ कर्ज झालें. नौकर लोकांचे पगार तुंबून राहिले व चैन बाजीचा खर्च वाढत चालला. या मुळें **संस्थानांत** अव्यवस्था पुष्कळच माजली; तेव्हां पुन्हां **ब्रिटिशसरकारानें** एक **कारभारी** नेमला. हल्लीं बरीच राज्य पद्धत सुधारली

आहे. **कृष्णराव** हे फारच भिडस्त आहेत. यांची स्वतः भेट घेऊन कोणी कांहीं माला बद्दल अगर ग्रंथा बद्दल आश्रय मागितल्यास हे तात्काळ देतील व पैसा मागाहून देऊं असें ह्मणतील. मग मालाच्या व्यापाऱ्यानें पैशा बद्दल मागणी केली; तरी लौकरच देऊं असें ह्मणतील व पुढें पैशा बद्दल ज्यास्त तगादा झाल्यास **कारभारी** यांच्या मार्फत तो सर्व माल परत पाठवतिल; अशा प्रकारचा यांचा आश्रय मिळतो. वेळेवर भेट होणें नाहीं.

**नारायणराव** हे हल्लींच्या पद्धती प्रमाणें चांगले शिकलेले आहेत. यांनीं राज्यकारभार कांहीं दिवस आपल्या दिवाणाकडे सोंपविला होता; या मुळें मध्यंतरीं बरीच आव्यवस्था झाली होती आणि यांनीं मागें **एजंटाच्या** भिडेनें एक १४०० रुपये पगाराचा मुख्य अंमलदार नेमला होता; त्याच्या कारकीर्दींत फारच अव्यवस्था माजली होती. लोकांचा एगार तुंबला होता. खजिना किबे यांच्या ताब्यांत होता. बहुतेक अंमलदार चांगले वाकबदार नसल्यामुळें प्रजेस बराच त्रास पडत असे. **नारायणराव** यांनीं आपल्या राज्यांत एक कौन्सील स्थापन केलें होतें; परंतु त्याचा व्हावा तसा प्रजेस उपयोग झाला नाहीं. स्वतः**नारायणराव** हे चैनी आहेत. **इंग्रजी** पद्धती प्रमाणें सर्व व्यवस्था केलेली आहे; परंतु त्याचा उपयोग मात्र व्हावा तसा होत नाहीं.

हल्लीं राज्य पद्धत बरीच सुधारत आहे. येथें पाण्याची गैरसोय फार आहे. या प्रांती दक्षिणे कडिल लोक उन्हाळ्यांत जर एखाद्या वेळेस आले; तर

त्यांची प्राणांतिक अवस्था होऊन जाण्याइतका उन्हाळा इकडे असतो. उन्हाच्या वाफा जर मनुष्यास लागल्या, तर तो मनुष्य करपून मरतो. अफूचें उत्पन्न इकडे फार. इकडील लोक अफूच्या निशेंत सारा दिवस गुग असतात. प्रजा अगदी दरिद्री आहे. लोक लबाड, चोर, दरोडेखोर आणि खुनी असे आहेत. रात्रीं रस्त्यानें जर प्रवासी जाऊं लागले, तर इकडील चोरटे लोक त्यांस गांठून त्यांच्या जवळ जें कांहीं असेल तें घेतात व मालकानें देण्यास कांहीं अनमान केल्यास ते लोक जवळ असलेल्या हात्यारांचा उपयोग करतात. इकडील लोक धार्मिक नाहींत; कपटी आणि मोठे निष्ठुर आहेत. या प्रांतीं जे ब्राह्मण लोक आहेत; ते ही मोठे निष्ठुर असून दुसऱ्यावर उपकार करण्यास न झटणारे आहेत. वेळेवर यांच्या घरीं दुपारच्या वेळेस एखादा पांथस्थ जर गेला, तर हे लोक त्यास पिण्याकरितां पाणिही देणार नाहींत, मग जेवणाची गोष्ट तर बोलण्यासच नको. यांस सर्व प्रकारचा अधिकार असून बहुमानही चांगला मिळतो.

भाग पहिला प्रकरण विसावें समाप्त.

# एतद्देशीय संस्थानांचा इतिहास.

### भाग पहिला प्रकरण एकविसावें.

## जावरा.

याचें क्षेत्रफळ ८७२ चौरस मैल आहे. लोकसंख्या ८९४५६ आणि उत्पन्न ६९९२७० रुपये आहे.

प्रसिद्ध **अमीरखानाचा मेहुणा गफीरखान** यानें **जावरा संस्थानाची** स्थापना केली. १८ व्या शतकाच्या-शेवटीं **गफीरखान हा अफगाणाच्या** पोटीं **बुंदेलखंडांत** जन्मला. स० १७९८ त **अमीरखानानें होळकराची** चाकरी धरली. तेव्हां तो **अमीरखानास** मिळाला त्यानें आपल्या पराक्रमानें; व शौर्यानें आपलें नांव गाजविलें.

स० १८०८ त **अमीरखानानें** आपला मेहुणा **गफीरखान** याला **इंदुरास** राज्यकारभार चालविण्याकरितां जी मंडळी नेमली होती; त्यांतील एक सभासद केलें. या राजमंडळाचा नामधारी अधिकार राजाची **बायको तुळसाबाई** इजकडे होता. अशाप्रकारें ती राज्यव्यवस्था करीत असतां त्याचा परिणाम फार वाईट झाला. नियमित सारा वसूल होत नव्हता. सरकारला आपली फौज कमी करण्याचें सामर्थ्य नव्हतें आणि वसुलाची कितीही शहाणपणानें जरी व्यवस्था केली, तरी आदा आणि खर्च याचा मेळ बसत नव्हता. अशा प्रकारच्या राज्यव्यवस्थेंत दोन तट होते, एक **मराठे** लोकांचा व दुसरा **पठाण** लोकांचा. हे नेहमी एकमेकांविरुद्ध कट करीत, यामुळें राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी असे. राज्यांत फारच अव्यवस्था नेहमी लांच, खून आणि प्रातांत जुलूम व बंडाळी यामुळें रक्त स्राव होत होते. **पठाण** आणि **मराठे** असे दोन तट राज्यांत होते; त्यापैकीं **पठाणाचा** तट मुख्य होता. त्यावेळेपासून **तुळसाबाईकडून** राज्यकारस्थानें होत, त्या कटाला **गफीरखान** अनुकूळ असे व प्रतीकूळही असे. एक बे-

ळेस **मराठे** लोकांचें प्राबल्य विशेष झालें; त्यावेळीं **ग-फीरखानानें** पुष्कळ मुलूख मिळविला.

**मराठ्यांच्या** तटांतील लोकांनीं त्याचा पराभव करण्या साठीं त्याजवर सैन्य पाठविलें; परंतु **गफीरखानास** त्याचा मेहुणा **अमीरखान** मिळाला; यामुळें यावेळीं त्यास पुष्कळ मदत मिळाली आणि एकसारखी १९ दिवस लढाई होऊन शेवटीं **मराठ्यांचा** मोड झाला.

**पठाणतटाचें** पारडें जड झालें. **अमीरखान** **राजपुतान्यास** निघून गेला आणि **गफीरखान** अल्पवयी **मल्हाररावाचे** रक्षणार्थ नियुक्त होऊन बरेच दिवस बसला. एकसारखीं कारस्थानें चाललींच होतीं. शेवटीं **गफीरखान** यानें यां-च्या शहरावर चाल केली; त्यांत **तुळसाबाईस** पळावें लागलें. नंतर अगदीं हातघाईची जेव्हां वेळ येऊन पोंचली; तेव्हां **गफीरखान** यानें **महिदपूरच्या** लढाईंत **अल्पवयी राजास** आपले ताब्यांत देण्याचें कबूल करून घेतलें, आणि त्या लढाईचा शेवट केला व **तुळसाबाईस यमसदनीं** पोंचविलें.

**गफीरखान** आणि **होळकर** यांचे सैन्याचा **महीदपुर** येथें अगदीं मोड झाला; परंतु त्यापुढें जो तह झाला त्या तहाच्या १२ व्या कलमाप्रमाणें **गफीरखान** यास **मुजीत, मल्हारगड, तोलमंडळ, जावरा** आणि **बुरोद** हे प्रांत दिले. **पिडोडची** खंडणीही त्यासच मिळाली. **गफीरखानास** हे त्याचे मुलूख वंशपरंपरेनें त्याकडे चालतील असें अभिवचन दिलें होतें. मात्र त्यानें परकीय शत्रूंच्या स्वारीच्या वेळीं सहायासाठीं ३०० घोडे स्वार ठेवावेत व जसजसे त्याच्या राज्याचें उत्पन्न वाढेल तसतसें सैन्य वाढविण्यास सांगितलें होतें.

**गफीरखानाला** जे प्रांत दिले होते, ते **अमीरखानानें गफीरखान** हा आपला गुमास्ता आहे; असें सांगून आपलेकडे घेण्याचें केलें होतें व **ब्रिटिश सरकाराशीं अमीरखानानें** जे ठराव केले होते; त्या ठरावा अन्वयें **गफीरखानाचे** मुलूख **अमीरखानाचे** नावानें चालले होते; परंतु शोध करितां असें कळून आलें कीं, **गफीरखान** हा **होळकराचें** राजमंडळापैकीं एक होता, ह्मणून त्यास ते प्रांत दिले होते आणि शिवाय जरी **अमीरखानाचा गफीरखान** हा चाकर होता, तरी स० १८१७ त जी लढाई झाली त्या लढाईचे पुर्वींच त्यांचा सेव्यसेवक भाव बंद झाला होता, या प्रमाणावरून **अमीरखानाचें** ह्मणणें खोटें ठरलें.

**मंदीसुर** येथें तह झाल्यावर **गफीरखान** ७ वर्षे जिवंत होता. स० १८२५ त त्याचे मागून त्याचा मुलगा **नवाब घोसमहंमदखान** हा २ वर्षांचा असतां गादीवर बसला. **संस्थानच्या** राज्यकारभाराची सर्व व्यवस्था **ब्रिटिशसरकारानें** केली; परंतु **जावरा** हें बोलून चालून जरी स्वतंत्र होतें; तरी **होळकर** सरकारचें पुर्वीपासून मांडलीक असल्याकारणानें **मल्हारराव होळकरास ब्रिटिशसरकारच्या** संमतीनें २ लाख रुपये नजराणा दिला आणि त्याजकडून धाकट्या **नवाबास** राजाचीं वस्त्रें मिळालीं. **गफीरखानाची** मोठी बायको होती, तिला धाकट्या **राजाचें** रक्षक नेमलें आणि तिचा जांवई **जहानगीर** यास प्रतिनिधि नेमिलें. या दोघांला **संस्थानाचा** जमाखर्च दरवर्षी **इंदुरास गव्हर्नरजनरलच्या एजंटास** पाहण्यासाठीं उत्तम रितीनें व्यवस्थेशीर ठेवण्यास सांगितलें होतें. पुढें २ वर्षांनीं राज्यांत फारच

अव्यवस्था झाल्याकारणानें आणि **एजंटाच्या** आज्ञेचा भंग केल्याकारणानें त्या बेगमला राज्यकारभारांतून दूर केलें. शिवाय **घोसमहंमद** मेल्यावर **गफीरखानाचे** पुत्रसंततीसच राज्य मिळावें; **स्त्रीसंततीस** मिळू नये, असा ठराव करण्यांतआला.

स० १८२९ त **मंदिसुर** येथें तह झाला; त्या तहाअन्वयें **जावऱ्याचे नबाबानें** ५०० घोडेस्वार ५००पायदळ व दोन तोफा ठेवाव्या असें ठरलें. स० १८२४ त **जावऱ्याची** तैनाती फौज **होळकर** आणि **देवास** यांच्या फौजेशीं मिश्र केली आणि त्याबद्दल पैसा घेण्याचें ठरविलें. **नबाबानें बंडांत इंग्रजांस** जी मदत केली, त्याबद्दल स०१८५९ या वर्षाची थोडीशी सूट दिली. स० १८६५ त एप्रिलच्या २९ तारखेस **घोसमहंमद** हा मेला. त्याला ११ वर्षांचा **महंमदइस्मालखान** ह्मणून एक मुलगा होता. नंतर लवकरच **गव्हर्नरजनरलच्या एजंटाच्या** शिफारशीनें राज्यकारभारासाठीं एक प्रतिनिधी मंडळ नेमण्यांत आलें, त्यांत **हजरतखान** यांस **नबाबाचे** व्यवस्थापक नेमलें. शिवाय त्यांच्या घराण्यांतील आणखीं दोन गृहस्त आणि **महमदइस्मालची** आई इतके लोक होते; परंतु ती **आई नबऱ्यानंतर** २ दिवसांनीं मेली आणि पुढें **नबाबाचा** व्यवस्थापक आणि गृहमंडळी यांमध्यें लवकरच तंटे होतील असें चिन्ह दिसूं लागलें.

**जावरा** हें **होळकराचें** मांडलिक **संस्थान** असल्याकारणानें **गव्हर्नरजनरलच्या एजंटास** असा हुकूम आला होता कीं; **जावऱ्याचे संस्थानिकास महाराज होळकर** यास २ लाख रुपये नजराणा देण्यास सांगून **होळकराकडून** त्यास अधिकाराचीं वस्त्रें देववावीं.

परंतु इतक्यांत पुनः घोंटाळे उद्भवले. गत **नवाबाची पट्टराणी** आपला सावत्र भाऊ **टोंकचा नवाब** यास भेटण्यास गेली होती. तिनें राज्यावर बसण्याचा माझा हक्क आहे असें सांगितलें. **टोंकच्या नवाबानें अमीरखानानें** आपणास पसंत केलें होतें सबब तें राज्य मला मिळावें ह्मणून आग्रह धरला. याशिवाय तो असें सांगू लागला कीं, **नवाबाचा महंमदइस्मालखान** हा मुलगा शास्त्रसिद्ध होत नाहीं; परंतु हें त्याचें बोलणें **हिंदुस्थानसरकारानें** ऐकून घेऊन चौकशीकरून यांत कांहींएक अर्थ नाहीं असें ठरविलें. नंतर पुर्वीच्या चालीप्रमाणें **ब्रिटिशसरकारानें** आपल्या नावानें वस्त्रें देऊन त्यास गादीवर बसविलें.

**नवाब** लहान असतां **जावऱ्याचा** राजकारभार एका कामदाराकडून चालवीला होता. त्यावर **पोलिटिकल** एजंटाची देखरेख होती, परंतु स० १८७२ त नवाब वयात आल्यावर त्यास पूर्ण मुकत्यारी दिली. **जावऱ्याच्या नवाबाला** स० १८६२ त **मुसलमानी** शास्त्राप्रमाणें वंशपरंपरा त्याकडे हें राज्य चालावें अशी सनद मिळाली. यांस दत्तकाचा अधिकार असून १३ तोफांची सलामी आहे. हल्लीं राज्यव्यवस्था बरी आहे. रयतेस योग्य न्याय मिळतो, तेणेंकरून प्रजा सुखी आहे या शहराची रचना फारच सुंदर आहे. रस्ते स्वच्छ असुन दोहों बाजूस चांगली झाडें लाविलेलीं आहेत.मुशाफर लोकांस उतरण्या करितां येथें चांगल्या जागा आहेत.

**भाग पहिला प्रकरण एकविसावें समाप्त.**

भाग पहिला समाप्त.